म. ग्रं. सं. ठाणे
विषय लिबंध
सं. क्र. १४४८

# लष्करा आव्हान

दि. वि. गोखले



REFBK-0013138

शब्दरंजन स्पर्धा प्रकाशन

# माओचें लष्करी आव्हान

अनुक्रम ३४६५५ दि. निवांत
क्रमांक ९२२२ नौ. दि. २५.३.६२

☆

९३७३४

—: लेखक :—

दि. वि. गोखले

REFBK-0013138

☆

फेब्रुवारी १९६३

सर्व हक्क स्वाधीन

☆

किंमत ५० नये पैसे

☆

प्रकाशक : जयंत साळगांवकर, शब्दरंजन स्पर्धा, रुक्मिणी निवास,
मोरबाग रोड, मुंबई नं. १४

मुद्रक : धीरूभाई देसाई, स्टेट्स पीपल प्रेस, जन्मभूमि भवन, घोघा स्ट्रीट,
कोट, मुंबई.

# प्रकाशकाचे दोन शब्द

गेल्या ऑक्टोबरच्या अखेरीस लाल चीननें चालविलेल्या भारतीय भूमीवरील पाशवी आक्रमणाच्या वार्ता प्रसिद्ध होऊं लागतांच उभा भारतवर्ष खवळून उठला. आक्रमकांचा सूड घेण्याची भावना जशी जनमानसांत प्रस्फुरली, तशीच जाणकार मंडळींना आत्मपरीक्षणाची तीव्र आवश्यकता वाटूं लागली. राजकारणाच्या व्यासंगी विद्वानांचे आणि अभ्यासू पत्रकारांचे लेख झळकूं लागले. 'लाल चीनचें आक्रमण' हा प्रमुख चर्चाविषय झाला.

ह्या पुस्तकाचे लेखक व 'महाराष्ट्र टाइम्स्'चे वृत्तसंपादक श्री. दि. वि. गोखले यांचा राजकारणाचा आणि युद्धनीतीचा प्रदीर्घ व्यासंग आहे. ह्या विषयांवरील त्यांचें लिखाण पूर्वीपासूनच मान्यता पावलेलें आहे. म्हणूनच लाल चीनच्या आक्रमणाच्या संदर्भांत त्यांची 'महाराष्ट्र टाइम्स्'मध्यें लेखमाला सुरू होतांच स्वाभाविकच तिनें चोखंदळ वाचकांचें लक्ष वेधून घेतलें. त्यांचे लेख उभा महाराष्ट्र आवडीनें व लक्षपूर्वक वाचूं लागला. ही लेखमाला प्रकाशित होऊं लागतांच मी श्री. गोखले यांचें अभिनंदन केलें, आणि ती पुस्तकरूपानें प्रकाशित करण्याची इच्छा व्यक्त केली. श्री. गोखले यांनीं तें फारसें मनावर घेतलें नाहीं. पण 'महाराष्ट्र टाइम्स्'चे संपादक श्री. द्वा. भ. कर्णिक आणि सहसंपादक श्री. गोविंदराव तळवलकर ह्यांनीं माझ्या म्हणण्याला दुजोरा दिला, आणि पुस्तक–प्रकाशनाच्या संदर्भांत कांहीं मौलिक सूचनाहि केल्या.

ह्या पुस्तकास **पु. ल. देशपांडे** श्री. पु. ल. देशपांडे ( अभिनय, साहित्य, संगीत अशा अनेक क्षेत्रांत अग्रेसरत्व पटकाविलेल्या पु. लं. च्या व्यक्तिमत्वास 'पु. ल. देशपांडे' ह्या व्यतिरिक्त कोणतें विशेषण यथार्थ ठरणार आहे ? ) यांची प्रस्तावना लाभली ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. त्यांची प्रस्तावना गोखल्यांच्या लेखांइतकीच जळजळीत व रसरशीत आहे.

'महाराष्ट्र टाइम्स्' चालविणाऱ्या बेनेट कोलमन् कंपनीचे जनरल

मॅनेजर श्री. प्रतापकुमार रॉय यांनीं हे लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यास अनुज्ञा देऊन आम्हांस उपकृत केलें. श्री. दि. वि. गोखले यांनीं आपुलकीनें लेख प्रसिद्ध करण्याचे कामीं सहाय्य केलें आणि श्री. द्वा. भ. कर्णिक व श्री. गोविंदराव तळवलकर यांनीं स्नेहभावानें मार्गदर्शन केलें. स्टेटस् पीपल् प्रेसनें पुस्तक अल्पावधींत उत्तम प्रकारें छापून दिलें आहे.

ह्या सर्वांचा मी अंतःकरणपूर्वक आभारी आहें.

मुंबई १४,
दि. १६-२-६३.

**जयंत साळगांवकर,**
शब्दरंजन स्पर्धा प्रकाशन.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम.................... विः ....................
क्रमांक .................... नों दि ....................

# प्रस्तावना

वर्तमानपत्री लिखाणाला घाईतलें साहित्य म्हटलें जातें. पुष्कळांशीं तें खरेंहि आहे. सकाळच्या चहाप्रमाणें सकाळचें वर्तमानपत्रसुद्धां पहातां पहातां गार होऊन जातें. गरम चहावरोबर गरम वर्तमानपत्र असा शहरी जीवनाचा परिपाठ आहे. पण घाईच्या निर्मितींत देखील ज्यांत थंड न पडण्याचे गुण आहेत असेंहि साहित्य वर्तमानपत्रांतून निर्माण होऊं शकतें. केवळ वर्तमानाचीच नव्हे तर भविष्याचीहि चिन्ता वहाणारे आणि भूतकालानें शिकवलेले धडे स्मरणांत ठेवणारे पत्रकारच हें कार्य करूं शकतात. श्री. गोखले हे ह्या पठडींतले लेखक आहेत. उत्तम ग्रंथकार होण्याचें सामर्थ्य असलेला हा एक तरुण पत्रकार आहे. पोटासाठीं रकाने भरणारा नुसताच श्रमिक नाहीं. त्यांचे श्रम डोळस आहेत. झरणींत नुसतीच शाई नाहीं. ओतप्रोत देशप्रेम भरलें आहे.

मराठी पत्रकार परंपरेची सुरवातच मुळीं 'शहाणे करोनि सोडावे सकळ जन' ह्या संकल्पानें झाली. जांभेकर, टिळक, आगरकर ह्यांची ती परंपरा. अर्थात् त्याखेरीज खाविंदचरणारविंदी मिलिंदायमान झालेल्या लेखण्याहि अन्यत्र झिजत होत्या. खाविंदचरणांचा रंग बदलला तरी तीहि परंपरा चालू आहे. गोखल्यांनी पहिल्या तेजस्वी घराण्याचा गंडा बांधला. त्या घराण्याचा कुळधर्म फार बिकट. नित्य व्यासंग, विवेक, संयम आणि निर्भयता अशा चार खांबांवर उभें असलेलें हें घराणें. ह्या घराण्याचे कुळाचार संभाळतांना हातांत केव्हां चौपदरी येईल तें सांगतां येणार नाहीं. ज्यांच्या कृपेचा मेघ वोळंबिला असताना इहलोकीं कल्याण होवोन जीवन धनसंपन्न करण्याची निश्चिती आहे अशांच्याच विरुद्ध ते अधर्मानें वागताहेत याची पुराव्यानिशीं खात्री पटतांक्षणीं अप्रिय सत्य बोलण्याचें धैर्य दाखवावें लागतें. असला कुळाचार संभाळण्याची कामगिरी गोखल्यांनी स्वीकारली आहे याची साक्ष पुढल्या पानापानांत आणि ओळीओळींत आहे.

हा लहानसा ग्रंथ म्हणजे आमच्या नेत्यांच्या नाकर्तेपणाची, नामुष्कीची आणि एका राजकीय न्यूनगंडानें पीडित अशा लोकांची केविलवाणी कथा आहे. घरच्या म्हातारीलाच काळ असलेल्या महापुरुषांच्या महापतनाचा

हा ताजा इतिहास आहे. आपल्या राजकारणपांडित्यानें दुष्टांतल्या दुष्टांचें देखील हृदयपरिवर्तन करूं म्हणणाऱ्या अहंकाराच्या पराजयाची ही विलापिका आहे. रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति ह्या षंढसूत्राला मानवतेचें महन्मंगल स्तोत्र समजणाऱ्या वाचिवीरांच्या भ्रमनिरासाची ही मर्मभेदक कहाणी आहे. शत्रू दाराशीं धडका देत असताना जगाला शांतिपाठ देत हिंडणाऱ्या आणि स्वतःचें घर पेटत असताना दुसऱ्यांचीं कोळिष्टकें झाडायला धांवून जाणाऱ्या आमच्या वांझोटचा नेतृत्वाचें जगभर जें हसें झालें त्याचा हा प्रथमाध्याय आहे. दुबळ्यांची अहिंसा आणि नपुंसकाचें शील ह्याला कवडीचीहि किंमत नसते हा जगाच्या इतिहासानें लाख वेळा शिकविलेला धडा विसरल्याबद्दल ही शिक्षा आहे आणि शिवरायाचे प्रताप आठवायचे तिथें हिंसाअहिंसेच्या विचारांचा खुळखुळा वाजवीत बसण्याच्या पापाबद्दल घ्यावयाचें हें प्रायश्चित्त आहे.

चीननें हल्ला केला. सामान्य जनतेला कांहींच कळेना. दोन्ही देशांतल्या नेत्यांनीं एकमेकांच्या गळचांत घातलेल्या हारांचीं फुलें देखील अजून सुकलीं नसतील. ज्याला भाई म्हटलें तो कसाई होऊन कसा आला तें नेणत्यांना उमगेना. आणि इथें नेणतेच फार. कारण शांततामय सहजीवनाचा घोष एवढा मोठा होता कीं धोक्याच्या सूचना देणारांचे आवाज ऐकणार कसे ? शांततामय सहजीवन ! आग आणि पाण्याचें शांततामय सहजीवन ! विषाचें आणि दुधाचें शांततामय सहजीवन. मुक्त फुलूं पहाणाऱ्या लोकशाही समाजाचें आणि ज्या राजवटींतला प्रत्येकजण बंदीजन आहे अशा हुकुमशाहींतल्या समाजाचें सहजीवन. 'अगा जें घडलेंचि नाहीं' तें करून दाखविण्याची आमची प्रतिज्ञा होती. आणि शेवटीं गाढवहि गेलें—ब्रह्मचर्य गेलें.

राजकारण हा माझा विषय नव्हे. परंतु राष्ट्रप्रेम हा माझा हक्क आहे. माझ्या राष्ट्रावर आक्रमण करणारा आणि त्या आक्रमकांना सहाय्य करणारा तो माझा शत्रू एवढेंच मला कळतें. मग तो चिनी असो वा पाकिस्तानी ! प्राण पणाला लावून त्याला ठेंचलें पाहिजे एवढाच डावपेंच मला ठाऊक आहे. त्यासाठीं ज्यांत माझें सामर्थ्य आहे असें मला वाटतें त्या लेखणीला, लाठीला, नांगराला आणि झाडूलाहि शस्त्र मानणें हा माझा धर्म आहे. माझाच काय परंतु ह्या देशाला माझा देश म्हणणाराला एवढेंच राजकारण कळतें आणि एवढेंच पुष्कळ आहे. चिनी हल्ला येतांच प्रथम कोण खवळून उठले हें ध्यानांत घेतलें तर सोनें कुठलें आणि पितळ कुठलें तें लगेच उमगेल. हें आक्रमण आहे

कीं नाहीं याचा वाद घालत बसले कम्युनिस्ट ! मुस्लिम लीगनेंहि कांहीं जोरदार युद्धप्रचार केल्याचें ऐकिवांत नाहीं. असें असूनहि ज्यांचे हात भाजून काढले पाहिजेत अशा आसुरी मतप्रणालीच्या देशाशीं हातमिळवणी करून त्यांच्या कृपेचें भाजन होण्यासाठीं आमच्या देशांतले नेते कसे धडपडत होते याचा इतिहास गोखल्यांनी पुढें दिलाच आहे. राष्ट्रप्रेमी शूरांचा अपमान, त्यांना अनुल्लेखानें मारणें, स्वमताशीं विरोध असणाऱ्या अनुभवी पुढाऱ्यांची हेटाळणी करणें यांतच आमच्या नेत्यांची बुद्धि खर्च होत होती.

देशांदेशांतली मैत्री हा एक राजकारणी डाव असतो. पर्ल हार्बरची कथा सर्वश्रुत आहे. ही मैत्री म्हणजे परिस्थितीनें घडवून आणलेली विचित्र शय्यासोबत असते. 'हिंदी चीनी भाईभाई'नें आम्ही खरोखरीच हुरळलों. मातबरांचा मोरू झाला तिथें बाजारबुणग्यांचें काय ! गेल्या महायुद्धांत इंग्लंड–अमेरिकेच्या गळयांत गळा घालून रशियादेखील दोस्त म्हणून उभा होता. त्या दोस्तीचा मृत्युलेख त्याच रशियानें बर्लिनच्या भिंतीवर कोरलेला आहे. तो ज्यांना अजूनहि शंका असेल त्यांनी जाऊन वाचून यावा. आईपासून लेकरें, नवऱ्यापासून बायका, वृद्ध आजोबा–आजींपासून नातवंडें यांची त्या भिंतीनें केलेली ताटातूट पाहून यावें व नंतरच कम्युनिस्टांतल्या डाव्या–उजव्यांविषयींच्या कथा सांगाव्या. त्यांतून शय्यासोबत ही राजकारणांत समर्थ राष्ट्रांचीच होऊं शकते. लांडगे शेळयांना पोटाशीं घेतात ते पुढेंमागें स्वतःची भूक भागवण्याची सोय म्हणून. आमच्या राष्ट्राला एकतर गांधी-शिष्यप्रणीत अहिंसा–सत्य–अस्तेय याच्या नुसत्या जपमाळा ओढणाऱ्या आचारधर्मानें फक्त ढोंग शिकविलें. हजार भुंग्यांनीं तुळई पोखरावी तसें ह्या राष्ट्रवृक्षाला इथून तिथून साऱ्या ढोंगानें पोखरलें. राष्ट्राचा गाडा ज्यांनी चालवावा त्या नेत्यांचे हात कुठल्या तरी वरिष्ठ नेत्याच्या मुजऱ्यांत गुंतलेले. सरकारी नोकरांचे हात लांचलुचपतींत बरबटलेले. त्यागाच्या कथा सांगणारांनीं नव्वद नव्वद लाखांचीं मृत्युपत्रें लिहून देह ठेवलेला. हिंदी ही राष्ट्रभाषा झालीच पाहिजे म्हणणारांनी स्वतःचीं मुलें ख्रिस्ती आंग्ल–शाळांमध्यें पाठवून त्यांच्या भविष्याची यथासांग तरतूद केलेली. उरली नुसती जयजयकार करणारी भाबडी जनता. नेतृत्वाला गुणाची गरज उरली नाहीं. सांप्रदायाला शिस्त नाहीं. उच्चाराला आचारांचा कणा नाहीं. कुणाचा पायपोस कुणाच्या पायांत नाहीं. उरले आहेत ते केवळ राष्ट्रपुरुषांच्या नांवांचे वार्षिक आणि सार्वजनिक गर्हिवर ! थुंकी लावून शिक्के मारण्यासाठीं केलेलीं पोष्टाचीं तिकिटें !

कुठें कणा असावा अशी शंका येईपर्यंत प्रत्येक पावलाला तडजोडींचीं गलिच्छ आडवळणें. समर्थांच्या शब्दांत सांगायचें म्हणजे 'करंटे जाहले सर्व, जो तो बुद्धीच सांगतो.' ह्यांतील बुद्धीच सांगतोमधलें 'सांगतो' हें क्रियापद महत्त्वाचें. समाजवादी समाजरचनेच्या नुसत्या वल्गना. कोटच-वधि रुपयांचा कर चुकवणारे धनिक मोकळेपणानें मिरवीत आहेत. लाखों रुपयांच्या अफरातफरींचीं पुराव्यानें शाबीत झालेलीं दप्तरें शीतमंजूषेंत उद्दामपणें फेंकून दिलीं जात आहेत. राष्ट्रप्रेमी धुरंधर सेनानींचा सल्ला माथेफिरूपणानें धुडकावला जातो आहे. होयबांची भरती आहे. युद्धकालाचे डंके पिटायला लागल्याबरोबर ज्या सेनानींच्या डोळ्यां-पुढें रणचंडीचा थयथयाट दिसायला पाहिजे ते पळून जाताहेत. अनुभवी सेनापतींना पेन्शनींत टाकलें आहे. जवानांचा तेजोभंग होतो आहे. सूर्याजी मालुसऱ्यांना देशोधडी लागावें लागत आहे. आणि सूर्याजी पिसाळांना उरांशीं धरलें जात आहे. आंत आणि बाहेर घरभेद्यांचा बुजबुजाट आहे. देशघातकी कृत्यें करणारांना जाब विचारला जात नाहीं. युद्धप्रयत्नांना जोम धरूं दिला जात नाहीं. राष्ट्र पेटून उठतें आहे याची नेत्यांनाच धास्ती वाटूं लागली आहे कीं काय अशी शंका येते. देशांतले तरुण तर जीवनाचीं वळणें रणमैदानाच्या दिशेला नेण्याऐवजीं केसांच्या वळणाच्या चिंतेंत आहेत. ज्या काळांत स्पार्टन् गुण वाढीला लागावेत त्या काळांत विलास वाढताहेत. अवघ्या पंधरावीस वर्षांच्या इतिहासांतली ही घसरगुंडी आहे. आणि तरीहि परदेशांत जाऊन आमचे महापंडित पुढारी भारतानें जगाचें आध्यात्मिक आचार्यपद स्वीकारावयाचें आहे अशा वल्गना करताहेत.

हा देश असा हतवीर्य होण्याचें एकमेव कारण म्हणजे तडजोड. अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय राजकारणांत सदैव चाललेली तडजोड. असल्या तडजोडींमुळें राष्ट्राचा कणा ढिला होतो. शासनाची दहशत रहात नाहीं. अंतर्गत राजकारणांत मतें गमावण्याच्या भीतीमुळें तडजोड आणि आंतरराष्ट्रीय राजकारणांत निश्चित राजकीय विचारसरणीच्या अभावा-मुळें तडजोड. नेत्यांना लोकसंग्रह करावा लागतो, बहुतांचीं अंतरें राखावीं लागतात हें खरें. परंतु राष्ट्रीय हितासाठीं लोकांना समज देण्याचेंहि काम करावें लागतें. आमच्या नेत्यांना एक भाषण करून मत मांडल्यावर जरा टीका झाली कीं दुसऱ्या आठवड्यांत चुकीचें खापर वार्ताहरांवर फोडून लगेच त्या मताच्या विरुद्ध खुलासे करावे लागतात. आपली खुर्ची जाईल ही जबरदस्त भीति आहे. तत्त्वनिष्ठ राहून अप्रिय होण्याला विलक्षण ताकद लागते. छत्रपतींनी, ज्या सवंगड्याचे हात स्वराज्याचें तोरण बांधतांना

लागलेले होते त्या नेताजी पालकराला देखील राष्ट्रद्रोहाची पुसट शंका येतांच बडतर्फ केलें. रामशास्त्री प्रभुण्यांनी न्यायाच्या काटयापुढें प्राणाची तमा बाळगली नाहीं. छाताडावर शत्रूनें पाय ठेवला होता तरीहि 'बचेंगे तो और भी लढेंगे' म्हणणाऱ्या दत्ताजीचा जन्म ज्या देशांत झाला तो देश, एक चिनी हल्ला आल्याक्षणीं सीदन्ति मम गात्राणि म्हणत आपल्या मदतीला कोण येणार याची वाट पाहूं लागला. आमची समजूत आमच्याप्रमाणें चिनीहि तडजोडवाले आहेत. चिनीच काय कुणीहि नाहीं—राष्ट्रीय स्वार्थ हाच शेवटीं सर्वांत महत्त्वाचा. त्याच्या आड येणाऱ्याला कापून काढणें हाच मार्ग सगळीं राष्ट्रें अवलंबितात. सैन्यबळ वाढवीत असतात. आम्ही सैन्यबळ वाढवणें आणि युद्धखोर असणें ह्या दोन कल्पनांची गल्लत केली. निर्धारानें आक्रमण करण्याचें सामर्थ्य संपादन करून सिद्ध असणें हेंच खरें संरक्षण. ऑफेन्सची शक्ति असणें हाच खरा डिफेन्स.

चिनी युद्ध पेटलें त्या दिवशीं मी अमेरिकेंत होतों. जॅक पार नांवाच्या एका अत्यंत लोकप्रिय विनोदी नटाचा एक कार्यक्रम पहात होतों. जॅक पार मंचावर आला आणि म्हणाला, "चीननें हिंदुस्थानवर आक्रमण कां करावें कळत नाहीं. ह्या माओला स्वतःच्या देशांतला दुष्काळ सोडून हिंदुस्थानांतला दुष्काळ बळकावण्याची कसली इच्छा झाली आहे ही ?" प्रेक्षक खदखदून हसले. लगेच त्यानें पुस्ती जोडली, " आणि हिंदुस्थानचे मुख्य प्रधान ! ह्यांच्या देशांत ३५ कोटि माणसें असून आमच्या केनेडीकडे येतात आणि "...इथें शेंबडया शाळकरी पोराची नक्कल करीत जॅक पार म्हणाला, "अँ ऽऽअँ... केनेडी ऽऽ मला माओनी माल्लं ऽऽअँ..." लोकांनीं त्या नकलेला कडाडून टाळी दिली. माझ्या अंगाला लाख इंगळया डसल्या. एकदां एक नीग्रो बूटपॉलिशवाला मला म्हणाला—"तुमचे नेते इतिहास वाचीत नाहींत का हो ? एकदां तुम्हाला मुसलमानांनीं लुबाडलें—मग इंग्रजांनीं लुबाडलें—आतां चिन्यांकडून लुबाडून घेण्यासाठीं उभे राहिलां आहांत ? यू हॅव नो राइट टु बी इंडिपेंडेंट ! तुम्हांला स्वातंत्र्याचा अधिकारच नाहीं." अनुभवांच्या ह्या शितांवरून आमच्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेच्या भाताची कल्पना करावी.

आमच्या परराष्ट्रीय धोरणाविषयीं आमच्या कल्पना फार अचाट. एकदां वाटायचं आम्ही रशियाला बनवतों आहों. एकदां वाटायचं अमेरिका बनली. आम्ही कुणालाच बनवलें नाहीं. आम्हीच बनलों. क्रुश्चाव्हनें असंदिग्ध शब्दांत सांगितलें, "हिंदी लोक आमचे मित्र खरे—पण चिनी लोक बंधु आहेत." सुज्ञांनी समजायचेंच नाहीं असें ठरवलें तर काय करणार ?

आमच्या राष्ट्रीय जीवनांतला हा अत्यंत संतापाचा क्षण आहे.

यापुढें भारताला संतप्त भारत म्हणून कांहीं वर्षे काढावीं लागतील. आम्ही मऊ मेणाहुनि असलों तरी कठिण वज्रासि भेदूं ऐसेहि आहोंत हें सिद्ध केलें पाहिजे. ज्या राष्ट्राचें सैन्यबल अद्ययावत् असतें, राष्ट्रभक्ति ही एकमेव कसोटी असते, साऱ्या राष्ट्राला पंथ धर्म जाति निरपेक्ष एकच कायदा लागू असतो, राष्ट्रविघातक अशा लहानांतल्या लहान गुन्ह्याला देखील जेव्हां जबर शासन असतें, त्यावेळींच त्या राष्ट्रानें म्हटलेल्या शांतिपाठाला अर्थ येतो. समुद्राच्या पोटांतल्या वडवानलामुळें सागराच्या शांततेला शोभा आहे. एरवीं डबकेंहि शांत असतें. पण जिथें वादळाची शक्यताच नाहीं, जें कधीं उचंबळून येत नाहीं त्याच्या शांततेला अर्थ काय ? त्यांत नुसतींच डरांवडरांव करणारीं बेडकें असतात. बेडकाच्या डरांव-मुळें कोणी डरत नाहीं.

गोखले अस्वस्थ झाले आणि त्यांनी आटोकाट परिश्रम करून, इतिहास आणि वर्तमानाचे दाखले देऊन ही लेखमाला लिहिली. ती लिहितांना त्यांचा संयम सुटला नाहीं. त्यांनीं ज्यांच्यावर दोषारोप करायचा तो पुराव्यानिशीं केला. गलिच्छ उखाळ्या पाखाळ्या काढून नुसती वर्तमान-पत्री सनसनाटी साधली नाहीं. लोकमान्यांच्या आणि आगरकरांच्या लेखनवंशाच्या कुलधर्माला ते जागले. वास्तविक कोणतेंहि साहित्यिक स्थान मिळावें ह्या हेतूनें केलेलें हें लिखाण नव्हे. परंतु ह्या लेखनांतील निर्मळ शैलीचा आणि सरळ लिहिण्याच्या पद्धतीचा उल्लेख केल्यावांचून मला राहवत नाहीं. वर्तमानपत्री मराठी हा आजकाल चिंतेचा विषय होऊं पहात आहे. मथळ्यापासून मजकुरांतल्या शेवटल्या ओळीपर्यंत अर्थ लावीत जाणें बिकट होऊं लागलें आहे. गोखल्यांच्या भाषेला ओघ आहे. कारण विचारांचे गोंधळांत टाकणारे भोंवरे त्यांच्या डोक्यांतच नाहींत. आणि म्हणूनच त्यांना जें कांहीं म्हणावयाचें आहे तें कोणत्याहि नाटकी अभिनि-वेशाचा आश्रय न घेतां ते म्हणूं शकतात. कसलीहि सारवासारव करायची नाहीं कीं कोणताहि दुराग्रह बाळगायचा नाहीं. चिनी आक्रमणासंबंधींचें माझें सारें प्राथमिक शिक्षण गोखल्यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'मधून लिहिलेल्या ह्या लेखमालेमुळें झालें. इतक्या उत्सुकतेनें मी वर्तमानपत्रांतले लेख क्वचितच वाचले आहेत. आज आपापल्या जिल्ह्यांचें आणि तालुक्यांचें राजकीय नेतृत्व करणाऱ्या लोकनेत्यांनी आणि खासदार, आमदारांनीं हें पुस्तक निर्मल मनानें वाचावें. त्यांचें शिक्षण होईल. अशा शिक्षणाची त्यांना आज अतिशय आवश्यकता आहे. म्हणजे ह्रात वर केव्हां करावा आणि उगारावा केव्हां आणि कोणावर, हें तरी त्यांना नीटपणें कळेल.

सतत पहारा हा लोकशाहीचा गाभा आहे. आम्हाला समर्थ लोकशाही राष्ट्र म्हणूनच जगायचें आहे. एखादा 'डिक्टेटर' आल्याखेरीज ह्या देशाला तरणोपाय नाहीं असें म्हणणारे गुलाम मनोवृत्तीचे असतात. पण समर्थ लोकशाही उभी करायला, मत देणाऱ्या प्रत्येकानें दिवसांतले कांहीं क्षण ह्या पुढाऱ्यांच्या हालचालींकडे आपलें ध्यान देण्यासाठीं ठेवावे लागतात. पांचपांच वर्षें नियुक्तांच्या खांद्यावर माना टाकून झोंपी जाणें हें लोकशाही टिकवण्याचें लक्षण नव्हें. हुकुमशाही निर्माण होते ती अशाच गाफिलपणां-तून. असला गाफिलपणा करून हुकुमशाहीच्या खाईंत जर पुढली पिढी लोटली गेली तर आपल्या वार्धक्याचा प्रत्येक क्षण त्यांचे तळतळाट ऐकत पिचतपिचत काढावा लागेल.

ह्या निर्भय आणि व्यासंगी पत्रकाराच्या ह्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची संधि मला मिळाली हा मी माझा गौरव समजतों. सिंहाच्या पिछाडावर चाबूक उडवण्याचें धैर्य असलेल्या ह्या लेखकानें विदूषकाचा व्यवसाय करणाराला हा मान कां द्यावा हें मला कळत नाहीं. माझ्या देशावर असलेलें नितांत प्रेम आणि हिमालयावर सांडलेल्या निरपराध जवानांच्या रक्ताचा वदला घेतला पाहिजे ही तळमळ हा एकच आम्हाला जोडणारा दुवा आहे. आम्हा दोघांनाच कां ? आपल्या उभ्या देशाला जोडणारा एवढाच दुवा मला समजतो. ह्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याचा माझा अधिकार एवढाच. ह्या पुस्तकाचे प्रकाशक जयंतराव साळगांवकर यांचें मी अभिनंदन करतों. एरवीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेले हे रत्नासारखे लेख रद्दींत गेले असते. ह्या पुस्तकाचीं भारतांतल्या सगळ्या भाषांतून भाषांतरें व्हायला हवींत. आमच्या साहित्य अ‍ॅकॅडमींतले मान्यवर साहित्यिक ह्या क्षणींतरी वसिष्ठ कुलाची परंपरा चालवतील का ?

**पु. ल. देशपांडे**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | हिमालयीन चुकांचें प्रायश्चित्त | १ |
| २ | इंद्राय स्वाहा, तक्षकाय स्वाहा | ८ |
| ३ | संरक्षण–मंत्र्यांचा पोलादी पडदा | १६ |
| ४ | '८ सप्टेंबर' हा तर पांढरा बावटा ! | २३ |
| ५ | दगाबाजांशीं तडजोड कसली ? | ३० |
| ६ | शस्त्रें घेतांना हयगय नको ! | ३६ |
| ७ | सेलाचा धक्कादायक पराभव | ४६ |
| ८ | लष्करी अजिंक्यत्वाचें थोतांड | ५३ |
| ९ | चिनी सामर्थ्याचा बागुलबुवा | ६० |
| १० | केवळ बचावानें भागणार नाहीं ! | ६७ |
| ११ | फसवे युक्तिवाद, नाटकी घोषणा | ७५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम.................. दि: ..................
.......9375............ .........

# हिमालयीन चुकांचें प्रायश्चित्त

१९५० सालच्या ऑक्टोबर महिन्यांत, माओ त्से तुंगच्या सैन्यानें तिबेटमध्यें प्रवेश केला, तेव्हांपासूनच भारत–चीन तंटयास प्रारंभ झाला, असें मानलें पाहिजे. भारत सरकारनें एक खलिता पाठवून, तिबेटमधील चिनी आक्रमणाचा निषेध केला, पण चीननें तिकडे संपूर्ण दुर्लक्ष करून तिबेटवरील आपली लष्करी पकड हळूहळू घट्ट केली. भारत सरकारहि चिनी आक्रमणाची घटना विसरलें व तिबेट हा चीनचाच प्रदेश असल्याचें, एप्रिल १९५४ मध्यें एक करार करून त्यानें मान्य केलें. या पाठोपाठ कुविख्यात पंचशील करारहि करण्यांत आला. या दोन्ही करारांची शाई वाळायच्या आंतच, चीननें भारताच्या उत्तर प्रदेशांतील बाराहोटी टापूवर हक्क सांगायला सुरुवात केली. १९५५ च्या सप्टेंबरांत एका चिनी सैन्य–पथकानें उत्तर प्रदेशांत १० मैलपर्यंत प्रवेश केला. पण त्यावेळीं पंचशील फार जोरांत असल्यामुळें, १९५६ सालीं चिनी पंतप्रधान चाऊ-एन-लाय यांच्या भारतभेटीच्या वेळीं भारतभर 'हिंदी–चीनी भाईभाई'च्या घोषणा घुमल्या. श्री. कृष्ण मेनन १९५३ सालपासूनच युनोंत चीनला प्रवेश मिळवून देण्यासाठीं वकिली करीत होते. १९५७ मध्यें ते संरक्षण–मंत्रीपदावर आरूढ झाले. याच वर्षी भारताच्या लडाख प्रदेशांतून चीननें पक्का रस्ता बांधावयास व त्याभोंवतीं आपलीं लष्करी ठाणीं उभारावयास सुरुवात केली. १९५९ सालपर्यंत लडाखमध्यें त्यांनी १२ हजार चौरस मैलांचा प्रदेश व्यापला व नेफांतील लोंग्जू हें ठाणेंहि बळकाविलें. ऑक्टोबर १९५९ मध्यें लडाखमध्यें चिनी सैन्यानें १७ भारतीय पोलिसांना ठार केले व त्यांची प्रेतें पंतप्रधान नेहरूंच्या वाढदिवशीं भारताच्या ताब्यांत दिलीं. यानंतर चिनी विमानें भारतीय नभांगणांत उडूं लागलीं व तिबेटमध्यें चिनी लष्कराची भारी जमवाजमव सुरू असल्याच्या बातम्या आल्या. अखेर ९ सप्टेंबर १९६२ रोजीं चिनी सैन्यानें नेफांत मॅकमहॉन सीमा ओलांडून धोलानजीकच्या भारतीय प्रदेशांत प्रवेश केला. भारतीय सैन्यानें त्यांच्यावर गोळीबार केला नाहीं, कारण त्यांना संरक्षणमंत्र्यांचा

तसा हुकुम नव्हता. १ ऑक्टोबरपासून चिनी सैन्यानें गोळीबार सुरू केला व भारतांतील वातावरण तापूं लागलें. तरीहि श्री. मेनन युरोप व अमेरिकेच्या वारीसाठीं रवाना झाले. ५ ऑक्टोबर रोजीं ले. ज. कौल यांची नेफांत नेमणूक झाली व तेथें एक 'कोअर' म्हणजे सेनाविभाग उभारण्याचा हुकुम त्यांना देण्यांत आला. ९ ऑक्टोबरला चिन्यांनीं थागला कड्याच्या दक्षिणेस मोठा हल्ला चढविला. यांत १३ भारतीय व १०० चिनी सैनिक ठार झाल्याचे सांगण्यांत आले. यानंतरहि चिनी सैनिकांचे रोज किरकोळ हल्ले चालू होते. अखेर २० ऑक्टोबर रोजीं पहाटे चिनी सैन्यानें लडाख व नेफा दोन्ही विभागांत प्रखर चढाई चालू केली. पहिल्याच दिवशीं नेफांतील धोला व खिंझेमान ही ठाणीं पडलीं व लडाखच्या चिपचाप खोऱ्यांतील कांहीं ठाणींहि चीननें काबीज केली. २१ व २२ ऑक्टोबरलाहि चिनी चढाईचा वेग मंद होण्याची लक्षणें दिसेनात. दि. २२ रोजीं सायंकाळी दिल्लींत केलेल्या एका प्रकट भाषणांत, आम्ही इंच नि इंच भूमीसाठीं लढूं असें सांगून संरक्षण–मंत्र्यांनीं घोषित केलें कीं, चीन वाटाघाटींना तयार होईपर्यंत आमचा लढा चालू राहील !

२४ ऑक्टोबर, १९६२

भारतीय सिंह अखेर पिंजऱ्यांतून मोकळा झाला. हा पिंजरा त्यानें स्वत:च आपल्याभोंवतीं उभा केला होता. पंचशील, युद्धवर्ज्यता, शस्त्रसंन्यास इत्यादि घोषणांचे जगाला पाठ देऊन, त्यानें स्वत:चीच कोंडी करून घेतली होती. पिंजऱ्यामध्यें सांपडलेल्या वाघसिंहांना बायकामुलेंसुद्धां खडे मारतात. त्याप्रमाणें कुणीहि सोम्यागोम्यानें उठावें व भारताला खिजवावें, अशी अवस्था झाली होती. चीनला हा पिंजरा फोडून या सिंहाचे लचके तोडण्याची इच्छा झाली, ती याचमुळें. पण चिनी हल्ल्यामुळें सिंह मोकळा झाला आहे. त्यानें सिंहगर्जना करून संग्रामास प्रारंभ केला आहे. आक्रमणाबद्दल चीनचा निषेध करीत असतांनाच, भारतास हास्यास्पद बंधनांतून मुक्त केल्याबद्दल चीनचें अभिनंदन करण्याचाहि मोह झाल्यावांचून रहात नाहीं.

अनेक दिवसांच्या तयारीनंतर चीननें चढाई सुरू केलेली असल्यामुळें तिचा जोर जबरदस्त आहे. पहिल्या दिवसांत चिनी सैन्यानें ५०–६०

चौरस मैलांचा प्रदेश व्यापला नि अजूनहि चढाईचा वेग मंदावलेला नाहीं. संरक्षणमंत्र्यांनीं इंच इंच भूमि लढविण्याची घोषणा केलेली असली, तरी ती वाच्यार्थानें घ्यायची नाहीं. आपले जवान अत्यंत शर्थीनें चिन्यांशीं मुकाबला करीत आहेत. पण त्यांना परिस्थितीनुसार, डावपेंच करण्यासाठीं, निष्कारण प्राणहानि टाळण्यासाठीं कांहीं प्रमाणांत माघार घेण्याची मोकळीक दिलीच पाहिजे. जगांतला कोणताहि शहाणा नेता, सैन्यावर इंच–इंचाचें बंधन लादत नाहीं. हिटलरनें स्टॅलिनग्राडच्या लढाईपासून असाच विलक्षण हट्ट धरला. परिणामीं काय झालें, तें आपण पाहतोच. मात्र माघारीबद्दल चिंता बाळगूं नये, याहि टोकापर्यंत जाणें घातक ठरेल. हिमालय ओलांडणें हें चीनचें उद्दिष्ट आहे. त्याला पठारावर यायचे आहे. हें उद्दिष्ट हाणून पाडलेंच पाहिजे. त्यासाठीं जबर किंमत द्यावी लागली, तरी ती दिली पाहिजे. माघार न घेण्याचा एक बिंदु असतोच. तो कोणता, हें संरक्षण–खात्यानें ठरवायचे आहे. मात्र तो बिंदु बाजीप्रभूच्या नि मुरारबाजीच्या निर्धारानें लढविला पाहिजे.

चिनी आक्रमणासमोर भारतीय जवानांना माघार घ्यावी लागल्यामुळें देशांत यत्किंचितहि घबराट पसरलेला नाहीं. पण या माघारीचें आश्चर्य वाटलें, हेंहि नाकारतां येणार नाहीं. याचा दोष सरकारवर पडतो. नेफा भागांत आपली जय्यत तयारी आहे अशा बातम्या संबंधित गोटांतूनच अनेक दिवस प्रसृत करण्यांत येत होत्या. १५ दिवसांपूर्वीं नेफा सीमेवर चिनी सैनिकांनीं आपल्या ठाण्यांवर केलेले कांहीं छोटे हल्ले आपल्या जवानांनीं परतवून लावले. त्यांत चिनी सैनिकांची आपल्यापेक्षां खूपच अधिक हानी झाल्याचें खुद्द पंतप्रधान नेहरू व संरक्षणखात्यानें उच्चरवानें सांगितल्यामुळें, सर्वसामान्य लोकांचा आपल्या सामर्थ्याविषयीं गैरसमज झाला. हे हल्ले चांचणींच्या स्वरूपाचे असून, हिंस्र चिनी हल्ले होण्याचा संभव आहे, अशी सूचना सरकारनें लोकांना देणें आवश्यक होतें. चढाईसाठीं बचावापेक्षां अधिक सैनिक लागतात; कारण चढाई करणारांची हानी अधिक होत असते, हा युद्धांतला नियम आहे. बचावाचा पक्ष मोर्चे बांधून बसलेला असतो. खंदक, तारांची कुंपणें त्यानें तयार केलेलीं असतात. मोक्याच्या जागीं तोफा, मशिनगन्स व रात्रीच्या चढाईविरूद्ध उपयोगी पडण्यासाठीं प्रकाशझोत, त्यानें विचारपूर्वक लावलेले असतात. शत्रूला फसविण्यासाठीं सांपळे रचलेले असतात. या साऱ्या कारणांमुळें बचाव व चढाई यांच्यांतील मनुष्यहानीचें प्रमाण किमान एकास तीन एवढें तरी असतेच. जबर चिनी मनुष्यहानीचा हा अर्थ,

सरकारनें जनतेच्या ध्यानांत आणून द्यायला हवा होता. अशा तऱ्हेची कल्पना न दिल्यामुळें चीन एवढी मुसंडी मारूं शकला, याचा धक्का बसणें स्वाभाविक होतें.

येत्या पंधरवडयांत माघारीच्या आणखीहि बातम्या कदाचित आपणांस ऐकाव्या लागतील. लढाईची सूत्रें नेहमीच चढाई करणाऱ्याचे हातीं असतात. तो आपल्याला हवी ती जागा निवडून तेथें कारवाई करूं शकतो. उलट, बचाव पक्षाला सर्व सीमा संभाळावी लागते. भारताची उत्तर सीमा हजारों मैलांची आहे. त्यामुळें चीनला चढाईचा फायदा मिळणें अपरिहार्य आहे. पण ही चढाई फार काळ चालूं शकणार नाहीं. लौकरच जनरल विंटर (सेनापति हिंवाळा) आपल्या मदतीला येईल. आपल्या सीमा भागांत बर्फ पडून तेथें लष्करी हालचाली अवघड होतील. बर्फ दोन्ही पक्षांना त्रासदायक असला, तरी तो चढाई करणाऱ्यांना अधिक अडचणीचा ठरतो. कारण हालचाल त्याला अधिक करायची असते.

★★★

## यांची खात्री काय ?

सीमेवर गंभीर परिस्थिति निर्माण झाल्यावर, नेत्यांनीं जनतेला एकजुटीची हांक दिली नि या हांकेला आजतरी एवढा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे, कीं कोणाहि सच्च्या भारतीयाचें मन आनंदानें भरून यावें. स्वातंत्र्यशाहीरानें ५० वर्षांपूर्वी वर्णिल्याप्रमाणें 'आसेतु पर्वत उच्चंबळला स्वदेश, वीरकृति धरित टाकुनि दीन वेश' असें अभिमानास्पद दृश्य आज दिसत आहे. प्र. स. पक्ष, समाजवादी पक्ष, स्वतंत्र पक्ष, हिंदुसभा यांनीं विनाशर्त सरकारला पाठिंबा घोषित केला आहे. जनसंघानें तर आपली उत्तर प्रदेशांतली चळवळहि मागें घेतली आहे. माजी सैनिकांपासून संरक्षण कारखान्यांतील नोकरांपर्यंत सर्व लष्करी व मुलकी लोक रणांगणावर जायला व अधिक उत्पादनासाठीं जादा काम करायला तयार आहेत. पहिल्या महायुद्धांत ब्रिटनमध्यें कामगारांनीं जादा काम करायचे नाकारलें, तेव्हां त्यावेळचे पंतप्रधान लॉइड जॉर्ज यांनीं त्यांना अभिनव आवाहन केलें होतें. ते म्हणाले—"मित्रहो, रणांगणावरच्या सैनिकानें जर उद्यां सांगितलें कीं, माझे दिवसाचे सात तास भरले;

आतां मी बंदुक टाकून पिछाडीला जातो, तर युद्धाचें काय होईल?" सुदैवानें आपल्या देशांत असें आवाहन करण्याची वेळच येणार नाहीं, असा विश्वास बाळगण्याएवढा उत्साह व निर्धार जनतेनें प्रगट केला आहे. एक कम्युनिस्ट वगळले, तर काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत यच्चयावत् पक्ष नि जनता आज एकदिलानें राष्ट्र-रक्षणास हातभार लावण्यास सिद्ध झाली आहे. कम्युनिस्टांत मी पंथभेद मानीत नाहीं. कट्टर चीनवादी रणदिवे असोत, दोन्ही डगरीवर हात ठेवणारे डांगे असोत वा रणदिवे-विरोधाचा आव आणणारे सरदेसाई असोत; अखेर कम्युनिस्ट तो कम्युनिस्टच. त्यानें राष्ट्र केव्हांहि श्रेष्ठ मानलें नाहीं. यापुढहि तो मानणार नाहीं. त्याची निष्ठा रशियाला किंवा चीनला !

पण जनतेची ही एकजूट कायम ठेवायची सर्वांत अधिक जबाबदारी पडते खुद्द सरकारवर. आपण एकजुटीनें ज्या माणसाच्या पाठीशीं उभें राहूं, तो मनुष्य अव्यभिचारी निष्ठेनें आक्रमकांशीं सामना करील, याची खात्री जनतेला असली पाहिजे. तशी खात्री आजच्या संरक्षण–मंत्र्यांबद्दल देतां येत नाहीं. पोलंडपासून डंकर्कपर्यंत नि नार्विकपासून मार्सेल्सपर्यंत अर्धा युरोप हिटलरनें आपल्या टांचेखालीं आणला, त्यावेळीं चर्चिलनी गर्जना केली कीं, जिथें शक्य आहे, तिथें हिटलरशीं मुकाबला करूं; इंग्लंड पडलें तर कॅनडांत जाऊन करूं. पण आतां हिटलरला धुळीला मिळविल्याखेरीज थांबणार नाहीं! पण आमचे संरक्षणमंत्री चीनच्या पहिल्या फटक्यांतच बोलते झाले कीं, चीन वाटाघाटी सुरू करीपर्यंत लढत राहूं ! ब्रिटिश मजूर पक्षाच्या बेव्हिन, मॉरिसन आदि नेत्यांनीं चर्चिलच्या स्तुतिपर एक शब्दहि कधीं काढला नव्हता. पण चर्चिलच्या वर्तनानें त्यांची खात्री पटली कीं, हा पुरुष कच खाणारा नाहीं; अवसानघातकीपणा याच्या रक्तांतच नाहीं. आणि हे सारे लोक सर्व मतभेद विसरून चर्चिलच्या नेतृत्वाखालीं काम करायला तयार झाले. आपल्या संरक्षणमंत्र्यांविषयीं अशी ग्वाही देण्याची एकाची तरी छाती आहे काय? युनोंत चीनची वकिली करण्यांत, त्यांच्या जीवनाचा उत्तम काल खर्च झाला. शिवाजीनें शाहिस्तेखानाचें गर्वहरण केल्यावर सिंहगडकडे प्रयाण केलें नि मोंगलांची दिशाभूल करण्यासाठीं कात्रजच्या घाटांत पलिते पेटवून दिले. आपल्या संरक्षणमंत्र्यांनीं अशीच दिशाभूल केली; पण शत्रूची नव्हे, तर स्वजनांचीच! शत्रू ईशान्येकडून येणार हें त्यांना माहीत होते. पण त्यांनीं अखंड ओरड चालविली होती पाकिस्तानविरुद्ध. चिनी विमानांनीं भारतीय नभांगणाचा भंग केल्याच्या तक्रारी झाल्या, तेव्हां मेननसाहेब केवळ कानावर हात

न ठेवतां, राष्ट्रीय चीनला लाखोली वहाते झाले. अशा माणसाच्या निष्ठेबद्दल खात्री कशी वाटावी?

याचबरोबर, आजपर्यंतच्या अक्षरशः हिमालयीन चुकांचे प्रायश्चित्त मेननी कां घेऊं नये? जनरल थिमय्या, जनरल थोरात हे आपले दुसऱ्या महायुद्धांतले अनुभवी सेनानी. त्यांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष अपमान करून त्यांना निवृत्त व्हायला लावले मेननीं. उत्तर सीमा पेटविण्याची चीनची तयारी गेलें वर्ष, दोन वर्षे चालू असतां, खास सीमा–पथक अवघ्या महिन्यापूर्वी तयार झालें, या उशीराची जबाबदारी मेननखेरीज अन्य कोणावर टाकतां येईल? चिनी सैन्य संख्याबलानें वरचढ आहे, अशी तक्रार करण्यांत काय हंशील आहे? आधींपासून अंदाज घेऊन, मेननीं सेनादलें कां वाढविलीं नाहींत? संरक्षणमंत्र्यांनीं शस्त्रास्त्र–निर्मितींत वाढ केल्याचा दावा केला जातो. पण चिनी सामर्थ्याला पुरून उरतील, येवढीं शस्त्रास्त्रें त्यांना पैदा करतां आली नाहींत, हें सत्य आहे. मेननीं कृपलानींसारख्या वृद्ध देशभक्तांना युद्धखोर म्हणून अपमानित केले; जगांतल्या आपल्या मित्रांना निष्कारण दुखावले व आज देशावर ही पाळी आणली. अशा माणसाच्या पाठीमागें उभें राहण्यांत देशाला आनंद कसा वाटेल? मेनन नुकतेच म्हणाले कीं, दुःखाचा कांहीं काळ आपल्याला भोगावा लागेल. भारतीय जनता हीं दुःखें भोगावयास तयार आहे. तिचें म्हणणें एवढेंच आहे कीं, मेननमुळें होणाऱ्या दुःखांची भर यांत पडूं नये! दुसऱ्या युद्धांत पंतप्रधान नेव्हिली चेंबर्लेननीं, ब्रिटिश राष्ट्राला कर्तव्यपालनाचें आवाहन केले, तेव्हां वृद्ध लॉइड जॉर्ज कॉमन्समध्यें उभे राहिले व उद्गारले, "मी पंतप्रधानांच्या आवाहनाशीं सहमत आहे. पण या आवाहनाचा प्रारंभ खुद्द पंतप्रधानांपासून व्हावा. ब्रिटनचा प्राण कंठाशीं आला असतांना राजिनामा देणें हेंच पंतप्रधानांचें कर्तव्य ठरेल." चेंबर्लेननीं राजिनामा दिला. संरक्षणमंत्र्यांकडून भारतीय जनतेची दुसरी अपेक्षा नाहीं.

आक्रमकाला हुसकावून लावण्याच्या कार्यांतील पहिली पायरी, मेननना संरक्षणाची सूत्रें सोडायला लावणें ही आहे, याबद्दल माझ्या तरी मनांत संशय नाहीं. याबरोबरच चिनी आक्रमणाचा दूरदृष्टीनें विचार केला पाहिजे. चिनी राष्ट्र कम्युनिस्ट आहे नि आक्रमण हा कम्युनिझमचा स्वभाव आहे. याचबरोबर हुकुमशाही राष्ट्र विजयावर जगत असल्यामुळें, वाटेल तेवढी हानी सोसूनहि, चीन जिंकलेला प्रदेश दाबून धरण्याची शिकस्त करील, याची पुरेपूर जाणीव ठेवून, आपलें सैनिकी सामर्थ्य

वाढविलें पाहिजे. आपलें लोकविलक्षण परराष्ट्रीय धोरण व संरक्षणमंत्र्यांची बुद्धिपुरस्सर गाफिली, यामुळें आज आपणांवर शत्रूशीं एकाकी मुकाबला करण्याची पाळी आली असली तरी, ती आशियाच्या सेवेची एक महान संधि आहे, असें आपण मानलें पाहिजे. फ्रान्सचें पतन झालें, स्टॅलिन हिटलरला प्रेमपत्रें लिहीत होता नि अमेरिका कुंपणावर बसली होती, त्यावेळीं चर्चिल म्हणाले कीं, ब्रिटन एकाकी लढत असले तरी तें केवळ स्वत:साठीं लढत नाहीं ! भारतहि आज एकाकी लढत असला तरी तो केवळ स्वत:साठीं लढत नाही. चिनी आक्रमणवाद साऱ्या आशियाला ग्रासून उरला आहे. म्हणून चीननें आपल्यावर लादलेली लढाई मध्येंच थांबवितां कामा नये. आपण आतां तयारी करूं, ती अशा आकांक्षेनें कीं, आपल्या सीमा मुक्त होतीलच. पण त्याबरोबरच सारा आशियाहि भीति-मुक्त होईल.

—००—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .......... वि: ..........
क्रमांक .......... नों दि: ..........

# इंद्राय स्वाहा, तक्षकाय स्वाहा

२४ ऑक्टोबर रोजीं चिन्यांनीं लडाखमधील गालवान खोऱ्यावर कबजा बसविला व दुसऱ्या दिवशीं नेफाच्या कामेंग डिव्हिजनमधील तावांग हें महत्त्वाचें ठाणें त्यांनीं काबीज केलें. लोहित डिव्हिजन-मधील किबुतू या ठाण्यापर्यंतहि त्यांनीं मजल मारली. परिस्थिति गंभीर बनली. चिनी सैन्य कोठपर्यंत येणार हेंच समजत नाहीं, असे उद्‌गार मेनन यांच्या तोंडून बाहेर पडले. वार्ताहरांनीं भारताच्या माघारीचीं कारणें विचारतां, मेनननीं सांगितले कीं, चिनी सेना संख्याबलानें व शस्त्रबलानें आपल्यापेक्षां भारी आहे! दि. २५ रोजीं राज्यांच्या माहिती-मंत्र्यांची परिषद दिल्लींत भरली होती. तींत बोलतांना, पंतप्रधान नेहरूंनीं चिनी आक्रमणामुळें निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीचा उल्लेख केला व ते म्हणाले-आपण युद्धकालांतली ब्रिटिश जनता व तिचे थोर नेते विन्स्टन चर्चिल यांचे अनुकरण केले पाहिजे.

२७ ऑक्टोबर, ६२

TOO few men, too few soldiers, too few arms!
१९४० सालच्या जून महिन्यांत, नेपोलियनच्या फ्रेंच राष्ट्रानें हिटलरसमोर शरणांगती पत्करली, तेव्हां मार्शल पेताँ यांनीं पराभवाची मीमांसा केली ती अशी कीं, फ्रान्सपाशीं माणसें कमी, सैनिक कमी नि शस्त्रास्त्रें कमी! आज नेफा आघाडीवर भारताची ससेहोलपट चालू असतांना, संरक्षण खात्यातर्फें हेंच रडगाणें गायिलें जात आहे. प्रत्येक ठिकाणीं म्हणे चिनी सेना संख्येनें अधिक आहे, तिच्यापाशीं शस्त्रास्त्रें अधिक आहेत! असें कां व्हावें? भारताची लोकसंख्या चीनएवढी नसली तरी ती जगांत दुसऱ्या क्रमांकाची आहे. कमी पडत आहेत ते सैनिक नि शस्त्रास्त्रें. ही जबाबदारी कुणाची? दोन वर्षांपूर्वीं संरक्षण-मंत्र्यांनीं संसदेकडे ५० कोटि रुपयांची जादा मागणी केली नि संसदेनें चर्चाहि

न करतां ती मंजूर केली. या खात्यानें अधिक मागणी केली नसेल, तर त्याचें उत्तरदायित्व संरक्षण–मंत्र्यांखेरीज इतरांवर कसें टाकणार? शस्त्रास्त्रें कमी पडली! संरक्षण कारखान्यांतून बिनलष्करी मालाचें प्रचंड उत्पादन झाल्याच्या बढाया गेलीं कांहीं वर्षें आपण ऐकत आहोंत, त्याचा तर हा परिणाम नसेल? खिझेमान हें ठाणें भारत–भूतान–तिबेट या तीन देशांच्या सीमेवर असल्यामुळें, लष्करीदृष्टचा त्याला अत्यंत महत्त्व आहे, हें नकाशा पाहून एकादें पोरदेखील सांगूं शकेल. या ठाण्यांतील आपल्या जवानांच्या पराक्रमाची हकीकत प्रसिद्ध झाली ती अशी कीं, आपले जवान बंदुकीची अखेरची गोळी शिल्लक असेपर्यंत लढले. आणि इतकेंहि करून हें ठाणें अवघे ४ तास लढविले गेलें. हा अजब प्रकार कसा घडला? गेला महिनाभर धोला–खिझेमानच्या आसपास, चिनी फौजा चांचपणीसाठीं छोटे हल्ले करीत होत्या. तरीहि या ठाण्यांत अवघा ४ तास पुरेल, एवढाच दारूगोळा कां ठेवण्यांत आला? आमच्या प्रेतांवरूनच चिनी आक्रमकांना पुढें जावे लागेल, अशा प्रतिज्ञेनें मुकाबला करणाऱ्या आपल्या जवानांवर दारूगोळयाच्या अभावीं माघार घेण्याची पाळी कां यावी? देवगिरीच्या किल्ल्यांत धान्याऐवजीं मिठाची पोतीं भरण्यांत आली, तशाच पद्धतीचा हा प्रकार नव्हे काय? या सर्व घटना एवढया भीषण आहेत कीं, संसदेनें एक खास मंडळ नेमून, या सर्व गाफिलीची त्वरित चौकशी केली पाहिजे. हे प्रकार अज्ञानामुळें झाले, चुकीच्या सल्ल्यामुळें झाले कीं यामागें कांहीं बुद्धिपुरस्सर योजना होती, हें चव्हाटयावर आलें पाहिजे. यामध्यें कांहीं पंचमस्तंभीयांचा हात वावरतो आहे, असाहि दाट संशय निर्माण होतो. पानशेत होण्याची वाट न पहातां, बुजविण्याजोगें बीळ पडलें आहे, तोपर्यंतच त्याचा बंदोबस्त केला पाहिजे. राष्ट्रावर गंभीर प्रसंग ठेपला असतां चौकशीची मागणी कसली करतां, अशी आरोळी संबंधित व देशांतले छुपे चिनीवादी यांच्याकडून ठोकली जाईल, याची मला पूर्ण जाणीव आहे. पण या मागणींत राष्ट्रविरोधी तर कांहीं नाहींच नाहीं, पण लोकशाहीच्या तत्वांशीं, परंपरांशीहि ती पूर्णपणें सुसंगत आहे, हें जनतेनें ध्यानांत घ्यायला हवें. पहिल्या महायुद्धांत तुर्कस्तानांतील गॅलिपोली येथें ब्रिटिशांचा जो फजितवाडा झाला, त्याची चौकशी करण्यासाठीं युद्ध चालू असतांनाच मंडळ नेमण्यांत आलें होतें. पंतप्रधान नेहरूंनीं सांगितलें कीं, हें युद्ध अनेक वर्षें चालेल. पण याचबरोबर हें युद्ध कसायाच्या सुरीच्या पात्यासारख्या धारदार कार्यक्षमतेनें चाललें पाहिजे. आपलें कोठें चुकलें, त्याला जबाबदार कोण, या गोष्टींची पक्की शहानिशा केली,

तरच त्या चुका टळतील; गाफील व पंचमस्तंभी ठिकाणावर येतील.

नेफा आघाडीवरील परिस्थिति चिंताजनक बनली आहे, हें उघड आहे. संरक्षण–खात्यानें तपासून, छाटाछाट करून ज्या बातम्या प्रसिद्धी-साठीं दिल्या आहेत, त्यावरूनहि केवळ चीनचें संख्याबल अधिक आहे, त्यांची शस्त्रास्त्रें अधिक आहेत, यामुळें आपल्याला माघार घ्यावी लागत आहे, हें म्हणणें पटत नाहीं! नेफा भागांतील डोंगराळ प्रदेशाचे कांहीं आलेख (रिलीफ मॅप्स) गेल्या कांहीं दिवसांत वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाले आहेत. त्यावरून हा प्रदेश किती दुर्गम आहे, हें लक्षांत येऊं शकते. असा प्रदेश बचावाला अधिक सोयिस्कर असतो. थोड्या सैन्यांत या प्रदेशाचें संरक्षण करतां येतें. शिवाजीच्या मावळ्यांनीं वेळप्रसंगीं दगडधोंड्यांच्या सहाय्यानें मोंगली सैन्याचें हल्ले परतवून लावले, ते केवळ या डोंगरी प्रदेशाचे सहाय्य घेऊनच. गेल्या महायुद्धांत, दक्षिण इटलींतील कॅसिनो गढीपाशीं, जर्मन सैन्याचे दोस्तांची रोमची वाट दोन महिन्यांहून अधिक काळ अडवून धरली होती. कॅसिनोची उंची ४ हजार फुटांहून कमी आहे व दोस्त सैन्यापाशीं शेंकडों विमानांचे तांडे होते, एवढेंच नव्हे तर आकाशांत त्यांचें निर्विवाद प्रभुत्व होते, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. चिनी सेनेनें अद्याप विमानें वापरलेली नाहींत. तरीहि एवढा बिकट प्रदेश शत्रूनें एवढ्या झपाट्यानें पायदळी कसा तुडविला? तावांगला धोका निर्माण झाल्याची बातमी आली, त्यावेळीं चिनी सेना तावांगपासून १० ते १२ मैलांवर होत्या नि नंतर बारा तास उलटायच्या आंतच तावांग पडल्याची बातमी आली.

भारतीय जवानांच्या शौर्याबद्दल त्यांचा शत्रूहि शंका घेऊं शकणार नाहीं. डोंगरी युद्धांत आपले जवान महशूर आहेत. खुद्द कॅसि-नोच्या लढाईंत कांहीं भारतीय पथकें सामील करण्यांत आलीं होतीं. अॅबिसीनियांतील डोंगराळ प्रदेशांत मराठी फौजांच्या 'हरहर महादेव'च्या गर्जना घुमल्याच्या वार्ता आपण गेल्या महायुद्धांत वाचीत होतो. त्या अजून अनेकांच्या स्मरणांत असतील. हे अनुभवसमृद्ध सैनिक मातृभूमीच्या रक्षणाचे वेळीं कच कसे खातील? इस्त्रायलमध्यें तेल अवीवहून जेरूसलेमला जातांना रस्त्यांच्या कडेला अजूनहि अनेक मोडके ट्रक्स, जीप्स व चिल-खती गाड्या दिसतात. हीं इस्त्रायलच्या स्वातंत्र्य–संग्रामाचीं प्रतीकें आहेत. अरबांनीं जेरूसलेमची कोंडी केल्यामुळें त्या शहराला कुमक पोहोंच-विणें जरूर होतें. पण वाटेंतल्या टेंकड्यांवर (त्यांची उंची कुठेहि २ हजार फुटांवर नाहीं) अरब सैनिक दबा धरून बसले होते. कोंडी फोडून

येणाऱ्या ज्यू सैनिकांवर ते बाजूच्या डोंगरावरून गोळीबार करीत नि त्यांचा निकाल लावत. यामुळें कोंडी फोडतांना शेकडों ज्यू मृत्युमुखीं पडले. उंच जागीं असण्याचा फायदा बचाव पक्षाला मिळालाच पाहिजे. लडाखमध्यें चीननें दाबलेला मुलुख भारतीय सैन्य कां मुक्त करीत नाहीं, या प्रश्नावर सांगण्यांत येत होतें तें असें कीं, चिनी सैन्य उंचावर आहे. तेथें आपल्या जवानांनीं जायचे तर दऱ्यांमधून म्हणजे खोलगट भागांतून जावें लागेल आणि उंचावर असलेले चिनी त्यांचा सहजगत्या बळी घेऊं शकतील ! ठीक आहे. पण नेफामध्यें परिस्थिति नेमकी उलट होती. उंच ठिकाणें व सर्व खिंडी आपल्या हातांत होत्या. चिन्यांना चढाई करायची तर या दऱ्यांमधूनच करणें भाग होतें. आपण उंचावरून त्यांच्यावर मारा करूं शकत होतो! तरीहि नगाधिराजाच्या १–२–३ रांगा ओलांडून अवघ्या आठवडाभरांत चिनी सैनिक तावांगपर्यंत कसे येऊं शकले?

डोंगरी मुलुखाचे अंतर मैलांच्या भाषेंत मोजणें चुकीचें ठरेल! चिनी सेना ७ दिवसांत १५–२० मैल आंत घुसल्या, हा हिशेब आपल्याला खोटया निष्कर्षाप्रत नेईल! कॅसिनो किल्ला पडल्यावर रोमपर्यंत दोस्त सैन्याला जर्मन सैन्य अडवूं शकले नाहीं. शत्रू खैबरखिंड उतरला कीं, दिल्लीपर्यंत त्याचा मार्ग खुला होता, हा आपल्या इतिहासाचा कटु अनुभव आहे. ब्रिटिश सरकारनें वायव्य सीमा–भागांतील संरक्षण–व्यवस्था मजबूत ठेवली होती, ती याचमुळें! हिमालयाच्या कडेकपाऱ्यांतून गंगानदी पठारावर आली कीं, ती शतमुखांनीं सागराकडे धांव घेते! चिनी सैन्यानें हिमालय ओलांडला तर? परिस्थिति खरोखरच चिंताजनक आहे!

चिनी हल्ला येणार हें सर्वसामान्य नागरिकसुद्धां गेलीं २–४ वर्षें बोलत होते. पण आमचे संरक्षण–खातें केवढया जीवघेण्या सुस्तींत होतें, याची जीं अनेक उदाहरणें आहेत, त्यांतच आमच्या संरक्षण-मंत्र्यांना चिनी संख्याबलामुळें बसलेला धक्का, याचा समावेश करावा लागेल. तिबेटमध्यें चिनी शस्त्रास्त्र–निर्मितीचे कारखाने नाहींत. तिबेटमध्यें भारताच्या सीमेपर्यंत येण्यासाठीं एकच रस्ता चीननें तयार केला आहे नि तो ७ ते ९ हजार फुटी प्रदेशांतून व अनेक कडेकपारींतून जातो. चीनला भारताच्या सीमेवर सैनिक व शस्त्रें आणावयाची तर पूर्व व दक्षिण चीनमधून आणावी लागतात. हें अंतर कांहीं हजार मैलांचे आहे. लष्कराची जेव्हां एवढी मोठया अंतरावर हालचाल होते, तेव्हां शत्रूपासून ती बातमी लपविणें अशक्य असतें. गोव्याच्या पोलिस कारवाईसाठीं सुमारें २०० आगगाडया रद्द करण्यांत आल्या. साहजिकच शत्रूच्या हेरांपासून ही

हालचाल लपविणें अशक्य होते. हिटलरनें रशियावर स्वारी करण्यापूर्वी ५ सैन्य-तुकड्या रुमानियांतून बाल्कन्समध्यें नेल्या व तेथील बंड मोडून पुन्हां रुमानियांत परत आणल्या. ही बातमी ब्रिटिश हस्तकांना लागली व त्याच अनुरोधानें पुढें सरकत हिटलरच्या रशियावरील स्वारीची योजना त्यांनीं हस्तगत केली. रशियन सीमेवर कोणत्या व किती जर्मन सैन्य-तुकड्या जमविण्यांत आल्या आहेत, याची बातमी ब्रिटन व अमेरिकेनें स्वारीपूर्वी स्टॅलिनला दिली होती. (पहा-चर्चिलच्या आठवणी; खंड तिसरा. प्रकरण-रशियन नेमेसिस.) आपण फ्रान्समध्यें दुसरी आघाडी उघडत नाहीं, त्यामुळें सर्व जर्मन सैन्य रशियन आघाडीवर ओतण्यांत आले आहे, अशी तक्रार १९४२ सालीं स्टॅलिननें केली, तेव्हां चर्चिलनें ताडकन उत्तर दिले- आपला आरोप खोटा आहे! फ्रान्समध्यें दोस्तांच्या स्वारीच्या भीतीनें ३० जर्मन तुकड्या अडकून पडल्या आहेत! स्टॅलिनला चर्चिलचा शब्द मानावा लागला, कारण चर्चिलनी या तुकड्यांची नांवनिशीवार यादी सादर केली. पोलंडमध्यें, फ्रान्समध्यें व नाझी फौजांनीं व्यापलेल्या इतर युरोपीय देशांत शेंकडों भूमिगत लढवय्ये होते. ते या सर्व बातम्या प्रसंगीं प्राणाची पर्वा न करतां दोस्तांना कळवीत. दोस्त फौजा १९४४ च्या जूनमध्यें नॉर्मंडीत उतरल्या, त्यावेळीं कोणती जर्मन तुकडी कोठल्या भागांत आहे, याची पूर्ण माहिती त्यांना होती. संरक्षण खात्याचें तें कामच आहे. १९३९-४० मध्यें पश्चिम आघाडी शांत होती, त्यावेळीं जर्मन फौजांनीं एक विलक्षण प्रचार-तंत्र अंमलांत आणले होते. सीमेवर त्यांनीं ध्वनिक्षेपक बसविले होते. या भागांत गस्तीसाठीं एक फ्रेंच पथक बदलून दुसरें आले कीं, ते त्या पथकाचें, त्याच्या अधिकाऱ्यांचीं नांवें घेऊन ध्वनिक्षेपकावरून स्वागत करीत! फ्रेंच सैनिक चपापत व आपल्या हालचालींची बित्तंबातमी शत्रूला कळतें, या जाणीवेनें त्यांचे अवसान खचे. सुदैवानें आपल्या देशांत हजारों तिबेटी लोक आहेत. यांतले अनेक लोक चिन्यांशीं लढलेले आहेत. त्यांचे भाईबंद, मित्र, नातेवाईक अद्याप तिबेटांत आहेत. या तिबेटींचा योग्य उपयोग करून घेतला असता, तर चिनी हालचालींची अगाऊ माहिती आपल्या संरक्षणखात्याला मिळणें अशक्य नव्हतें. गेल्या युद्धाच्या ज्यांना आठवणी असतील, त्यांनीं त्यांना थोडा उजाळा द्यावा! लढाईला तोंड लागलें कीं, एकदोन दिवसांतच शत्रूच्या कोणत्या तुकड्या आघाडीवर लढत आहेत, याच्या बातम्या येत. शत्रूला तोंड देतांना, त्याची तयारी किती आहे, आपल्याशीं सामना देणारे कोण आहेत, याची माहिती प्रथम मिळविली जाते. हेरांकडून आधीं बातम्या आलेल्याच असतात. चकमकींना

प्रारंभ झाला कीं, त्या बातम्यांचा सच्चेपणा पडताळून घ्यावा लागतो. तेरावी जर्मन डोंगरी तुकडी लढते आहे हें आम्ही ओळखलें आहे, अशा बातम्या ब्रिटिश पत्रकांत आपण वाचल्या असतील. उत्तर सीमा पेटल्याला एक आठवडा झाला. संरक्षणमंत्र्यांनीं १५ हजार चिनी सैन्य असल्यापासून प्रारंभ केला नि पंतप्रधान ३० हजारापर्यंत आलेले आहेत. या पलीकडे कांहींहि तपशील आलेला नाहीं. त्यामुळें एक भारतीयानें ४ चिनी मारले, अशा शाळेंतल्या तोंडी हिशेबासारख्या हास्यास्पद बातम्या संरक्षण–खातें देत आहे. देशाची हिंमत वाढविणाऱ्या या बातम्या नव्हेत! पण यापेक्षां निराळें कसें व्हावें? तिबेटी लोकांना आपण अस्पृश्यांप्रमाणें दूर ठेवले! कां? तर चीनच्या जुलुमाला कंटाळून ते इकडे आले म्हणून. चीन आपलीं दारें खडाखडा ठोठावीत असतांनाहि तिबेटींचा उपयोग करून घेण्याची बुद्धि आपणांला झाली नाहीं! 'हिंदी–चीनी भाईभाई'नें आम्ही आमचे हात बांधून घेतले होते !

★★★

## दलाई लामांचा प्रश्न

याच अनुरोधानें दलाई लामांच्या भारतांतील आगमनाचा विचार करणें आवश्यक आहे. दलाई लामांना भारतानें आसरा दिला, त्यामुळें भारत–चीन तंटा उद्भवला, असा प्रचार चीन व भारतांतले चिनी हस्तक संधि साधेल तेथें करीत असतात! परवां मुंबईच्या कामगार–सभेंत आचार्य अत्र्यांनीं 'चीनची चटणी' करण्याची गर्जना केली; आणि त्याच दमांत, भारतानें दलाई लामांना आश्रय देण्यांत घोडचूक केली, असें सांगून टाकले! रणदिवे–डांगे–सरदेसाई प्रभृति रूसो–चिनी हस्तकांचा अत्र्यांच्या भोळसट मनावर केवढा जबरदस्त पगडा आहे, याचा हा ठोक पुरावा आहे. म्हणे दलाई लामा भारताच्या आश्रयाला आला! मग कुणाच्या आश्रयाला त्यानें जायचे? चीन व भारत ही आशियांतील दोन मोठी राष्ट्रें. यापैकीं चीननें चेंगीझखानाचा अवतार धारण केला आहे. अशा स्थितींत छोट्या राष्ट्रांनीं, सहिष्णु व उदारधि म्हणून हजारों वर्षें ख्याति पावलेल्या भारताकडे नाहीं पहायचे तर कोणाकडे पहायचे? नेपाळचे राजे त्रिविक्रम यांचेवर राणे लोकांनीं दबाव आणला, तेव्हां ते भारताच्याच आश्रयाला आले ना? ब्रह्मदेशांत कम्युनिस्ट बंडखोरांनीं अराजक निर्माण केले, तेव्हां एक दिवस पंतप्रधान ऊ नू उठले नि नेहरूंकडे

येऊन त्यांनी बंदुकींची मागणी केली, ही खुद्द ऊ नूंनी सांगितलेली गोष्ट अत्र्यांच्या कानावर कोणी घातली नाहीं काय? जंगली जनावरांचा अभ्यास केलेल्या लोकांनीं, त्यांनीं वारंवार पाहिलेलें दृश्य नमूद करून ठेवलें आहे. हरणांच्या कळपामागें वाघ, सिंह किंवा लांडगे लागले कीं, हीं हरणें हत्तींच्या कळपांच्या दिशेनें पळतात. हत्तींनाहि या भयभीत हरणांचा वास येतो नि ताबडतोब ते पुढें घुसून सिंहांच्या मार्गांत उभे रहातात व हरिणांना आपल्या पाठीशीं घालतात! येवढीहि दर्याद्रं बुद्धि आपल्यापाशीं नसावी? काका, मला वांचवा, म्हणून बाल नारायण पळत आला, तेव्हां राघोबादादानें त्याला वांचविण्याऐवजीं सुमेरसिंग, खरगसिंगाच्या हातीं दिला! त्याचाच कित्ता भारतानें गिरवायला हवा होता, असें अत्र्यांचें मत आहे? या संबंधांत आणखीहि एक वस्तुस्थिति लक्षांत ठेवायला हवी. दलाई लामांनीं एप्रिल १९५९ मध्यें भारताचा आसरा घेतला. पण त्यापूर्वीं ज्या ज्या वेळीं ते दिल्लीला आले होते, त्या त्या प्रत्येक वेळीं त्यांनीं तिबेटला परत न जाण्याचा निश्चय नेहरूंपाशीं बोलून दाखविला होता. पण नेहरूंना चीनबद्दल आशा वाटत होती नि म्हणून दरवेळीं आग्रह करून नेहरूंनीं दलाई लामांना तिबेटला जाण्यास उद्युक्त केले होते. याचाच अर्थ, दलाई लामांची एक प्रकारे नैतिक जबाबदारी आपण पत्करली होती. ती पार पाडायला नको होती, असें अत्र्यांना वाटतें? आणि त्याहीपलीकडे प्रश्न असा कीं, आशियांतल्या छोटया राष्ट्रांच्या स्वातंत्र्याची आपण काळजी वाहणार नसूं, तर भारताच्या स्वातंत्र्याचा उपयोग काय? चिनी क्रांतीचे वाढदिवस साजरे करण्यासाठीं कीं क्रुशेवची टोलेजंग स्वागतें करण्यासाठीं ?

* * *

## सर्वोत्तम क्षण

परिस्थिति गंभीर आहे. खरोखरच गंभीर आहे. ज्या नगाधिराजानें या पुण्यभूमीचे हजारों वर्षें रक्षण केलें, त्या नगाधिराजाला आमच्या संरक्षण-मंत्र्यांच्या कल्पनाशून्य व गाफील धोरणांमुळें, आक्रमकासमोर नतमस्तक होण्याची पाळी आली आहे! मात्र देशांत घबराट झालेला नाहीं. पंतप्रधानांनीं ब्रिटिश राष्ट्राची नि चर्चिलची आठवण करून दिली. चर्चिलनीं ब्रिटिश राष्ट्राला, फ्रेंच पतनाच्या त्या काळरात्रीं संदेश दिला कीं,

बंधूंनो, आपल्या कसोटीचा क्षण आला आहे! असें वर्तन करूं कीं, जगाच्या अंतापर्यंत लोक म्हणत रहातील कीं, हाच यांचा सर्वोत्तम क्षण होता (This was their finest hour)! भारतीय जनतेचाहि हा सर्वोत्तम क्षण ठरेल. पण त्यासाठीं तिनें प्रथम मनाची तयारी केली पाहिजे कीं, आतां इंद्राय स्वाहा नि तक्षकाय स्वाहा ! आपणहि असें वर्तन करूं कीं, सर्वांनीं म्हटलें पाहिजे–शाबास पठ्ठ्यांनों! केवळ आक्रमकांनाच पिटाळून लावले नाहींत, तर ज्यांच्यामुळें देशावर संकटें कोसळली त्या पंचमस्तंभी-यांचाहि निःपात केलात !

—oo—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... विः ....................
क्रमांक .................... नों. दि. ....................

# संरक्षण-मंत्र्यांचा पोलादी पडदा !

चिनी चढाईच्या पहिल्या पांच दिवसांतच, आपलें लष्करी दौर्बल्य अनावृत झाले. चिन्यांशीं मुकाबला करणाऱ्या भारतीय जवानांपाशीं पहिल्या महायुद्धांतल्या रायफली आहेत व हिमालयीन थंडींत अनेकांपाशीं पुरेसे उबदार कपडेहि नाहींत, या गोष्टी उजेडांत आल्या. २५ ऑक्टोबरला दिल्लींत राज्यपालांची परिषद भरली होती. त्या पाठोपाठ संसदीय काँग्रेस पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक झाली. या दोन्ही बैठकींत, संरक्षणाबाबत देशाला संपूर्ण अज्ञानांत ठेवले गेले, अशा कडक तक्रारी करण्यांत आल्या. दरम्यान, आचार्य कृपलानींनीं ज. थिमय्या, ज. थोरात आदि माजी सेनापतींना कामावर बोलविण्याची जाहीर सूचना केली व अनेकांनीं ती उचलून धरली. काँग्रेस संसदीय पक्षाच्या बैठकींत या सूचनेविषयीं बोलतांना नेहरू म्हणाले कीं, माजी सेनानींना कामावर बोलावणें अशक्य आहे. त्यांत 'प्रोटोकॉल'ची अडचण येईल.

१ नोव्हेंबर, १९६२

कम्युनिस्ट कार्यपद्धतीचे, आपल्या संरक्षणमंत्र्यांवरील संस्कार एवढे खोलवर रुजले आहेत कीं, पंतप्रधानांनीं त्यांना काँग्रेसच्या तुपांत तळलें नि ससदीय लोकशाहीच्या साखरेंत घोळलें, तरी या कारल्याचा कडवटपणा गेलेला नाहीं. संरक्षण–मंत्रीपदावर आरूढ होतांच, मेनननीं या खात्यासमोर पोलादी पडदा उभारला. संरक्षण–व्यवस्थेबाबत, परकीय ब्रिटिश राजवटीएवढीच गुप्तता, स्वतंत्र भारतांतहि ठेवण्यांत आली. संसदेंत लष्कराचा अर्थसंकल्प मंजूर होण्याचे वेळीं, देशाच्या रक्षणाची व्यवस्था कशी काय, असें विचारले जाई नि संरक्षणमंत्री ठरलेलें उत्तर देत–'आलबेल'! या पलीकडे या खात्यानें कधीं कांहीं माहिती दिली नाहीं. उत्तर सीमेवर संकट उभें राहिले, पण देशाला संपूर्ण अंधारांत ठेवलें गेलें, अशी तक्रार नुकतीच अनेक काँग्रेस

खासदारांनीं केली. आपल्याकडचे ताजे उदाहरण काकासाहेब गाडगीळांचे आहे. महिन्यापूर्वी मुंबईंत केलेल्या एका भाषणांत काकासाहेब म्हणाले– लेखण्या मोडा नि बंदुका धारण करा, असा संदेश एका (अद्याप कांहीं लोकांना सावरकरांच्या नांवाचेसुद्धां वावडे आहे!) साहित्यिकानें दिला होता. पण मी मात्र बंदुका बाजूला ठेवून लेखण्या सरसावा, असें सांगणार आहे! काकासाहेबांच्या भाषणाला दोन आठवडे लोटले नाहींत, तोंच देशांत बंदुका धारण करण्याचा आवाज घुमतो आहे ! काकासाहेबांना खिजविण्यासाठीं मी हें लिहीत नाहीं. पण काकासाहेब परवापर्यंत पंजाब-सारख्या एका सीमा–प्रांताचे राज्यपाल होते. त्यांच्या श्रेणीच्या अधिकाऱ्यांनाहि संरक्षण–मंत्र्यांनीं किती अंधारांत ठेवलें होतें, याचा हा पुरावा दिला, एवढेंच.

आतां लडाखपासून नेफापर्यंत सारी उत्तर सीमा पेटल्यानंतरहि, हा पोलादी पडदा ढिला होण्याची चिन्हें दिसत नाहींत. आघाडीवरील आपल्या जवानांच्या शौर्याच्या कथा भारताच्या कानाकोपऱ्यांत घुमविण्यास वृत्तपत्रांचे वार्ताहर सिद्ध आहेत. पण आघाडीवर जाण्याची परवानगी मिळविण्यासाठीं त्यांना आंदोलन करावें लागत आहे! पहिल्या ४ दिवसांत आपले किती जवान मृत वा जायबंदी झाले, याचा आंकडा राजाजींसारख्या माजी गव्हर्नर जनरलनें मागितला. पण अमेरिकेंतील 'बाल्टिमोर सन'नें हा आंकडा प्रसिद्ध करीपर्यंत, संरक्षण–खात्याला जाग येऊं शकली नाहीं. लढाई पेटून १२ दिवस झाले. लढाईच्या छायाचित्रांनीं वृत्तपत्रें ओसंडून जायला हवी होती. पण संरक्षण–खात्यानें १–२ निर्जीव छायाचित्रांखेरीज वृत्तपत्रांचे हातीं कांहीं दिलें असेल, तर शपथ ! डंकर्कच्या वेळीं ब्रिटिश वृत्तपत्रें छायाचित्रांनीं भरून गेली होती ! ब्रिटिश नौका बुडत असल्याची छायाचित्रें ब्रिटिश पत्रांनीं छापलेलीं आहेत. माघारीची चित्रें आहेत, म्हणून लोकशाहींत घाबरायचे काय कारण ? यांतूनच मनें मजबूत होतात. जीं जनता उद्यां रणांगणावर जाणार, तिला या चित्रांतून एक प्रकारचें शिक्षण मिळतें. जे लोक पराभव पाहूं शकतात, तेच विजयाची आकांक्षा बाळगूं शकतात, 'नेफा' मध्यें भारताची कांहीं अनुभवी व बहाद्दर पथकें लढत आहेत. अद्यापपावेतों एकाहि पथकाचें नांव जाहीर करण्याची बुद्धि संरक्षणखात्याला झालेली नाहीं. या नांवांत आतां कसलेंहि गुपित राहिलेलें नाहीं. शत्रूनें आपले जवान मारले, कैद केले, आपलीं ठाणीं जिंकलीं. यानंतरहि कोणती पथकें त्या भागांत आहेत, याची माहिती शत्रूला मिळाली नसेल, असें समजणें हास्यास्पद आहे. मग आम्हांला त्यांचीं नांवें कां

सांगत नाहीं ? जनतेला कळूं द्या कीं, खिझेमान ठाणें अखेरची बुलेट शिल्लक असेपर्यंत लढविलें तें डोग्रा पलटणीनें. जनतेला समजूं द्या कीं, चिनी संख्याबलापुढें माघार घ्यावी लागली ती कुमांव रेजिमेंटला. मराठा, राजपूत, महार, जाट, मद्रासी अशा बहाद्दर पलटणी या आघाडीवर लढत आहेत. त्यांचीं नांवें आम्हांला ऐकूं द्या. भारत स्वतंत्र झाल्याला १५ वर्षें झाली. आपल्या सैन्य–दलानें अनेक लोकोपयोगी कामें केली. पण, हें कठोर सत्य आहे कीं, मनानें, सर्वसामान्य जनता सेनादलापासून अलगच राहिली आहे. ही उणीव नाहींशी करण्याची, जनता व सैन्य–दलें यांच्यांत तद्रूपता निर्माण करण्याची अनमोल संधि आज चालून आली आहे. आम्हांला त्या पलटणींची नांवें द्या. त्यांच्या अधिकाऱ्यांची नांवें सांगा ! लढाईपूर्वीं सांगा असें म्हणत नाहीं; पण शत्रूला त्यांचा सुगावा लागल्यावर तरी विलंब करूं नका. आज त्यांच्या पदरीं माघार येत आहे. ठीक आहे. पण माघारीतल्या त्यांच्या शौर्याच्या कथा, आमच्या हृदयांत प्राणापलीकडे जतन करून, आम्हीं उद्या म्हणणार आहोंत–अरे हीच ती मराठा रेजिमेंट. वालाँगला लढली. आतां ती शत्रूवर प्रतिहल्ला करीत आहे. शत्रूला ती हुसकावून लावल्याखेरीज रहाणार नाहीं ! पण आमचें संरक्षण खातें बातम्या देतें आहे कीं, एक एन. सी. ओ. (नॉन कमिशन्ड ऑफिसर) लढला; जनकोजी शिंद्याच्या पराक्रमानें लढला. संरक्षण–मंत्र्यांनीं दिलेली ३०३ ही जरीपुराण रायफल घेऊन लढला. तरीहि त्यानें ८ चिनी सैनिक ठार केले नि मगच वीरमरण पत्करलें. संरक्षणखात्याची खरोखर धन्य आहे ! त्यानें या बहाद्दराला ८ चिन्यांना माती चारतांना पाहिले; स्वतः गोळी खाऊन मृत्यूला कवटाळ-तांना पाहिलें; पण त्याला त्याचे नांव समजले नाहीं ! बातमी-बरोबरच नांव आले असतें तर त्याच्या मातापितांच्या, नातेवाईकांच्या नि इष्टमित्रांच्या डोळ्यांतून दुःखाश्रूंबरोबर आनंदाश्रूंचेहि पूर लोटले असते. त्याचें नांव ज्यांना ज्यांना माहीत होते, त्या त्या सर्वांच्या हृदयांत देशप्रेमाचा कल्लोळ उडाला असता. नि तीं तीं माणसें नि तीं तीं घरें पेटून निघाली असती. एक अभिमन्यू, एक तानाजी, एक जनकोजी, एक विश्वासराव अजूनहि आमच्या हृदयाच्या तारा छेडूं शकतो. आजहि असे अभिमन्यू निर्माण होत आहेत. पण संरक्षण–मंत्र्यांच्या कल्पनाशक्तीचें इतकें दिवाळें वाजलें आहे कीं, हा सारा पराक्रम व्यर्थ चालला आहे ! कोणी सांगावें ? संरक्षणाच्या प्रांतांत आपल्याखेरीज इतर कुणाचेंहि नांव ऐकूं येऊं नये, अशीच त्यांची इच्छा असेल !

संरक्षण–मंत्र्यांच्या गाफिलीमुळें सर्व सीमेवर भारतीय सैन्याला माघार आली, तेव्हां मेनन यांच्या कांहीं बगलबच्चांनीं व छुप्या रूसो–चिनी हस्तकांनीं, सेनापतींना ठपका देण्याचा उद्योग सुरू केला आहे. माघार कां आली ? तर म्हणे सेनापतींनीं तोंडघशीं पाडलें ! चार आठवड्यांत नेफाचा कडेकोट बंदोबस्त करण्याचें आश्वासन एका सेनानीनें दिलें होतें; पण तो म्हणे तें पाळूं शकला नाहीं ! ! इतकें धादान्त असत्य विधान करण्याची कम्युनिस्टांखेरीज अन्य कोणाचीहि हिंमत झाली नसती. नेफा आघाडी दुर्बल आहे; तथील संरक्षण–व्यवस्था कितीतरी पटींनीं मजबूत करायला हवी, असा आक्रोश झाडून सारे सेनापति गेलीं किमान चार वर्षें करीत होते. ही ४ वर्षांची उणीव ४ आठवड्यांत ब्रह्मदेव तरी भरून काढूं शकेल काय ? नेफांतल्या उणीवा आतां स्पष्ट झाल्या आहेत. सीमेपर्यंत जायला चांगले रस्ते नाहींत; सैनिकांची संख्या कमी आहे; आहेत त्या सैनिकांपाशीं आवश्यक तीं शस्त्रें नाहींत; जीं आहेत, त्यांच्या-साठींसुद्धां पुरेसा दारूगोळा नाहीं. हे रस्ते, हे सैनिक, ही शस्त्रें नि हा दारूगोळा, कोणता सेनापति ४ आठवड्यांत निर्माण करणार होता ? आणि एकाद्या होयबानें तसें तोंडदेखले सांगितलें असेल, तरी ५ वर्षें मंत्रि-पदावर राहूनहि, त्यांतील अशक्यता लक्षांत येण्याइतका उमज संरक्षण–मंत्र्यांना आलेला नाहीं ? सेनापतींच्या अंगावर ओरडणें, त्यांचेवर भेकडपणाचा आरोप करणें हीं हिटलरी तंत्रें आहेत. पण हिटलरशीं तुलना कशाला करूं ? कहाँ राजा भोज और कहाँ . . . . . . !

ज्या मेनन–बगलबच्चांनीं सेनापतींवर क्षुद्र आरोप केले, त्यांना मी कांहीं मोजके सवाल करूं इच्छितो. नेफा–तिबेट सीमेवर, गेल्या युद्धांत अँग्लो–अमेरिकनांनीं बनविलेले कांहीं विमानतळ होते. ते दुरुस्त करून वापरांत कां आणले गेले नाहींत ? या दुर्गम प्रदेशांत जलद वाहतुकीसाठीं किमान ३ ते ४ डझन हेलिकॉप्टर्स लागतील, ही मागणी संरक्षण–मंत्र्यांनीं कां धुडकावली ? रशियन हेलिकॉप्टर्स कमअस्सल आहेत, असा स्पष्ट इषारा तज्ज्ञांनीं दिला असतांहि, डझनभर रशियन हेलिकॉप्टर्सच कां आणण्यांत आलीं ? पहिल्याच चकमकींत हीं लाल हेलिकॉप्टर्स कुचकामी ठरलीं, हें खरें आहे कीं नाहीं ? अशा स्थितींत नेपोलियन तरी विजय मिळवूं शकला असता काय ? प्रिय वाचक ! यांतील कोणतीहि माहिती आतां गुप्त राहिलेली नाहीं. सीमेवरील विमानतळ चिन्यांच्या हातीं पडले आहेत नि हेलिकॉप्टर्सचे पराक्रम आपण ऐकलेच आहेत ! अशा संरक्षण–मंत्र्याला पंतप्रधान पाठीशीं घालू पहात आहेत ! पंतप्रधानांचें

हें मित्रप्रेम कौतुकास्पद असलें, तरी राष्ट्र–रक्षण ही कांहीं कुणाची व्यक्तिगत मालमत्ता नव्हे, कीं कोणा एकाच्या मैत्रीखातर तिचा बळी द्यावा !

★★★

## हीं काय प्रोटोकॉलचीं वेळ ?

आचार्य कृपालानींनीं जुन्या व जाणित्या सेवानिवृत्त सेनापतींना कामावर बोलावण्याची सूचना केली, तेव्हां याबाबतींत 'प्रोटोकॉल' आड येईल, असें पंतप्रधानानीं सांगितल्याचें प्रसिद्ध झालें आहे ! जुन्या सेनापतींना बोलावलें तर विद्यमान सेनाधिकाऱ्यांच्या वरिष्ठ–कनिष्ठतेचा प्रश्न निर्माण होईल अशी अडचण पंतप्रधानांनीं सांगितली. शांतता–कालांत वरिष्ठ–कनिष्ठतेचा विचार योग्य आहे. पण राष्ट्र जीवन–मरणाच्या संग्रामांत गुंतलें असतां असले विचार मनांत आणणें ही मानसिक धैर्याच्या अभावाची खूण मानली पाहिजे; दुर्दैवानें !

गेल्या अर्धशतकांत, जीं पाश्चात्य राष्ट्रें, एकामागून एक अशा दोन अतिभीषण महायुद्धांतून गेली, त्या राष्ट्रांनीं असले वरिष्ठ–कनिष्ठतेचे विचार मनांतसुद्धां आणले नाहींत. घ्या कांहीं उदाहरणें. विसाव्या शतकाच्या प्रारंभीचा ब्रिटिश आरमाराचा कालखंड हा सर जॉन फिशरचा कालखंड मानला जातो. फिशरना प्रचंड युद्धनौका बांधण्याचें व त्यांवर मुलुखमैदान तोफा उभारण्याचें वेड होतें. सरकारकडून घेतां येईल त्या मार्गानीं त्यांनीं पैसा घेतला व प्रचंड ब्रिटिश आरमार उभें केलें. पण १९१० च्या प्रारंभीं, कांहीं एका प्रकारामुळें, राजिनामा देऊन ते निवृत्त झाले. पहिल्या महायुद्धाचे ढग जमूं लागले, तेव्हां ब्रिटिश मंत्रिमंडळाची पुनर्घटना झाली व चर्चिलकडे आरमार–मंत्रिपद आलें. चाळीस वर्षांच्या तरुण चर्चिलनी ब्रिटिश आरमाराच्या साऱ्या अधिकाऱ्यांचें कसून निरीक्षण केलें नि मनाशीं एक निर्णय घेतला. युद्धाच्या नौबती वाजूं लागतांच, चर्चिलनी सन्मानानें लॉर्ड फिशरना बोलावून आणलें व त्यांच्या हातीं पुन्हां पूर्वींचेच अधिकार म्हणजे आरमाराधिपति हें पद दिलें. (पहा–चर्चिलचें दि वर्ल्ड क्रायसिस; प्रकरण–ॲट दि ॲडमिरॅल्टी.)

जर्मन फील्ड मार्शल फॉन हिंडेनबुर्ग यांची कथा याहून निराळी नाहीं.

मराठी ... ग्रंथ संग्रहालय ... शाखा

पहिल्या महायुद्धापूर्वीचे प्रबल जर्मन लष्करी-यंत्र उभारण्यांत ज्यांनीं मोठी कामगिरी केली, त्यांत हिंडेनबुर्गच्या नांवाचा समावेश करावाच लागेल. वृद्धापकाळामुळें हिंडेनबुर्ग १९११ सालीं निवृत्त झाले. १४ सालीं युद्ध सुरू झाले नि जर्मनीच्या दोन्ही आघाड्या पेटल्या. पश्चिम आघाडीवर जर्मन सैन्यानें विजयी चाल केली, तर तिच्या पूर्व सीमेवर संख्येनें प्रचंड असलेल्या रशियन सैन्य-दलांचे हल्ले झडूं लागले. पूर्व आघाडी कोसळणार कीं काय, अशी चिंता जर्मन लष्करी गोटांत निर्माण झाली. हिंडेनबुर्गना तार गेली–मार्शल, तयार आहांत? कांहीं तासांतच पूर्व आघाडीचा सरसेनापति म्हणून हा निवृत्त सेनापति पूर्वेकडे निघाला. सेनाधिकाऱ्यांचे मनोधैर्य खच्ची होण्या-ऐवजीं वर्धिष्णु झाले. टॅनेनबर्गच्या लढाईंत रशियन सेनांचे अक्षरश: पानिपत झालें नि मार्शल हिंडेनबुर्ग जर्मनीचे राष्ट्रपुरुष बनले! (पहा–चर्चिलचें ग्रेट काँटेपररीज.)

१९३९! दुसरें महायुद्ध. या वेळपर्यंत जर्मन सेनापति-वर्गाची परंपरा कायम होती. हे सेनापति स्वत:च्या कामांत कमालीचे निष्णात असत; राजकारणांत ढवळाढवळ करीत नसत; पण स्वाभिमानाला कुणालाहि धक्का लावू देत नसत. फील्ड मार्शल गेर्ड फॉन रुंडस्टेड हा याच परंपरेतला सेनापति. हिटलरचा सैन्यांतील हस्तक्षेप त्याला नापसंत होता; म्हणून १९३८ च्या प्रारंभी राजिनामा देऊन तो निवृत्त झाला. रुंडस्टेडविषयीं एक गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. हिटलर व नाझी चळवळ याविषयीं त्याला चुकूनहि कधीं सहानुभूति वाटली नाहीं. लष्करी बाबतींतली आपलीं मतें हिटलरला तो स्पष्टपणें ऐकवी. खाजगी संभाषणांत तर तो हिटलरला कॉर्पोरल (पहिल्या युद्धांत हिटलर कॉर्पोरल होता) म्हणे व त्याच्या 'ब्राऊन शर्ट' संघटनेची 'ब्राऊन डर्ट' अशी हेटाळणी करी. नाझी राजवटींत हिटलरच्या कानावर या गोष्टी गेल्याच असल्या पाहिजेत. तरीहि हिटलर हे व्यक्तिगत अपमान विसरला व त्याच्या मनांत युद्धाचा निर्णय ठरल्या-बरोबर, त्यानें अनेक आर्जवे करून रुंडस्टेडला परत आणला व त्याचे हातीं पोलंडच्या मोहिमेंतील एक महत्त्वाचा सेनाविभाग दिला. रुंड-स्टेडला परत आणल्यामुळें जर्मन सेनाधिकाऱ्यांत कसलीहि चलबिचल झाली नाहीं. उलट, कट्टर नाझींसह सर्व सेनाधिकाऱ्यांच्या आदराचे तो स्थान ठरला. (पहा–कॅप्टन लिडेल हार्ट यांचें दि अदर साइड ऑफ दि हिल; प्रकरण–हिटलर्स जनरल्स.)

युरोपीय महायुद्धांचा इतिहास तपशीलवार तपासला तर अशी कित्येक उदाहरणें आढळतील. निवृत्त सेनापतींना परत आणले, तर शक्य आहे कीं,

एकाददुसऱ्या सेनाधिकाऱ्याचें मन दुखावेल. पण जे सेनापति अनुभवसमृद्ध आहेत, ज्यांना जवानांच्या नि जनतेच्याहि हृदयांत स्थान आहे, अशा सेनापतींचे हातीं लढाईचीं सूत्रें दिली, तर माघारीच्या या कालांतहि आपल्या अंतिम विजयाबद्दल एक प्रकारचा आवश्यक आत्मविश्वास देशांत निर्माण होईल. करिअप्पा हा जवानांच्या श्रद्धेचा विषय आहे. थिमय्या हा काश्मीरच्या झो-जिला खिंडींत रणगाडे चढविणारा पुरुष आहे; तर थोरातांनीं कोरियांत चिन्यांचा बंदोबस्त करतांना आपल्या शक्ति व युक्तीची प्रचीति आणून दिली आहे. या सेनापतींबद्दल, संरक्षण-मंत्र्यांच्या मनांत कांहीं किल्मिषें आहेत, म्हणून राष्ट्रांचें नुकसान होऊं द्यायचें? हिटलरसारखा हुकुमशहा मनाचा जो मोठेपणा दाखवूं शकतो, तो आमच्या लोकशाहीला दाखवितां येऊं नये?

★★★

चिनी आक्रमणामुळें भारतांत नवराष्ट्र निर्माण होत आहे. सर्व पक्ष नि पुढारी आपले तात्त्विक मतभेद विसरून नि व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवून, सरकारच्या पाठीशीं खडे ठाकले आहेत. आणि जनतेचा उत्साह तर काय वर्णावा? आग्या मोहोळावर दगड बसावा अशा त्वेषानें चिनी स्वारीमुळें भारतीय जनता उठली आहे. असें म्हणतात कीं, जनतेच्या लायकीप्रमाणें तिला पुढारी मिळतात. भारतीय जनतेनें आपली योग्यता सिद्ध केली आहे. पण आपलें नेतृत्व? लोक तसे नेते, या सन्मान्य नियमाला भारतीय लोकशाही अपवाद न ठरावी!

—oo—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...३४६०६... दि: ...
क्रमांक ...९४५८... कॅ. दि. ९-३-६३

# ' ८ सप्टेंबर ' हा तर पांढरा बावटा !

२५ ऑक्टोबरला तावांग पडल्यामुळें परिस्थिति फारच गंभीर झाली. २६ ऑक्टोबरला राष्ट्रपतींनी देशांत 'आणीबाणीची परिस्थिति' जाहीर केली. मात्र, तावांग व किबुतू घेऊन चिनी सैन्यानें आपली चढाई थांबविली. 'नेफा' आघाडीवर सांगण्यासारखें कांहीं घडलें नाहीं, अशी सरकारी पत्रकें वृत्तपत्रांत दिसूं लागली.

चीननें २० ऑक्टोबरची मोठी चढाई सुरू करण्यापूर्वी, भारत–चीन वाटाघाटींसाठीं, चिनी सैन्य ८ सप्टेंबर रोजीं जेथें होतें, तेथपर्यंत त्यानें माघारी जावें, अशी अट भारत सरकारनें घातली होती. पण चीननें लडाख व नेफांत भारताचे अनेक सैनिक मारून प्रचंड प्रदेश घशाखालीं घातल्यावर, वाटाघाटींची भाषा बंद झाली पाहिजे, अशी मागणी लोक करूं लागले. गृहमंत्री शास्त्रींनीं अलवार येथें (२१ ऑक्टोबर) बोलतांना, आमच्या मातृभूमीचा इंचन इंच आम्ही मुक्त करूं, अशी ग्वाही दिली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं चौपाटीवर भरलेल्या विराट सभेंत (२८ ऑक्टोबर) "शरीरांत अखेरचा रक्तबिंदू शिल्लक असेपर्यंत लढत राहूं" अशी गर्जना केली. आकाशवाणीवरून राष्ट्राला आवाहन करतांना (२२ ऑक्टोबर) 'आम्ही आक्रमणासमोर मान वाकविणार नाहीं' अशी घोषणा खुद्द पंतप्रधान नेहरू यांनीं केली. मात्र प्रत्यक्षांत भारत सरकार आपल्या ८ सप्टेंबरच्या योजनेलाच चिकटून बसले. देशोदेशींच्या सरकारांना पंतप्रधानांनीं जीं पत्रें पाठविलीं, त्यांत चिनी सेना ८ सप्टेंबर रेषेपर्यंत मागें हटेल तर भारत सरकार वाटाघाटीस तयार आहे, असें त्यांनीं म्हटलें होतें.

६ नोव्हेंबर, १९६२

'पश्चिम आघाडीवर सामसूम!' पहिल्या महायुद्धांत लोकप्रिय झालेला हा वाक्यप्रयोग आहे. ब्रिटिश खाडीवरील डंकर्कपासून, स्वित्झर्लंडपाशीं फ्रेंच-जर्मन सीमा मिळतात तेथपावेतों ५०० मैलपर्यंत सुमारें

१०-१० लक्ष जर्मन नि अँग्लो-फ्रेंच सेना खंदक खणून बसल्या होत्या. तारांची जाळीं, तोफा, मशिनगन्स यामुळें हे खंदक म्हणजे अभेद्य भिंती बनल्या होत्या. मोठी चकमक उडाली कीं अनेक दिवस दोन्ही बाजू पुढच्या चकमकीची तयारी करीत स्वस्थ बसत. या दिवसांत जर्मन युद्ध-पत्रक झळके तें असें– पश्चिम आघाडीवर सामसूम! चीननें २० ऑक्टोबर रोजीं पहाटें नव्या आक्रमणाला प्रारंभ केला नि पहिल्या ५ दिवसांतच तावांग व किबुतू व्यापल्यानंतर, लढाई थांबल्यासारखी दिसत आहे. 'नेफा आघाडीवर सामसूम' अशीं पत्रकें गेले कांहीं दिवस आपण वाचीत आहोंत. चीनच्या हल्ल्याचा जोर खरोखरच ओसरला काय? मन अस्वस्थ करणारा हा प्रश्न आहे. भारतीय लष्करांत इंजीनियर असलेल्या माझ्या एका मित्राला मी परवां म्हणालों–पहा, तुम्ही नेफांत रस्ते बांधले नाहींत नि आपल्या सैन्याला माघार घ्यावी लागली! त्यानें उत्तर दिले– माफ करा महाशय; उलट आमचे आभार माना! रस्ते बांधले असते, तर चिनी सेना आणखी झपाट्यानें पुढें आली असती! या थट्टेंतील मतितार्थ तेवढा ध्यानांत घ्यायचा! तिबेटमधील चिनी तळांपासून तावांग–किबुतूपर्यंत यायला रस्ते नाहींत. हमालांकरवीं किंवा खेंचरावरूनच रण-साहित्याची नेआण करावी लागते. ती करण्यांत चिनी सेना गुंतली आहे. तावांग व किबुतूंत पुरेसे सांठे व सैन्य आल्याशिवाय ते पुढें घुसणार नाहींत.

चिनी चढाईचा आपल्या बाजूनें विचार केला तर काय दिसतें? भारतीय सेनादलांना चिनी आक्रमणाची कुणकुण लागलेली असली, तरी ही चढाई नेमकी कोणत्या भागांत होणार, याचा अंदाज करणें अवघड होतें. चढाई करणाऱ्याला हा फायदा मिळतोच. आपली उत्तर सीमा २५०० मैलपर्यंत पसरलेली आहे. शत्रू त्याला पाहिजे तें ठिकाण निवडून, तेथें मोठ्या संख्येनें घाव घालूं शकतो. आपल्या हल्ल्याचा खरा रोख कोठें आहे हें समजूं नये, यासाठीं आणखी ४–२ ठिकाणीं तो हल्ल्याच्या हुली देतो. त्यामुळें आघाडीवरील आपल्या सेना-प्रमुखाला खरा हल्ला कोणता, हें ध्यानांत येईपर्यंत वाट पाहणें भाग असतें. पण शत्रूच्या चढाईचा रोख समजल्याबरोबर, त्या ठिकाणीं मोठें सैन्य पाठवून त्याला हुसकून लावले पाहिजे. कोणतेहि सैन्य, एकादें ठाणें घेतलें कीं, तेथें खंदक खणायला, तोफा, मशिनगन्स बसवायला सुरवात करतें. त्या ठाण्याचें किल्ल्यांत रूपांतर करायचा त्यांचा प्रयत्न असतो. म्हणूनच असें म्हटलें जातें कीं, शत्रू एकाद्या ठिकाणीं ३ तास बसला कीं, त्याला तेथून हुसका-यला ३ दिवस लागतात नि ३ दिवस बसला कीं, त्याला हुसकणें ही

३ आठवड्यांची कामगिरी ठरते! नेफांतील चिनी हल्ल्याचा पवित्रा साधारणपणें स्पष्ट झाला आहे. 'नेफा'मधून भारतांत प्रवेश करण्यासाठीं मोठ्या खिंडी दोन. एक खिझेमान–तावांग मार्गे व दुसरी लोहित विभागांतील किबुतू–वालाँगमार्गे. या दोन्ही खिंडींवर चिनी फौजांनीं ताबा मिळविला आहे. तावांग येथून बोमदिलामार्गे ते तेझपूरला येऊं शकतात व किबुतू येथून वालाँगा मार्गे ते आसामांतील नागा प्रदेशांत उतरूं शकतात! यासाठीं तावांग व किबुतूमधून त्यांना हुसकवणें हें आपलें नजीकचें उद्दिष्ट होय ! म्हणून त्वरित प्रबळ प्रतिहल्ले होणें आवश्यक होते. अशा प्रतिहल्ल्यांसाठीं, झपाट्यानें इकडून तिकडे हलवितां येईल, अशा राखोव सैन्याची (मोबईल रिझर्व्हज) आवश्यकता असते. असें सैन्य आपल्यापाशीं किती आहे, यावर नोव्हेंबर अखेरपर्यंतच्या नेफांतील लढाईचा रागरंग अवलंबून राहील. सीमाभागांत बर्फ पडायला प्रारंभ झालाच आहे. १५ नोव्हेंबर–पासून सैन्याच्या मोठ्या हालचाली अशक्य होण्याएवढी बर्फवृष्टि सुरू होईल. पण चिनी सेनेला १५ दिवस आणखी मुदत दिली पाहिजे. तिबेटच्या १० ते १५ हजार फूट उंचीच्या प्रदेशांत रहाण्याचा त्या सेनेला सराव आहे (ॲक्लिमटाइज्ड). त्यामुळें बर्फांतहि ते थोड्याफार हालचाली करूं शकतील. नोव्हेंबर अखेरपूर्वीं त्यांचा आणखी एक मोठा हल्ला यावा, अशी कल्पना आहे. हा हल्ला थोपवून धरून आपण चिन्यांना तावांग-किबुतूपाशींच रोंखलें, तर खुशाल खुषी मानायला हरकत नाहीं. त्या पलीकडे जाऊन तावांग व किबुतूमधून आपल्या जवानांनीं चिन्यांना हुसकून लावलें, तर खरोखरच उत्सव करायला हवा. कारण हिमालयाच्या खिंडींची अलीकडील दारें आपण धरून ठेवलीं, असा त्याचा अर्थ होईल. राखीव सैन्याचा मुद्दा निघाला म्हणून सांगायला हरकत नाहीं कीं, काँगो व गाझा या दोन ठिकाणीं, तेथें आंतरराष्ट्रीय पोलिसी करण्यासाठीं आपले बरेच (सुमारें १० ते १२ हजार) अनुभवी सैन्य अडकलें आहे.

★★★

## शांततेची चढाई

पण डिसेंबरपूर्वींच्या चिनी सैन्याच्या चढाईपेक्षां सध्यांची लढाई थांबल्यानंतर होणारी कम्युनिस्ट शांतता चढाई (पीस ऑफेन्सिव्ह) अधिक भयावह ठरेल! आपल्याला जो मुलुख हवा तो पदरांत पाडून घ्यायचा नि मग शांततेसाठीं हात पुढें करायचा ही आक्रमक राष्ट्रांची

ठरलेली पद्धत आहे. चीन त्याला अपवाद कसा ठरेल ? चीन एकामागोमाग योजना सुचवील. आपण एक फेंटाळली तर दुसरी सुचवील. आपल्यामुळें भारत नाखुष आहे असें दिसलें, तर रशियामार्फत सुचवील. पण आपल्याला वाटाघाटींना प्रवृत्त करण्याचा आटोकाट प्रयत्न करील. आणि याच संबंधांत, आपली ८ सप्टेंबर योजना आपल्याला जाळ्यांत अडकवण्याचा धोका आहे. चीननें आपल्या पाठींत खंजीर खुपसला तरी अजून आपलें सरकार नि आपला युनोंतला प्रतिनिधि ८ सप्टेंबरचा घोष कां करीत आहेत? ८ सप्टेंबर ही अशी काय 'लक्ष्मण रेषा' आहे कीं, जी चिन्यांनीं ओलांडल्यामुळें पृथ्वी इकडची तिकडे व्हावी? ताजें आक्रमण सुरूं करण्यापूर्वी चीन नाहींतरी निराळें काय मागत होता ? आम्ही व्यापलेला लडाखचा प्रदेश सन्मानपूर्वक आम्हांला द्या व त्याच्या बदल्यांत मॅकमहॉन रेषा मान्य नसली तरी आम्ही नेफांत स्वस्थ बसूं, हेंच चीनचें म्हणणें होतें ना? तें आतां मान्य करणार असाल, तर एवढ्या जवानांचें रक्त कशासाठीं सांडलेत? एवीतेवीं लडाखचें उदक आपल्याला सोडायचें आहे, तर देशांत एवढी धूम कशासाठीं मचावीत आहांत? फाळणीच्या वेळीं जिनांसह अनेकांनीं शांततापूर्ण 'लोकसंख्येच्या अदलाबदली'ची योजना सुचविली होती. पण धार्मिक पायावर फाळणी करायची नाहीं, असें सांगून आपण ती योजना फेंटाळलीत. पुढें लाखों निरपराध जिवांची हत्या झाली, हजारों संसार उध्वस्त झाले, तेव्हां आपण फाळणीला तयार झालांत नि फाळणी व लाखोंची हत्या या दोन्ही पापांचे धनी झालांत! त्याच 'महान मुत्सद्देगिरीचा' नवा अवतार प्रगट करण्याचा आपल्या सरकारचा विचार आहे काय?

'आठ सप्टेंबर योजना' हा शुद्ध पांढरा बावटा आहे. चिन्यांच्या मुजोर आक्रमणापुढें ती शरणांगति आहे. चेंबरलेन हिटलरशीं म्युनिक-करार करून आला नि हंसतमुखानें त्यानें जगाला सांगितलें कीं, मी सन्मानासह शांतता आणली (पीस वीथ ऑनर) ! पण ही शांतता नसून शरणचिठी होती, असा स्वच्छ निर्वाळा इतिहासानें दिला आहे. झकोस्लोव्हाकियाचें उदक सोडल्यानें हिटलरची भूक भागली नाहीं. लडाखचा भाग घेऊन चिनी बकासुराची भूक भागेल असें मानणें, हा खुळेपणाचा गौरीशंकर ठरेल! जगांतल्या कोणत्याहि आक्रमकाला एकच गोष्ट समजूं शकतें; ती म्हणजे तुमची ताकद, तुमची हिंमत, तुमची पोलादी इच्छाशक्ति!

यासाठीं पहिली गरज आहे ती सरकारनें युद्धहेतु जाहीर करण्याची. चीननें आक्रमण करून पवित्र हिमालय रक्तलांच्छित केला, आपला

प्रदेश ताब्यांत घेतला नि आपल्या योजना उलथ्यापालथ्या केल्या. अशा स्थितींत तुम्ही त्यांच्याशीं संग्राम सुरू केलात, तो कोणतें उद्दिष्ट मनांत ठेवून? डंकर्कच्या पाडावापूर्वी (मे १९४०) चर्चिलनीं संयुक्त मंत्रिमंडळ बनविल्यावर ब्रिटिश कॉमन्ससभेंत जें पहिलें भाषण केलें, त्यांत त्यांनीं कांहीं सांगितलें असेल, तर तें म्हणजे युद्धहेतु. ते म्हणाले-तुम्ही विचारता सरकारचें धोरण काय? मीं सांगेन युद्ध करणें. सागरांतून, हवेंतून, जमिनीवरून; आमच्या सर्व साधनसामुग्रनिशीं नि ईश्वरानें आम्हांला दिलेल्या सर्व शक्तीनिशीं. हेंच आमचें धोरण. तुम्ही विचाराल तुमचें उद्दिष्ट कोणतें? मी एका शद्बांत उत्तर देईन–विजय! पडेल ती किंमत देऊन मिळणारा विजय. केवढयाहि भयप्रदतेंतून मिळणारा विजय. मार्ग केवढाहि प्रदीर्घ असला तरी तो आक्रमून मिळणारा विजय !

चर्चिलचें कोणतेंहि पाऊल या घोषणेशीं अणुमात्र विसंगत पडलें नाहीं. फ्रान्सच्या पाडावानंतर, गोअरिंगच्या विमानदलानें (लुफ्त वाफ) इंग्लंडवर बाँबची धार धरली, पण ब्रिटिश सरकारच्या मनांत वाटाघाटींचा विचारहि डोकावला नाहीं. सरकारच्या या धीरोदात्त वर्तनामुळें जनतेचाहि केवढा मजबूत युद्ध-निश्चय झाला होता, याचें एक अद्‌भुत उदाहरण विल्यम शिरर या अमेरिकन लेखकानें नमूद केलें आहे. फ्रान्सच्या शरणागतीनंतर हिटलरची खरोखरच ब्रिटनवर स्वारी करण्याची इच्छा नव्हती. ब्रिटन व ब्रिटिश जनता यांच्याबद्दल त्याला सुप्त आदर होता. ब्रिटिश साम्राज ही जागतिक स्थैर्यासाठीं एक अत्यावश्यक गोष्ट आहे, असें तो मनापासून म्हणे ! ब्रिटन वा ब्रिटिश साम्राज्य यांची एक तसूभरहि भूमि जर्मनीला नको; पण ब्रिटननें युरोपांत हस्तक्षेप करू नये, या अटींवर ब्रिटनशीं समझोता करायला हिटलर आनंदानें तयार झाला होता. आपली ही इच्छा अनेक मध्यस्थांमार्फत त्यानें ब्रिटिश सरकारच्या कानावर घातली होती. पण तेथें फारसा प्रतिसाद मिळेना म्हणून त्यानें एक जाहीर भाषण करून, ब्रिटिश जनतेला आवाहन करण्याचें ठरविलें. १९ जुलैचें (१९४०) तें भाषण. हिटलर म्हणाला, " या क्षणीं माझ्या सद्सद्‌विवेकबुद्धीला साक्ष ठेवून, ब्रिटनमधील सारासार विचाराला आवाहन करणें हें मी माझें कर्तव्य समजतो. ब्रिटनचें थोर साम्राज्य नष्ट करण्याची वा त्याला धक्का लावण्याची कल्पनासुद्धां मला करवत नाहीं. इत:पर युद्ध कां चालावें हेंच मला समजत नाहीं." हिटलरच्या भाषणांत त्याचा नेहमीचा आक्रस्ताळेपणा नव्हता, तर त्याच्या आवाजांत विलक्षण मार्दव होतें, असें हिटलरचा एक अमेरिकन चरित्रकार ॲलन बुलक यानें लिहून ठेवलें आहे. मुसोलिनीचा

जांवई काऊंट किआनो याच्या दैनंदिनींतील नोंद याहीपेक्षां विलक्षण आहे. तो म्हणतो, हिटलरचें भाषण ऐकून मुसोलिनी अत्यंत अस्वस्थ झाला. हिटलरची ही योजना ब्रिटन स्वीकारील व मग ब्रिटनच्या साम्राज्याची लूट करण्याचें आपलें स्वप्न उध्वस्त होईल, या विचारानें त्याच्या मनांत काहूर माजलें. विल्यम शिरर या भाषणाला हजर होता. (अमेरिका यावेळपर्यंत युद्धांत उतरली नव्हती.) त्यानें नाझी अधिकाऱ्यांची प्रतिक्रिया विचारली, तेव्हां हिटलरनें पुढे केलेला हात ब्रिटन स्वीकारील, अशीच प्रत्येकाची खात्री असल्याचें त्याला आढळून आलें !

यानंतर शिरर थेट जर्मन ब्रॉडकास्टिंग हाऊसकडे निघाला. हिटलरच्या भाषणाचें प्रतिवृत्त त्याला बिनतारीनें अमेरिकेस धाडावयाचे होतें. पण ब्रॉडकास्टिंग हाऊसमध्यें तो पोहोंचतो न पोहोंचतो, तोंच बी. बी. सी. (ब्रिटिश नभोवाणी) चें जर्मन भाषेंतील निवेदन त्याच्या कानीं पडले ! हिटलरची योजना ब्रिटननें निर्धारपूर्वक फेंटाळली होती. हिटलरचें भाषण झाल्यापासून एक तासापेक्षांहि कमी वेळांत ब्रिटनचें उत्तर घोषित झालें होतें. ब्रिटिश सरकारच्या या तत्परतेबद्दल, अनेकांनीं सरकारचें अभिनंदन केलें, तेव्हां चर्चिलनीं जाहीरपणें सांगितलें कीं, या तत्परतेचें श्रेय सरकारला नसून नभोवाणीला आहे ! सरकारला विचारण्यापूर्वींच नभोवाणीच्या अधिकाऱ्यांनीं हिटलरची योजना धुडकावून लावली ! ( पहा–विल्यम शिररकृत राइज अँड फॉल ऑफ थर्ड राइश. प्रकरण-अर्ली व्हिक्टरीज.) आकाशवाणीचें अधिकारक्षेत्र काय असावें, याविषयीं चर्चा करण्याचा येथें हेतु नाहीं. विजय मिळेपर्यंत लढण्याचा निर्धार यच्चयावत् ब्रिटिश जनतेच्या रोमरोमांत कसा भिनला होता, हें दाखविणें एवढाच या उदाहरणाचा हेतु ! इतिहासानें निर्वाळा दिला आहे कीं, ब्रिटनच्या या केवळ निर्धारामुळें हिटलरचें ब्रिटनवरील स्वारीचें अवसान गळालें व तोंड फिरवून तो रशियाकडे वळला !

चीनशीं मुकाबला करायचा तो या ब्रिटिश निर्धारानें आपण केला पाहिजे. शत्रू सीमापार होईपर्यंत कसल्याहि वाटाघाटी करणार नाहीं, असें निःसंदिग्ध वचन जाहीरपणें सरकारकडून मिळालें पाहिजे. जनता युद्ध–प्रयत्नाबाबत अभूतपूर्व उत्साह दाखवीत असली, तरी तिच्या मनांत अजूनहि संशयाची पाल चुकचुकते आहे, हें नाकारतां येणार नाहीं. याची प्रचीति हवी असेल, तर कोणीहि स्वतःच्या छातीवर हात ठेवून पहावा !

पंतप्रधानांपासून आपल्या मुख्यमंत्र्यांपर्यंत अनेक श्रेष्ठींनीं 'अखेरच्या

रक्तबिंदूपर्यंत लढण्याच्या' केवढयाहि आवेशपूर्ण घोषणा केल्या, तरी जोपर्यंत ८ सप्टेंबरची काळी योजना पाताळांत गाडली जात नाहीं, तोंपर्यंत जनतेच्या मनांतली अस्वस्थता नष्ट न होणें अपरिहार्य आहे. शत्रूच्या संपूर्ण शरणांगतीपर्यंत वाटाघाटींचीं भाषा करणें, याच्याएवढें अवसानघातकी कृत्य असूंच शकत नाहीं. जवानांचें रक्त सांडल्यामुळें, शत्रूनें आपला प्रदेश बळकावल्यामुळें नीतिधैर्य खच्ची होत नसते. वाटाघाटींच्या भाषेमुळें मात्र युद्धप्रयत्नांत शिथिलता आल्यावांचून रहात नाहीं ! गेल्या युद्धांतल्या फ्रान्सच्या पाडावापूर्वींच्या अवस्थेचें चिंतनीय वर्णन आंद्रे मोर्वानें आपल्या ग्रंथांत (ए हिस्ट्री ऑफ फ्रान्स) केलें आहे. मोर्वा म्हणतात–हिटलरशीं सुरू केलेलें युद्ध आपलें सरकार अखेरपर्यंत लढणार आहे, यावर फ्रेंच कामगार वा फ्रेंच मध्यमवर्ग यांचा विश्वासच नव्हता. सरकारच्या आधींच्या वर्तनामुळें, तें तडजोडीनें युद्ध मिटवील, अशी त्यांची भावना होती. साहजिकच युद्ध जिंकण्याची जिद्द, विजयाची ईर्षा फ्रेंच जनतेंत अभावानेंच तळपत होती !

हा गंभीर इषारा आहे. हा इषारा मोर्वाचा नव्हे, तर इतिहासाचा आहे. कसोटीचा क्षण आलेला आहे. ही कसोटी जनतेची नसून नेत्यांची आहे. आक्रमकांशीं तडजोड करून, या राष्ट्राला अधिक मरगळ आणणार कीं शत्रूचीं हाडें खिळखिळी करून, नवें चैतन्यशाली राष्ट्र निर्माण करणार?

सरकार ! आपल्या निःसंदिग्ध घोषणेसाठीं आम्ही अधीर झालों आहोंत !

—००—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम .................. दि: ..................
क्रमांक .................. नों दि ..................

# दगाबाजांशीं तडजोड कसली ?

**नेफांतील भारतीय सैनिकांच्या ससेहोलपटीला संरक्षणमंत्री श्री. कृष्ण मेनन हेच जबाबदार आहेत, हें उघड झाल्यावर, स्वाभाविकच त्यांच्या उचलबांगडीची मागणी सर्वत्र सुरू झाली. या स्वयंस्फूर्त आंदोलनाला अल्पावधींतच एवढा वेग चढला कीं, १ नोव्हेंबरला पंतप्रधानांनीं संरक्षणखातें स्वतःकडे घेतले. मात्र संरक्षण–उत्पादन खातें त्यांनीं मेननकडे ठेवले व त्यांचे कॅबिनेटचे सभासदत्वहि कायम राखले. या बदलामुळें माझ्या कामांत कसलाहि फरक झालेला नाहीं, असा खुलासा, दुसरे दिवशींच मेनन यांनीं केला व जनतेचीहि तीच भावना झाली. यामुळें आंदोलन कमी न होतां उलट तें अधिकच उग्र झालें. संसदीय काँग्रेस पक्षाच्या बैठकींत मेननविरोधाचे रान पेटलें व ७ नोव्हेंबर रोजीं, मेनन यांचा मंत्रिपदाचा राजिनामा आपण स्वीकारला असल्याचे पंतप्रधानांना जाहीर करावे लागले. १४ नोव्हेंबरला श्री. यशवंतराव चव्हाणांची नवे संरक्षणमंत्री म्हणून नेमणूक झाल्याची घोषणा झाली.**

**दरम्यान, कम्युनिस्ट व सहप्रवाशांनीं ८ सप्टेंबर योजनेचा फायदा घेऊन तडजोडीचा प्रचार सुरू केला. भाववाढीसारखे प्रश्न पुढें करून युद्धावरून जनतेचें लक्ष उडविण्याचा प्रयत्नहि ते करू लागले.**

१२ नोव्हेंबर, ६२

भारताच्या गेल्या बारा वर्षांच्या इतिहासांत, सरदार पटेलांचें निधन ही सर्वांत दुर्दैवी घटना मानली, तर कृष्ण मेनन यांचें उच्चाटन ही सर्वांत शुभकारी घटना मानावी लागेल. सरदार पटेल हयात होते, तोपर्यंत मेननची भारतांत येण्याची प्राज्ञा नव्हती. पण सरदारांच्या मृत्यूनंतर घरांत कलि शिरावा, त्याप्रमाणें मेननने भारताच्या सरकारांत प्रवेश केला. पंतप्रधान नेहरूंच्या अलिप्तता व शांततावादाचे प्रवक्ते म्हणून ते जगभर हिंडले; पण भारताच्या हितचिंतकांच्या मनावर आपल्या जहरी जिभेचे

घाव घालण्याखेरीज त्यांनीं दुसरें कांहींहि केलें नाहीं. जीं सैन्यदलें अनेक अडचणींतून सरदार पटेलांनीं राजकारणातीत राखलीं, त्या सैन्यदलांत मेननरनी कम्युनिस्ट राजकारण घुसविलें. हल्लींच्या सैन्याला प्रत्यहि नवनव्या शस्त्रांचें व नवनव्या तंत्रांचें शिक्षण द्यावें लागतें. म्हणून सैन्याला रस्ते व घरें बांधण्यासारख्या कामाला जुंपूं नका, असें ज. थिमय्यांनीं परोपरीनें सांगितलें व मेनन ऐकेनात, तेव्हां त्या मानी पुरुषानें राजिनामा दिला. त्यावेळीं मेननर्नीं पंतप्रधानांचे कान फुंकले व त्यांच्याकरवीं भर लोकसभेंत थिमय्यांची बदनामी करविली. कम्युनिस्टी तंत्राप्रमाणें ज. थोरातांनीं थिमय्यांचा निषेध करावा, ही मेनन यांची इच्छा धुडकावून लावल्यामुळें थोरातांसारख्या राजकारणाशीं चुकूनहि संबंध न ठेवणाऱ्या लोकप्रिय सैनिकाला, मेननरनी सेना–प्रमुख हें पद मिळूं दिलें नाहीं. मेननरनी शस्त्रास्त्र-उत्पादनांत क्रांति घडवून आणली, असे नगारे त्यांच्या भक्तांकडून वाजविण्यांत आले; पण सीमेवरील आपले जवान शस्त्रास्त्रांची मागणी करीत आहेत, असें खुद्द राष्ट्रपतींनीं सांगितल्यामुळें, मेनन यांचें हेंहि पितळ उघडें पडलें आहे. अशा माणसाच्या पतनाबद्दल छात्या पिटणारे लोकच, शेख अब्दुल्लांना मिठ्या मारीत होते, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. मेनन यांच्या पाडावा-मुळें, केंद्रीय मंत्रिमंडळांत विचारांची एकतानता निर्माण होईल. नियोजित संरक्षण मंडळांतील थिमय्या-थोरात-राजेंद्रसिंहजी-कटारी या माजी सेना-नींची शक्ति, मेनन यांच्या हेकटपणाशीं झगडण्यांत खर्च न होतां, संरक्ष-णाच्या प्रश्नांवर सर्व लक्ष त्यांना केंद्रीभूत करतां येईल. मुळावर घाव घाला कीं फांद्या आपोआप खालीं येतील, असा संदेश पहिल्या बाजी-रावानें दिला होता. मेननच्या पाडावामुळें, सेनादलांत व इतरत्र पसरलेल्या या विषवृक्षाच्या शाखा आतां आपोआप लोटांगणें घालू लागतील. मेनन-वर अविश्वास म्हणजे पंतप्रधानांवर अविश्वास, अशी परवांपर्यंत गर्जना करणारा एक मराठी राणा भीमदेव, मेननना कै. (?) मेनन असें संबोधूं लागला आहे, हें आपण पाहिलेंच आहे!

ज्या कम्युनिस्ट चीनशीं आपण संगर मांडला आहे, त्या चीनबद्दल मेनन यांच्या मनांत इतके मऊ कोपरे आहेत कीं, अशा आणीबाणीच्या काळांत त्यांना सरकारांत ठेवणें ही घातक घोडचूक ठरली असती. पहिल्या महायुद्धांतली एक आठवण लॉइड जॉर्जनीं दिली आहे. लॉर्ड हाल्डेन लष्करी विषयांत तज्ज्ञ असल्यामुळें त्यांना मंत्रिमंडळांत घेण्याचा पंतप्रधान ॲस्क्विथ यांचा मानस होता. पण हाल्डेन जर्मनीला 'अध्यात्मिक गुरु' मानीत. त्यामुळें त्यांना सरकारांत स्थान देण्यास सक्त विरोध करण्यांत आला व

पंतप्रधानांनीं तो मानला. याहीपलिकडे जाऊन ब्रिटिश जनता, ज्या इसमांचीं नांवें जर्मन आहेत, ज्यांचे जर्मनीशीं कोणत्याहि प्रकारचे संबंध आहेत, त्यांचाहि युद्धकार्याशीं संबंध येऊं देण्यास विरोध करूं लागली. ज्या राष्ट्राची सहिष्णुतेबद्दल जगांत ख्याति आहे व ज्या राष्ट्रानें गेल्या शेंकडों वर्षांत पारतंत्र्य ही चीज अनुभवली नाहीं, तें राष्ट्र युद्ध-कार्याबाबत एवढी दक्षता घेते; तर ज्या राष्ट्राच्या कपाळावर हजार वर्षें गुलामीचा शिक्का होता व ज्या राष्ट्राच्या इतिहासांतले पानन् पान फितुरीच्या उदाहरणांनीं भरलेलें आहे, त्या राष्ट्रानें केवढी दक्षता घ्यायला पाहिजे? कम्युनिस्टांचा इतिहास सांगतो कीं, दुसऱ्या कम्युनिस्ट राष्ट्राशीं लढतांना, ते स्वतःच्या देशाशीं कधींहि निष्ठावंत राहिलेले नाहींत. भारतांतल्या कम्युनिस्टांना व त्यांच्या], 'भाईभाई'ना युद्ध-कार्यापासून दूर ठेवले, तर त्या कार्यांत कसलीहि उणीव भासण्याचें कारण नाहीं.

राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् यांनीं सांगितलें कीं, चीननें भारताचा विश्वासघात केला. ते म्हणाले कीं, भारत सरकार चीनशीं वाटाघाटी करीत असतांनाच चीननें स्वारी सुरू केली ! चिनी आक्रमण हिटलरी पद्धतीचे असून, चीन आधुनिक हिटलर बनला आहे, असे उद्गार पंतप्रधानांनीं काढले. या श्रेष्ठींचे हे उद्गार खरे असतील, तर वाटाघाटींच्या भाषेशीं त्यांचा मेळ कसा बसवायचा? ८ सप्टेंबरची योजना, राष्ट्रपति व पंतप्रधानांच्या जळजळीत भावनेशीं सुसंगत कशी ठरते? मानवन राष्ट्रांचा चालू शतकांतला इतिहास सांगतो कीं, विश्वासघातक्यांशीं, दगलबाजांशीं वाटाघाटी करण्याचा विचारहि त्यांनीं मनांत आणला नाहीं. पर्ल बंदरावर हल्ला होण्यापूर्वी जपानी आरमाराच्या संशयास्पद हालचाली चालू आहेत, याचा सुगावा अमेरिकन सरकारला लागला होता. पण अमेरिकेंतील तटस्थतावादी लोकमत एवढें प्रबल होतें कीं, आपण जनतेला सावध केलें, तर आपल्यावरच युद्धखोरीचा आरोप येईल, अशी भीति प्रे. रूझवेल्ट व ज. जॉर्ज मार्शल यांच्यासारख्यांना वाटली. मात्र जपानच्या विश्वासघातकी हल्ल्याची बातमी येतांच, जनमतानें एवढी पलटी खाल्ली कीं, रॉबर्ट शेरवुड (रूझवेल्ट अँड हॉपकिन्स खंड पहिला) लिहितात—व्हाईट हाऊसमध्यें अमेरिकेच्या कानाकोपऱ्यांतून तारांचा अक्षरशः पाऊस पडला. अमेरिकन राष्ट्र युद्धाला खडे ठाकले व त्यानें तडजोडीचा विचारहि मनांत आणला नाहीं. या निर्धारांतूनच बिनशर्त शरणागतीची मागणी पुढें आली व अमेरिकेसारखे मानवतावादी राष्ट्रहि एवढें पेटलें कीं, हिरोशिमा व नागासाकी या जपानी शहरांना अणुबाँबचा

प्रसाद चाखावा लागला ! हिटलरनें रशियावर अचानक हल्ला चढविला तेव्हां स्टॅलिननें घोषणा केली ती हिटलरच्या जर्मनीला मूठमाती देण्याची (डेथ टू हिटलराइट जर्मनी) ! आणि ही घोषणा त्यानें शब्दशः खरी केली. भाई डांगे म्हणाले कीं, कोणतेहि युद्ध तडजोडीनेंच थांबत असतें ! भाई डांग्यांनीं रूसो-जर्मन युद्धाच्या वेळचीं स्वतःचीं भाषणें बासनांतून काढावीत व पोलिसांच्या संरक्षणाखालीं कामगार मैदानावर तीं वाचून दाखविण्याचे श्रम घेण्याऐवजीं, 'शिवशक्तीं'तल्या आपल्या शिष्योत्तमाला तीं ऐकवावींत !

भारताच्या मैत्रीला चीननें विश्वासघातानें उत्तर दिलें असेल तर चीनशीं वाटाघाटी करण्याचा प्रश्न उद्‌भवतोच कसा ? ज्या नेहरूंनीं, मुसोलिनी फ्रँकोला शस्त्रें पुरवितो म्हणून त्याची भेट घेण्याचें नाकारलें, ते नेहरू भारताच्या पाठींत खंजीर खुपसणाऱ्या चिनी हिटलरशीं बोलणीं कशीं करूं इच्छितात ? साऱ्या आशियासमोर चीननें आपलें वस्त्रहरण केलें आहे ! त्या चिनी दुर्योधनाची मांडी फोडून त्याला भारताच्या सीमेबाहेर फेंकून दिल्याशिवाय, सन्मानपूर्ण शांतता लाभेल, असें तुम्हांला वाटूं शकतेच कसें? म्हणून आजचा पहिला महत्त्वाचा प्रश्न, ८ सप्टेंबरच्या योजनेला, चीनशीं सध्यां कोणत्याहि प्रकारच्या वाटाघाटी करण्याच्या विचारांना तिलांजलि देणें हा आहे. अशा वेळीं मार्क्सवादानें पछाडलेला एकादा पंडित उठला व 'जितं मया'च्या आविर्भावांत 'पण भाववाढीचें काय करणार, बोला' असें तडजोड-विरोधकांना विचारूं लागला, तर त्याला काय सांगणार ? कप्पाळ ? पुण्याच्या टिळक तलावांत एकादा मुलगा गटांगळ्या खाऊं लागला कीं, त्याला काढण्यासाठीं आजूबाजूचे तरुण पाण्यांत उड्या टाकतात. अशा वेळीं, 'अरे तुम्ही त्याला वांचवतां आहांत खरें; पण त्याच्या लग्नाला भाड्याचा हॉल मिळेल कीं नाहीं, याची कांहीं चौकशी केलीत कां' असें एकादा आजोबा किंचाळूं लागला तर, त्याला काय म्हणायचें ?

★★★

# सुधारणेचें साधन

पाश्चिमात्य लोकशाही राष्ट्रांचा इतिहास असें सांगतो कीं, जीं युद्धें लोकयुद्धें (पॉप्युलर वॉर्स) ठरलीं, त्यावेळीं भाववाढ तर काबूत राहिलीच; पण त्याहीपलीकडे ही संकुल (टोटल) युद्धें सामाजिक व आर्थिक

प्रगतीची साधनें बनली. लोकयुद्धांत सर्वसामान्य लोक अधिक त्यागास तयार होतात नि आपल्या लोकशाही हक्कांच्या सहाय्यानें, ते चुकार वर्गांना वठणीवर आणतात.

पहिल्या युद्धाचे प्रारंभीं ब्रिटनपाशीं अवघे ३ लक्ष खडे सैन्य होतें. पण युद्धासाठीं लक्षावधि सैनिकांची जरुरी आहे असें दिसतांच, समाजाच्या सर्व थरांतील हजारों तरुणांनीं सैन्यांत गर्दी केली नि रणांगणावर त्यांच्या रक्ताचे जे पाट वाहिले, त्यांनीं वर्गभेदाच्या भिंती जमीनदोस्त केल्या. दारूगोळ्याच्या अफाट निर्मितीसाठीं पुरेशी माणसें मिळेनात, तेव्हां स्त्रियांना दारूगोळा-कारखान्यांत प्रवेश देण्यास व त्यांना पुरुषांएवढाच पगार देण्यास कामगारांनीं मान्यता दिली. या पाठोपाठ इतरहि कारखान्यांत स्त्रियांचा प्रवेश झाला. कामगारांनीं जादा काम करण्याचें, वारंवार पगारवाढ न मागण्याचे मान्य केलें. मात्र त्याचबरोबर कारखानदारांच्या नफ्यांवरहि नियंत्रण आणण्याची मागणी केली व १९१५ सालच्या भांडवलशाही ब्रिटननें ती मान्य केली. कारखान्यांमधून सकस व स्वस्त अन्न पुरविणारी कॅंटीन्स स्थापन करण्यांत आली व परिणामीं कामगारांचे दारूपानाचे व्यसन कमी होऊन त्यांचे आरोग्य सुधारले (पहा– लॉइड जॉर्ज यांच्या युद्ध-स्मृति; खंड पहिला). प्राप्तीवरील कराचे प्रमाण या कालांत पौंडामागें ९ पेन्सवरून ६ शिलिंगांवर गेले. याखेरीज २५०० पौंडांपेक्षां अधिक उत्पन्न असणाऱ्यांवर पौंडामागें ४।। शिलिंग जादा कर बसविण्यांत आला. युद्धाची कंत्राटें मिळालेल्या कारखान्यांवर जादा नफ्यावरील कर लादले गेले. तरीहि ज्यांच्यापाशीं भरपूर पैसा शिल्लक रहात होता त्यांना युद्ध-रोखे विकत घेण्यास भाग पाडण्यांत आले.

दुसऱ्या महायुद्धाच्या कालांत तर, ब्रिटननें आर्थिक, सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रांत चमत्कार घडवून आणले. विविध उद्योगधंद्यांतील पगार सरकारनें नियंत्रित करावेत, हें अर्नेस्ट बेव्हिन यांचें विधेयक हुजूर पक्षाला नाइलाजानें कां होईना, पण मान्य करावे लागले. नगररचनेच्या क्षेत्रांत सरकार व स्थानिक स्वराज्य संस्थांना विस्तृत अधिकार देणारा कायदा १९४४ सालीं करण्यांत आला. उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण करण्याचा कायदा ४५ सालीं संमत झाला. सक्तीच्या शिक्षणाची मर्यादा १५ व्या वर्षापर्यंत वाढविण्याचा कायदा १९४४ मध्येंच पसार करण्यांत आला. बीव्हरिज यांच्या राष्ट्रीय आरोग्य योजनेचा सर्व तपशील याच कालांत तयार झाला व त्यापैकीं एक महत्त्वाची शिफारस अंमलांत आणणारा फॅमिली अलावन्स कायदा १९४५ सालीं पार्लमेंटला मंजूर करणें

भाग पडलें. त्याहीपलीकडे कीन्सच्या मार्गदर्शनाखालीं तयार झालेल्या 'रोजगारविषयक धोरणा'बाबत एक श्वेतपत्रिका प्रसिद्ध झाली व तें धोरण आम्ही अंमलांत आणूं, असें जाहीर वचन सरकारला १९४४ सालीं द्यावें लागले. आर्थिक विचारांत क्रांति करून सोडणारी ही योजना होती, याबद्दल दुमत नाहीं. (पहा—हेन्री पेलिंगकृत मॉडर्न ब्रिटन; प्रकरण—दि सेकंड वर्ल्ड वॉर.)

पाश्चिमात्य लोकशाही राष्ट्रांत गेले महायुद्ध हें शांततामय सामाजिक-आर्थिक क्रांतीचें साधन बनलें व त्यामुळें त्या युद्धामधून एक नवें, शौर्यशाली व उदारमनस्क जग निर्माण झालें. स्वतःच्या रक्षेंतूनच फिनिक्स पक्षी निर्माण होतो, त्याप्रमाणें भस्मीभूत झालेल्या पश्चिम युरोपमध्यें अवघ्या एका तपांत नवी, लोभस सृष्टी, या नव्या जगानें निर्माण केली. या जगानें कम्युनिस्ट आक्रमणाची लाट थोपवून धरली; एवढेंच नव्हे तर, स्वतःच्या बचावासाठीं पूर्व बर्लिनमध्यें नवी चिनी भिंत बांधण्याची पाळी कम्युनिस्टांवर आणली ! हंगेरीमध्यें स्वायत्ततेची मागणी झाली, तेव्हां क्रुश्चेवनें रणगाडे पाठवून ३० हजार हंगेरियनांची कत्तल केली. पण या नव्या जगानें, आशिया व आफ्रिकेंतील आपल्या प्रचंड साम्राज्याचें बहुश: स्वहस्तें विसर्जन केलें. आणि अखेर ज्या राष्ट्रानें रामशास्त्र्याचा आव आणून त्याला वेळींअवेळीं न्याय, नीतिमत्ता नि शांततेचे डोस पाजले, तें राष्ट्र मृगजळामागें धांवून संकटांत आलें असतां, एकहि उणा शब्द न बोलतां, हें नवें जग त्याच्या सहाय्यास धांवून आलें.

गेल्या १५ वर्षांचा आपला अनुभव असा आहे कीं, भारतीय समाज आर्थिक-सामाजिक सुधारणांना सन्मुख राहिलेला आहे. सार्वत्रिक मताधिकार, स्त्रियांना समानाधिकार, सार्वजनिक क्षेत्रांतून अस्पृश्यतेचें उच्चाटन, जमिनीचें फेरवांटप, मूलभूत उद्योगधंद्यांचें राष्ट्रीकरण व धंदावार किमान वेतन या क्रांतिकारक सुधारणा, अॅस्प्रो किंवा अॅनासिनची एकादी टिक्की गिळावी, एवढ्या सहजपणें भारतीय समाजानें पचनीं पाडल्या. दगाबाज चीनशीं चालू झालेलें युद्ध भारतांत निश्चितपणें लोकयुद्ध ठरलेलें आहे. येथेंहि तें शांततामय समाज-क्रांतीचें साधन बनल्याखेरीज रहाणार नाहीं.

पण फिरून प्रश्न आहे तो नेतृत्वाचाच. पाश्चात्यांकडून आपण लोकशाहीचे धडे घेतले. आतां त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून, या युद्धांतून नवा शौर्यशाली भारत निर्माण करण्याची कांक्षा जनतेनें बाळगली आहे. राष्ट्रनेते तिला प्रतिसाद देणार कीं, वाटाघाटींच्यायोगें जनतेचा तेजोभंग करून, तिला पुन्हां डांगे-नंबुद्रिपाद-ज्योति बसूच्या मिठींत लोटणार? ❦

# शस्त्रें घेतांना हयगय नको !

१५ नोव्हेंबरपासून चिनी सैन्यानें दुसरी मोठी चढाई सुरू केली. नेफाच्या लोहित डिव्हिजनमधील वालाँगवर त्यांनीं प्रचंड हल्ला चढविला व १८ तारखेस वालाँग काबीज केले. याच दिवशीं कामेंग डिव्हिजनमधील सेला खिंडींवर त्यांनीं हल्ला चढविला. दुसऱ्या दिवशीं सेलामधून भारतीय सेनेनें माघार घेतली व चिन्यांनीं सेलाच्या दक्षिणेस ३२ मैलांवर असलेलें बोमदिला हें ठाणेंहि काबीज केले. अलिप्ततावाद स्वीकारलेल्या भारतानें कोणत्याहि राष्ट्राशीं युद्ध-करार केला नव्हता, तरी भारतावर हल्ला होताच, अमेरिका, ब्रिटन, कॅनडा प्रभृति पाश्चात्य राष्ट्रांनीं भारताला शस्त्र-मदत देण्याचा विचार सुरू केला. अमेरिकेचे भारतांतील वकील प्रा. गॅलब्रेथ आपलें अमेरिकेचें प्रयाण लंडनमध्यें रहित करून भारतास परतले व पंतप्रधानांशीं शस्त्रास्त्र-मदतीबाबत चर्चा करू लागले. २६ ऑक्टोबरला नेहरूंचा तांतडीचा संदेश प्रे. केनेडींकडे रवाना झाला व अमेरिका तत्काळ भारताला शस्त्र-मदत देण्याच्या तयारीस लागली. ३० ऑक्टोबर रोजीं पार्लमेंटमध्यें बोलतांना 'भारत मागेल ती मदत देऊं' असें जाहीर आश्वासन ब्रिटिश पंतप्रधान मॅकमिलन यांनीं दिले. ४ नोव्हेंबरला अँग्लो-अमेरिकन शस्त्रें घेऊन पहिलें विमान भारतांत दाखल झाले. यानंतर कांहीं दिवस दर ३ तासाला एक याप्रमाणें अमेरिकन विमानें आली व त्यांनीं शस्त्रास्त्र-मदतीचा पहिला हप्ता आणून पोहोंचविला. या पाठोपाठ अमेरिकेचे उप-परराष्ट्रमंत्री अॅव्हरेल हॅरिमन व ब्रिटनचे राष्ट्रकुलसंबंध मंत्री डंकन सॅंड्स यांच्या नेतृत्वाखालीं दोन्ही देशांची वरिष्ठ लष्करी मंडळें भारताच्या दीर्घकालीन लष्करी गरजांची चर्चा करण्यासाठीं दिल्लींत येऊन दाखल झाली.

चिनी स्वारीमुळें तिबेटच्या प्रश्नाला साहजिकच महत्त्व आलें. चीनचा धोका कायमचा नष्ट करावयाचा असेल तर भारत व चीन यांचे-दरम्यान स्वतंत्र तिबेटची स्थापना व्हायला पाहिजे, असे विचार

**बोलले जाऊ लागले. पण तिबेट–मुक्ततेची भाषा हा 'मूर्खपणाचा कळस' आहे, असें मत पंतप्रधानांनीं संसदेंत व्यक्त केल्यामुळें, हा वादहि बराच पेटला.**

## २१ नोव्हेंबर, १९६२

परिस्थिति गंभीर बनली आहे. नोव्हेंबरपूर्वीं तावांग किंवा वालाँगमार्गें धडक मारण्याचा प्रयत्न चिनी सेना करील, अशी कल्पना होती. पण ही धडक एवढी जबरदस्त असेल, असें कुणाला वाटलें नव्हतें. तावांग–बोमदिलामार्गें चिनी सैन्य ब्रह्मपुत्रेपर्यंत येऊं शकते. पण वालाँग घेऊन लोहित नदीच्या कांठानें पुढे सरकणारे चिनी सेनादल ब्रह्मपुत्रेशीं संबंधहि न येतां, आसामांत घुसूं शकते. नेफांतील पराभव जबरदस्त आहेत व ते सहन करणें भाग आहे. मेननसाहेबानें ६ वर्षांत करून ठेवलेली घाण ब्रह्मदेव आला तरी त्याला ६ दिवसांत साफ करतां येणार नाहीं. मेननच्या गुन्हेगार गाफिलपणाला आपण क्षमा केली, तरी चीन क्षमा करणार नाहीं! मेननना राष्ट्रानें संरक्षण-मंत्रिपद दिलें, त्याचें प्रायश्चित्त आपण भोगलेच पाहिजे. चीन किती खोलवर घुसणार, याविषयीं आज तरी कांहीं सांगतां येणार नाहीं. चिनी चढाईला शक्य तेवढा प्रखर प्रतिकार करून तिचा वेग मंदावणें एवढेंच कार्य आज भारतीय सेना करूं शकेल. नवीं सैन्यें उभारायला ८–१० महिने लागतात. या सैन्याला कांहीं दिवस युद्धाचा अनुभव मिळावा लागतो. म्हणून चांगल्या बातम्यांसाठीं १९६३ अखेरपर्यंत किंवा १९६४ च्या पूर्वार्धापर्यंत वाट पाहिली पाहिजे. चर्चिल मे १९४० मध्यें पंतप्रधान झाले. पण १९४२ अखेरीच्या अल् अलामीनच्या लढाईपर्यंत ब्रिटनला विजयाचें दर्शन होऊं शकलें नाहीं. मात्र, तोपर्यंत हिंमत बाळगून ब्रिटिश जनता विजयाची तयारी करीत होती. सुदैवानें, चर्चिलसदृश नेतृत्वाचा उदय होत आहे. एकजुटीनें व विवेकी निष्ठेनें या नेतृत्वाला आपण साथ केली, तर आजचे पराभवाचे दिवस इतिहासजमा झाल्यावांचून रहाणार नाहींत. औरंगजेब आपल्या विराट चतुरंग सेनादलासह महाराष्ट्रांत उतरला, पण २७ वर्षें त्याच्याशीं मुकाबला करून महाराष्ट्रानें इतिहास निर्माण केला. त्या तेजस्वी महाराष्ट्राची झुंझार वृत्ति आज सर्व भारतभर पसरली आहे. ही वृत्ति आपल्या नेतृत्वानें कणखर मनानें टिकविली, तर नवा, अत्युज्ज्वल भारतीय इतिहास आपण घडवूं शकूं.

मात्र तोपर्यंत अनेक भीषण घटनांना तोंड देण्यास आपण सिद्ध झाले पाहिजे. पण या घटनांची आगाऊ कल्पना जनतेला देतां येणार नाहीं काय ? या ठिकाणीं सरकारच्या कल्पनाशक्तीचा प्रश्न येतो. जनतेचें नीतिधैर्य वाढतें, तिची हिंमत दुणावते, ती वस्तुस्थितीच्या जाणिवेनें, परिस्थितीबाबतच्या यथार्थ ज्ञानामुळें ! ही जाणीव जनतेला करून देण्यासाठीं सरकार नभोवाणीचा वापर अद्याप कां करीत नाहीं? नभोवाणी-वर सध्यां दिवसभर रणदुंदुभि झडत आहेत. त्यांचा कांहींच उपयोग नाहीं, असें कुणीच म्हणणार नाहीं. पण सध्यांच्या युद्धाबाबत जनतेला योग्य कल्पना देण्यानें अधिक कार्यभाग नाहीं कां साधणार ? आपल्या महाराष्ट्रा-बाबत बोलायचें तर ज. परांजपे गेली २–३ वर्षे लष्करी विषयांवर लिहीत आहेत, भाषणें देत आहेत. नभोवाणीचें माध्यम त्यांना उपलब्ध करून कां देऊं नये ? त्यांच्यासारख्या लष्करी तज्ज्ञानें परिस्थितीचें विवेचन केलें तर तो एक शिक्षणाचा भाग ठरेल. सर्व पाश्चात्य देशांत परिस्थितीच्या यथातथ्य विवेचनांचें महत्व मान्य झालेलें आहे. गेल्या महायुद्धांतली जर्म-नीची गोष्ट सांगतों. जनरल डिटमार हे जर्मन नभोवाणीचे लष्करी विवे-चक होते. युद्धकालांतील त्यांची विवेचनें अतिशय वस्तुनिष्ठ असत. सुप्रसिद्ध ब्रिटिश लष्करी टीकाकार कॅ. लिडेल हार्ट यांच्या मतें तर डिटमार सर्व जगांत अधिक वस्तुनिष्ठ टीकाकार होता. युद्धानंतर लिडेल हार्ट यांनीं ज. डिटमार यांची भेट घेतली, तेव्हां त्यांनीं त्यांना पहिला प्रश्न विचारला तो हा कीं, आपण नाझी राजवटींत एवढी वस्तुनिष्ठा वर्षानुवर्षें नि नाझी–पराभवाच्या कालांतहि कशी टिकवूं शकलात? ज. डिटमारनीं दिलेलें उत्तर लक्षांत घेण्याजोगें आहे. ते म्हणाले, जर्मन नभोवाणीचे प्रचार–प्रमुख हेर फ्रिश यांचेखेरीज कोणालाहि मला माझें लिखाण दाखवावे लागत नसे व फ्रिशनी मला भरपूर स्वातंत्र्य दिलें होते ! ( पहा–कॅ. लिडेल हार्टकृत दि अदर साइड ऑफ दि हिल. ) जीं लष्करी विवेचनें परदेशांतहि लोकप्रिय झाली, त्यांची माहिती डॉ. गोबेल्स वा अन्य नाझी नेत्यांना नव्हती, असें कसें म्हणतां येईल? तरीहि तीं विवेचनें त्यांनीं चालू दिलीं; कारण अशा सडेतोड विवेचनांतून जन-तेची हिंमत वाढते, याची खात्री त्यांना पटलेली होती, याशिवाय दुसरें कोणतें असूं शकेल ?

★★★

# सैन्यें शस्त्रांवर चालतात

सैन्यें पोटावर चालतात, असें नेपोलियन म्हणाला होता. त्या काळीं सैन्याचे पगार थकत असत. फ्रेंच राज्यक्रांतीच्या अनागोंदींत अर्धपोटीं राहिलेल्या सैन्याचें नेतृत्व घेऊन, नेपोलियन आल्पसमार्गे इटलींत उतरला व तेथें त्यानें आपल्या सैन्यास भरपूर खाऊंपिऊं घातलें. सैनिक तुष्ट झाले; त्यांचे घोडे पुष्ट झाले नि त्यांना लढण्यास अधिक हुरूप आला. पण या गोष्टीला आतां दीडशें वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. हल्लीं शासनसंस्था कितीतरी मजबूत, कितीतरी कार्यक्षम झाली आहे. सैनिकांचे पगार आतां थकत नाहींत व खाण्यापिण्याच्या बाबतींत तर त्यांच्याकडे इतरांपेक्षां अधिक लक्ष देण्यांत येतें. म्हणून आधुनिक जगांत सैन्याचे बाबतींत अधिक महत्त्व आलें आहे शस्त्रांना !

शस्त्रें कमी प्रतीचीं असली, तर सैनिक कितीहि शूर असो, तो हतप्रभ ठरतो. पहिल्या महायुद्धांत जर्मन सेनांनीं अँग्लो-फ्रेंच सेनांना ३ वर्षें दाद दिली नाहीं. पण ब्रिटिशांनीं रणगाडे तयार केले नि या रणगाड्यांनीं तोंवेळपर्यंत सैन्य–दलाला अशक्य वाटणारे खंदक लीलया ओलांडले ! दुसऱ्या महायुद्धाचे प्रारंभीं, जर्मनीला जें विद्युत्गति यश प्राप्त झालें, त्याचें फार मोठें श्रेय त्यांच्या प्रभावी रणगाड्यांना आहे. फ्रेंच सैन्यापाशीं जर्मन रणगाडे फोडणाऱ्या तोफा पुरेशा प्रमाणांत नव्हत्या. अशा स्थितींत फ्रेंच सैनिक बंदुका नि मशिनगन्सनी जर्मन रणगाड्यांची मुसंडी अडविण्याचा प्रयत्न करूं लागले, तेव्हां एक अमेरिकन युद्ध-वार्ताहर उद्गारला- जोन ऑफ आर्क जरी अवतरली तरी छऱ्याच्या बंदुकीनें ती रणगाडे अडवूं शकणार नाहीं ! युद्धाच्या अखेरच्या काळांत जर्मनीनें व्ही-१ व व्ही-२ हीं अस्त्रें तयार केलीं. यांतली कांहीं थोडीच अस्त्रें इंग्लंडवर आलीं, पण त्यांनीं हलकल्लोळ केला. ज. आयसेनहॉवर लिहितात (क्रूसेड इन युरप)– दोस्तांच्या फ्रान्सवरील स्वारीला थोडा उशीर झाला असता वा जर्मनीला हीं अस्त्रें कांहींशीं आधीं मिळालीं असतीं तर आम्हांला आमच्या स्वारीच्या योजना मनांतच जिरवाव्या लागल्या असत्या !

भारतानें शस्त्रास्त्रांचें उत्पादन सुरू केलें असलें तरी चिनी स्वारीचा प्रतिकार करण्यासाठीं आपणांस अँग्लो-अमेरिकनांची अद्ययावत् शस्त्रेंच घ्यायला पाहिजेत, हें उघड आहे. हीं शस्त्रें यायला सुरवात झालीं असलीं, तरी आपल्या आतांपर्यंतच्या कांहीं धोरणांमुळें आपण ती मागण्यांत

हयगय तर करणार नाहींना, अशी शंका मनाला चाटून जाते. म्हणून इतरांची उदाहरणें सांगायला हवींत. फ्रान्सच्या पाडावानंतर (मे १९४०) ब्रिटनपाशीं खरोखर आज आपल्यापाशीं आहेत एवढीहि शस्त्रास्त्रें नव्हती. चर्चिलनीं पुढें एकदां स्टॅलिनला सांगितलें, त्यानुसार १०० तोफा नि ५० रणगाडे एवढ्या सामुग्रीच्या बळावरच चर्चिल हिटलरला आव्हान देत होते ! आणि ज्या अमेरिकेकडे मदत मागायची, त्या अमेरिकन जनतेला त्यावेळीं तटस्थतेच्या वेडानें पछाडलें होतें. पण चर्चिल नि रूझवेल्ट यांनीं यांतून मार्ग काढला. हरप्रकारें त्यांनीं अमेरिकन जनतेची सहानुभूति मिळविली व १९४० च्या उत्तरार्धांत २॥ लक्ष रायफली, ८० हजार मशिनगन्स नि ९०० तोफा पदरांत पाडून घेतल्या.

१९४२ च्या जून महिन्यांतील घटना याहून उद्बोधक आहे. चर्चिल प्रे. रूझवेल्ट यांच्या भेटीसाठीं वॉशिंग्टनला गेले आणि त्यांच्या गप्पा चालू असतांनाच (२१ जून) ३३ हजार ब्रिटिश सैनिकांसह उत्तर आफ्रिकेंतील तोब्रुक हें ठाणें ज. रोमेलला शरण गेल्याची बातमी आली. चर्चिल खिन्न झाले. तेव्हां रूझवेल्टनी विचारलें—या क्षणीं मी आपणांसाठीं काय करूं शकतो? चर्चिलनीं उत्तर दिले—५० विनाशिका द्या व नवे शेरमन रणगाडे जेवढे देतां येणें शक्य असेल, तेवढे मध्यपूर्वेत त्वरित पोहोंचते करा ! प्रे. रूझवेल्टनीं ज. जॉर्ज मार्शलना बोलावलें व चर्चिलची विनंति त्यांच्या कानांवर घातली. मार्शल म्हणाले—शेरमन रणगाड्यांचें उत्पादन नुकतेंच सुरू झालें आहे व पहिले कांहीं रणगाडे अमेरिकन सैन्याला देण्यांत आले आहेत. सैन्याकडून शस्त्रें परत घेण्याइतकी क्लेशकारक घटना नाहीं. तरीहि ब्रिटिशांची गरज अधिक असली तर ती पुरी केली पाहिजे. चर्चिल लिहितात—प्रत्यक्षांत ३०० शेरमन रणगाडे मिळाले नि वर १०० स्वयंचलित तोफाहि मिळाल्या !

ब्रिटनला अमेरिकेचा रक्ताचा भाऊ मानता येईल. पण रशियाची कांहीं अमेरिकेशीं मैत्री नव्हती. स्टॅलिननें आपल्या आयुष्यांत अँग्लो-अमेरिकन भांडवलशाहीला शिव्यांची लाखोली वहाण्यांत कधीं कुचराई केली नव्हती. पण जर्मनीनें रशियावर हल्ला केला, तेव्हां त्यानें अँग्लो-अमेरिकेकडून मदत मागण्यांतहि अणुमात्र कसूर केली नाहीं.

हिटलरच्या स्वारीनंतर प्रे. रूझवेल्ट यांचे खास दूत हॅरी हॉपकिन्स जुलैच्या अखेरीस (१९४१) मॉस्कोंत स्टॅलिनच्या भेटीस गेले. पहिल्याच भेटींत मदतीचा विषय निघाला तेव्हां स्टॅलिननें एक भली मोठी यादी हॉपकिन्सना सादर केली. आमची पहिली व ताबडतोबीची गरज विमानवेधी

तोफांची आहे. या तोफा अमेरिकेनें दारूगोळ्यासहित पुरवाव्यात अशी आमची अपेक्षा आहे, असें स्टॅलिननें सांगितले. अशा किती तोफा हव्यात, असें हॉपकिन्सनी विचारतां, लहानमोठ्या २० हजार तोफा लागतील, असें उत्तर स्टॅलिननें दिलें ! याखेरीज शहरांच्या बचावासाठीं मोठ्या आकाराच्या सहस्रावधि मशिनगन्स हव्या आहेत, असें सांगून स्टॅलिन म्हणाला—अमेरिकेंत बऱ्याच रायफली उपलब्ध आहेत, असें मला समजलें आहे. अमेरिकेनें आम्हाला किमान १० लक्ष रायफली पुरवाव्यात, अशी माझी इच्छा आहे!

यानंतर थोड्याच दिवसांनीं अॅव्हरेल हॅरिमन मॉस्कोला गेले (सप्टेंबर १९४१). यावेळीं तर स्टॅलिननें मारुतीच्या शेंपटासारखी लांबच लांब यादी सादर केली. अमेरिका ५ हजार जीप्स देण्यास तयार आहे, असें हॅरिमन म्हणाले, तेव्हां थोड्या अधिक नाहीं कां देऊं शकणार, असें स्टॅलिननें विचारलें. रणगाड्यांच्या चिलखती पत्र्यासाठीं लागणारें १ हजार टन पोलाद अमेरिका देऊं शकेल, असें हॅरिमन म्हणाले, तेव्हां स्टॅलिननें तापून विचारलें—५ कोटि टन पोलाद-उत्पादन असतांना येवढें कमी पोलाद तुम्ही आम्हांला देणार? बऱ्याच चर्चेनंतर यादी तयार झाली, तींत रणगाडे, विमानांपासून बुटांपर्यंत ८० पेक्षां अधिक वस्तु होत्या. दरमहा ४ लक्ष बुटांचे जोड रशियानें मागितले होते. (पहा-रूझवेल्ट अँड हॉपकिन्स खंड पहिला.) पहिल्या वर्षाच्या मदतीचा हिशेब असा आहे कीं, अँग्लो-अमेरिकेनें स्वतःच्या जहाजांतून रशियाला ४४०० रणगाडे व ३१०० विमानें पोहोंचती केली ! टेलिफोन, बूट, पोलाद, अॅल्युमिनियम व अन्य माल किती दिला, याची तर गणतीच नाहीं.

अमेरिका व ब्रिटन हीं मानवतावादी नि लोकशाही राष्ट्रें आहेत. आपत्कालीं त्यांनीं रशियाला मदत करायला मागेंपुढें पाहिले नाहीं, तेथें भारतासारख्या लोकसत्ताक राष्ट्राला मदत करण्यांत ते हात आंखडता कसा घेतील? 'अनंत हस्तें' आपल्याला मदत करायला अँग्लो-अमेरिका सज्ज आहे. आपण मात्र मागतांना, कसलेहि जुने विकल्प आड आणूं देऊं नयेत. आपल्याच कोत्या मनाचे अडथळे निर्माण करूं देऊं नयेत. चीनशीं सुरू झालेला संगर कांहीं वर्षें चालणार आहे व तो आशिया—मुक्तीचा लढा आहे, ही आपल्या राज्यकर्त्यांची प्रामाणिक भावना असेल तर, तेवढ्या प्रदीर्घ कालाची योजना करून भरपूर शस्त्रें मागितली पाहिजेत. थोडी अधिक झाली तर आनंदानें परत करूं. पण शस्त्रें कमी पडतां कामा **नयेत.** मेननंनी रशियाची जी १०–१२ मिग विमानें मागितली

आहेत, ती जेव्हां यायची तेव्हां येऊंद्यात. पण त्यांचेसाठीं झुरत राहून अँग्लो-अमेरिकेनें पुढें केलेला मैत्रीचा हात हातांत घेतांना स्वत:चा कंप होऊं देऊं नका. गेल्या युद्धांत रशियानेंसुद्धां आपल्या वैमानिकांना अमेरिकेंत शिक्षण देण्याची कल्पना कांहीं काळ डोक्यांत घोळविली होती. आपण ती कृतिरूप कां करूं नये?


★★★

## तिबेट मुक्तीचीं उदात्त भाषा

चिनी स्वारीच्या संदर्भांत तिबेटच्या दास्यमुक्तीची भाषा बोलली जात आहे. या विचारांची हेटाळणी होतां कामा नये. ब्रिटिशांनीं सत्तांतर करतांना, तिबेटच्या रक्षणाची जबाबदारी आपल्या पदरांत टाकली, पण चिनी लांवेची भूक शमविण्यासाठीं हें निरपराध तिबेटी बाळ आपण त्या लांवेच्या हातीं देऊन मोकळे झालों. या महान मुत्सद्देगिरीमुळें शीत-युद्ध थांबल्याच्या थापा कोणी कितीहि मारो; एका दुर्बल राष्ट्राला पारतंत्र्याच्या खाईंत लोटल्याच्या पापांतून भारताला मुक्त कसें होता येईल? गेल्या १२ वर्षांत चीननें चालविलेली तिबेटांची ससेहोलपट आपण उघडचा डोळचांनीं पहात आहोंत. चिनी सामर्थ्यामुळें आपणास हे अत्याचार पहाणें भाग आहे, हें समजूं शकतें. पण त्याचवेळीं आपले डोळे पाणावले नाहींत, तर मात्र आपण अमानुष ठरूं !

हें मान्य आहे कीं, अशा अडचणीच्या प्रसंगांतून मोठमोठचा सामर्थ्यशाली राष्ट्रांनाहि जावें लागते. विशेषत: ज्या वेळीं नीतीअनीतीची कसलीहि चाड न बाळगणाऱ्या कम्युनिस्टांशीं गांठ पडते, त्यावेळीं हे प्रसंग उद्भवतातच ! १९४४ च्या जुलैअखेरीस स्टॅलिनच्या लाल फौजांनीं पोलंडमधील विश्चुला नदी ओलांडली नि वॉर्साच्या दिशेनें चाल सुरू केली. मॉस्को नभोवाणीवरून पोलिश डांगे-ज्योति बसूंनीं वॉर्साच्या जनतेला हांक दिली—बंधूंनो, उठा ! तुमच्या मुक्ततेचा क्षण आला आहे. घरांघरांतून जर्मनांविरुद्ध उठाव झाला पाहिजे. वॉर्सा, जर्मनांचे दुसरें स्टॅलिनग्राड बनलें पाहिजे !

वॉर्सांतील झुंझार पोलिश देशभक्तांचा नेता जनरल बोर या पोलिश पंचमस्तंभीयांच्या आवाहनाला बळी पडला. उपनगरांत रशियन तोफांचे आवाज ऐकूं येत होते, म्हणून त्याच्या मनांत आशा निर्माण झाली. त्यानें


सिंकिआंग
हाजी लंगर
कारा ताघ खिंड
काराकोरम खिंड
१८२५० फूट
दौलत बेग ओल्डी
चिपचाप नदी
शिजिल जिलगा
शिंगीलुंग
मुरगो
सुमडो
देहरा
सुलतान चुशकू
निआमदांगडो
गलवान नदी
सामजुंगलिंग
देशकित
कोंगका ला
हॉट स्प्रिंग
लनक ला
१८००० फूट
ति
श्योक नदी
लेह
श्योक
फोब्रांग
चांग ला
डांबू गुरू
कारू
चारत्से
खुर्नाक किल्ला
सिंधू नदी
सिरी जाप
तोकुंग
बे
चुशूल
१४२३० फूट
स्पांगूर
शिंगझांग
रेझांग ला
रुदोक
चिलोंगकुंग्मा
त्यामा ला
डुंगती
ट
न्योमा राप
दुमचेले
चांग ला
जारा ला
देमचोक
चारदिंग ला
चुमार
जम्मू आणि काश्मीर
पंजाब
तिबेट
भूतान
आसाम
नेफा
राजस्थान
उत्तर प्रदेश
बिहार
आंतरराष्ट्रीय रेषा
१९५६ सालीं चीनने दावा केलेली रेषा
१९६० सालीं चीनने दावा केलेली रेषा
७ नोव्हेंबर १९५९ पर्यंत चीनने कोठपर्यंत चौक्या उभारल्या होत्या ते दाखविणारी रेषा
७ सप्टेंबर १९६२ रोजीं चिनी सेना असलेली रेषा
चीनने सुचविलेला ४० किलोमीटरचा निर्लष्करी टापू

लडाख विभागाचा आलेख.

गनिमांना (गरिलाज) उठावाचा आदेश दिला. १ ऑगस्टला सायंकाळीं वॉर्साच्या घराघरांतून गोळीबार सुरू झाला व पोलिश जनता बाहेर पडून तिनें जर्मन ठाण्यांवर हल्ले चढविले. जर्मन फौज या दणक्यानें गांगरून गेली व तिनें माघारीचा वेत ठरविला. पण दुसऱ्या दिवशींच माघारीचा विचार तिनें रद्द केला. कां? कशामुळें? वॉर्साच्या वेशीवर येऊन थडकलेली लाल सेना एक पाऊलहि पुढें टाकायला तयार नव्हती. मॉस्को नभोवाणीवरील डांगे–बसूंचे आवाज थंड पडले. कोणत्याहि बाह्य मदतीशिवाय पोलिश गनिमांनीं तब्बल आठ आठवडे जर्मन सेनेशीं झुंज दिली. १५ हजार गनीम मृत्युमुखीं पडल्यावर बाकीच्यांना शरणांगति पत्करणें भाग पडलें. या शरणांगतीनंतर मात्र तत्काल रशियन सेनेच्या हालचाली सुरू झाल्या व पोलिश कम्युनिस्टांना पुढें करून लाल सेनेनें 'मुक्तिदाते' म्हणून वॉर्सांत प्रवेश केला !

या सर्व काळांत चर्चिल नि रूझवेल्ट विलक्षण अस्वस्थ झाले होते. चर्चिलनीं स्टॅलिनला तारांवर तारा करून, पोलिश गनिमांच्या मदतीला जाण्याची विनंति केली. पण पोलिश गनीम माथेफिरू आहेत, असें सांगून स्टॅलिननें चर्चिलची विनंति फेंटाळून लावली. यावेळीं अँग्लो-अमेरिकन विमानांना रशियन भूमीवर उतरायची संधि मिळाली असती, तर पोलिश गनिमांना खूपच सहाय्य झालें असतें. पण स्टॅलिननें परवानगी नाकारली. चर्चिलनीं लिहिलें आहे– अनेकदां मनांत येई कीं, सरळ विमानें नेऊन रशियन प्रदेशांत उतरवावींत व सांगावें कीं, करा काय करणार आहांत तें ! पण मोठ्या कार्याकडे पाहून अशा विचारांना बांध घालावा लागतो ! (पहा –चर्चिलकृत ट्रायंफ अँड ट्रॅजेडी.)

या वेळची चर्चिलच्या मनाची तगमग आपणांस समजूं शकते. त्यांची अस्वस्थता आपल्याहि हृदयांत स्पंदनें निर्माण करूं शकते. हंगेरीमध्यें क्रुशेवचे रणगाडे पांखरें टिपावींत त्याप्रमाणें माणसें टिपूं लागलीं, तेव्हां हंगेरियन लोक, अमेरिकन फोटोग्राफर्स नि वार्ताहरांना विचारूं लागले–कुठें आहेत अमेरिकन शस्त्रें ? कुठें आहे अमेरिकन सैन्य ? अमेरिकन वार्ताहर डोळ्यांत अश्रु आणून गप्प राहिले ! त्यांच्या मनाची कालवाकालव आपण जाणूं शकतो. 'पराधीन आहे जगतीं, पुत्र मानवाचा' हें सत्य व्यक्तीप्रमाणेंच, मर्यादित अर्थानें व्यक्तिसमूहाच्या म्हणजे राष्ट्राच्या बाबतींतहि लागू आहे. म्हणून तिबेटबाबत आपले पंतप्रधान निःशब्द राहिले असते किंवा 'बाबानों, आपलीच मान आज खोडयांत अडकली आहे. अशा

स्थितींत तिबेटच्या मुक्तीच्या घोषणा करून तिबेटी जनतेच्या मनांत खोटच्या आशा पल्लवित करूं नका,' असें नेहरूंनीं सांगितलें असतें, तर त्यांची भावना समजूं शकली असती. पण त्याऐवजीं तिबेटच्या मुक्ततेची भाषा हा जणूं कांहीं अपराध आहे अशी कल्पना करून घेऊन, तिबेट-मुक्तीची कल्पना हा 'मूर्खपणाचा कळस' आहे, असें पंतप्रधान म्हणतात, तेव्हां स्पेन, ॲबिसीनिया, झेकोस्लोवाकिया यांचे गळे घोटले जात असतांना, जिवाची तगमग होणारे जवाहरलाल नजरेसमोर येतात व मन विषण्ण होतें.

पण तिबेटमध्यें तुम्ही दलाई लामाची प्रतिष्ठापना करून तेथें पुन्हां सरंजामशाही आणणार आहांत काय, असा प्रश्न विचारणारे लोक खरे धोकेबाज आहेत ! ज्यांच्या विचारांची गति रशियन राज्यक्रांतीपाशींच कुंठित झाली, अशा मार्क्सवाद्यांनीं चालविलेला हा प्रच्छन्न कम्युनिस्ट प्रचार आहे. तिबेटांत तुम्ही सरंजामशाही आणणार आहांत काय, असें विचारण्यामागें गर्भित अर्थ असा असतो कीं, चीननें तिबेटांत फार मोठचा प्रमाणावर क्रांतिकारी सुधारणा केल्या आहेत. काय केलें चीननें तिबेटांत ? चिनी साम्राज्यांतच तिबेटला स्वायत्तता असावी अशी मागणी करून तिबेटी जनता दलाई लामांमागें उभी राहिली, तेव्हां चिनी सैन्यानें ल्हासा शहरावर मुलुखमैदान तोफा डागल्या व १० हजार तिबेटी स्त्री-पुरुष व मुलांची कत्तल केली (मार्च १९५१). तिबेटी धर्ममठांचे रूपांतर दारूगोळचाच्या कोठारांत केलें व तिबेटी लोकांना गुलाम बनवून त्यांच्याकरवीं चिनी सैन्यासाठीं रस्ते बांधून घेतले. तिबेटमधील शेतकऱ्यांना शेती पिकवायला लावून, आलेलें धान्य मात्र पेकिंगला नेण्याचा चीननें धडाका लावला. जाणकारांना अशी भीति वाटते कीं, कांहीं वर्षांत तिबेटी वंश नष्टप्राय होईल ! या चीनच्या सुधारणा असतील, तर आपले मार्क्सवादी पंडित त्यांचा उपभोग घ्यायला तिबेटांत कां जात नाहींत असें विचारावेसें वाटतें.

तिबेटची मुक्ति म्हणजे पुन्हां सरंजामशाहीची स्थापना हा तिरक्या बुद्धीचा अजब विलास आहे ! हीनरिच हरार नामक जर्मन लेखकानें 'सेव्हन इयर्स इन तिबेट' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. हा लेखक दलाई लामाचा कांहीं वर्षे शिक्षक होता. दलाई लामाच्या स्वतंत्र व तल्लख बुद्धीची अनेक उदाहरणें त्यानें या ग्रंथांत नमूद केली आहेत. लामा–मंडळाला बाजूला सारून दलाई लामानें कोणते उपक्रम सुरू केलें, याची सुरेख माहिती या लेखकानें दिली आहे. पण या गोष्टीला एक तपावर

काल लोटला आहे. त्यावेळीं दलाई लामा विशीच्या आंतले पोर होते. गेली अनेक वर्षें ते व लक्षावधि तिबेटी निर्वासित भारतांत रहात आहेत. आपल्या सान्निध्याचा त्यांचेवर कांहींहि परिणाम होणार नाहीं, एवढे आम्ही चेतनाशून्य आहोंत? आपण लोकशाही राज्यपद्धति शिकलों ती ब्रिटिशांच्या सान्निध्यामुळेंच ना? जगांतल्या अनेक देशांत लोकशाही स्वातंत्र्याच्या कल्पना नेल्या त्या ब्रिटन-अमेरिकेंत शिकलेल्या त्या त्या देशांतल्या विद्यार्थ्यांनीं ना? मग लक्षावधि तिबेटी लोक भारतांतला लोकशाहीचा प्रयोग, विकासाचे प्रयत्न डोळयांनीं पहात आहेत; क्वचित त्यांत भाग घेऊन अनुभवीतहि आहेत. याचा परिणाम त्यांचेवर जरासुद्धां होणार नाहीं, असें आपणांस वाटते? तसें खरोखरच होणार असेल तर तो तिबेटचा अपराध नसून, आपला पराभव आहे, असें मी तरी म्हणेन.

चिनी स्वारीमुळें कल्पना-साम्राज्यांत विहार करणाऱ्या आपल्या नेत्यांचें पाय जमिनीला लागले, त्याचप्रमाणें सर्वसामान्य जनतेच्या जाणीवांची क्षितिजें विस्तारली. नेहरूंइतका आंतरराष्ट्रीय राजकारणी कोणी नाहीं अशी समजूत करून घेऊन नेहरूंचें कौतुक करणें एवढाच आपला आजपर्यंत उद्योग होता. पण चिनी सैन्याचे तडाखे बसल्यावर तिबेट, मलाया, व्हिएतनाम, लाओस, दक्षिण कोरिया या देशांच्या कम्युनिस्ट-विरोधी लढयाची जाणीव, आपल्या केवळ बुद्धीलाच नव्हे तर मनालाहि होत आहे. आपल्या खऱ्या प्रगतीचें हें लक्षण आहे. तिबेट-मुक्तीबाबत सरकारच्या अडचणी असतील, त्याचे हात अडकलेले असतील, हें मान्य आहे. पण म्हणून सर्वसामान्य जनतेनें विशुद्ध, पवित्र विचार दडपून कां टाकावेत? तिबेटच्या गुलामीला कांहीं प्रमाणांत आपण कारणीभूत झालों, म्हणूनच तिबेटची दास्यमुक्ति नजरेआड होता कामा नये. भारताच्या स्वातंत्र्य–रक्षणाच्या जबाबदारीबरोबरच निरपराध, असहाय्य तिबेटच्या दास्यमुक्तीचीहि जबाबदारी आपण मनांत वागवूं. आणि स्वप्न पहात राहूं कीं, तिबेटी बायका–मुलांच्या रक्तानें न्हालेल्या ल्हासावर स्वतंत्र तिबेटचा ध्वज फडकेल. इतिहास सांगतो कीं, कालांतरानें का होईना, पवित्र स्वप्नें खरीं होतात !

—००—

# सेलाचा धक्कादायक पराभव

**चिनी सैन्यानें वालाँग, सेला व बोमदिला ही ठाणीं लगोलग काबीज केल्यामुळें, विलक्षण गंभीर वातावरण निर्माण झालें. पंत-प्रधान नेहरूंनीं नभोवाणीवरून भाषण करून जनतेला संकटाची नव्यानें जाणीव दिली व 'आसामी जनतेबाबतच्या विचारानें आमची मनें व्यथित झाली आहेत,' असे उद्‌गार काढले. पण चिनी सैन्य आसामी फूट हिल्सपाशीं पोहोंचतांच, २०–२१ नोव्हेंबरच्या मध्य-रात्रीं चीननें एकतर्फी युद्धविराम जाहीर करून आश्चर्याचा धक्का दिला.**

**सेला ठाण्यांतून भारतीय सैन्यानें फारशी लढाई न करतां माघार घेतली, याचेहि लोकांना आश्चर्य वाटलें. त्याचबरोबर सरकारची पावलें जेवढ्या तडफदारपणें पडायला हवींत तेवढी पडत नाहींत, अशीहि भावना निर्माण झाली.**

२७ नोव्हेंबर, १९६२

चीननें युद्धविराम घोषणा कां केली? निश्चित असें एक कारण सांगतां येणार नाहीं. अनेकविध कारणांसाठीं माओ या निर्णयाप्रत आला असावा. माझ्या मतें, भारताबाबतचा चीनचा अंदाज सपशेल चुकला, हें पहिलें महत्त्वाचें कारण. आसाम व बंगाल हे सीमेवरील प्रांत भारतीय कम्युनिस्टांनीं पोखरून ठेवले असल्यामुळें, तेथील जनतेंत आक्र-मणाच्या प्रतिकाराची भावना उरलेली नाहीं; म्हणून स्वारी होताच, त्या प्रांतांतली शासनव्यवस्था कोलमडून पडेल; नागा लोक उठाव करतील व अराजकतेमुळें जी घबराट व पळापळ सुरू होईल, त्याला घाबरून भारत सरकार आपल्या अटींवर तडजोड करायला तयार होईल, अशी चीनची अपेक्षा असावी. पण ही चिनी अपेक्षा साफ उध्वस्त झाली. आसाम व बंगालची जनता खंबीर मनानें सरकारच्या पाठीशीं उभी राहिली, एवढेंच नव्हे तर तिनें

कम्युनिस्टांना सळो कीं पळो करून सोडलें! तडजोडीबाबत संरक्षणमंत्री कृष्ण मेनन आपल्याला सहाय्य करतील अशीहि अपेक्षा त्यांच्या आजपर्यंतच्या वर्तनावरून चीननें बाळगली असल्यास नवल नाहीं. पण लोकक्षोभामुळें कृष्ण मेननना आपलें आसन सोडावें लागलें व त्यांच्या जागीं लढवय्या संरक्षणमंत्री आला. अशा अवस्थेंत आपण आसामच्या पठारावर राहिलों तर यापुढील थंडीच्या दिवसांत आपल्या सैन्याला पुरवठा करणें दुर्घट होईल व आपले लांबलेले पुरवठा-मार्ग भारतीय सेना मारून काढील, अशी भीति चीनला वाटली असावी !

अमेरिकेची भीति हेंहि चिनी माघारीचें फार मोठें कारण आहे. क्यूबा प्रकरणाचें सर्वांत मोठें वैशिष्ठ्य असें कीं, आतांपर्यंत कम्युनिस्ट गटाकडे असलेलीं राजकारणाचीं सूत्रें अमेरिकेकडे आलीं. कम्युनिस्ट राष्ट्रांनीं एकादें पाऊल टाकावें व अमेरिकेनें त्यांची पाठशिवणी करावी, असें आतांपर्यंत चाललें होते. पण आतां अमेरिका पावलें टाकील व कम्युनिस्ट राष्ट्रांना त्यानुसार नाचावे लागेल. आशियामध्यें प्रबळ लष्करी हालचाली करायला अमेरिका आजपर्यंत भारताच्या टीकेमुळेंच कांहींशीं हयगय करीत असे. पण आतां खुद्द भारतावरच संकट आल्यामुळें, अमेरिका केवळ लष्करी मदतीवरच न थांबतां, सैन्यहि उतरविल्यावांचून रहायची नाहीं, या जाणीवेनें माओ अस्वस्थ झाला असणें अशक्य नाहीं. या सर्व कारणांमुळें चीननें युद्धविरामाचा पवित्रा टाकला आहे. लढाईंत भारताचा पराभव झाल्यामुळें, त्याच्या आशियांतील नेतृत्वाला जबरदस्त तडाखा बसला आहे. त्याला आपला पराभव करण्याची संधि न देतां, आपण केवळ सीमेसाठीं भांडत होतों, असें जगाला दाखवितां आलें तर काय वाईट, असा विचार चीननें केला असावा. मला सर्कशींतला एक खेळ आठवतो. दोघे मल्ल मुष्टीयुद्धास तयार होतात. त्यांतला बेरकी मल्ल सांगतो कीं, मी 'खतम्' म्हटलें कीं मारामारी थांबवायची ! मारामारीस प्रारंभ होतांच, तो प्रतिस्पर्ध्याला भराभर ४–२ ठोसे लगावून घेतो व प्रतिस्पर्धी मुठी सरसावून सिद्ध झाला कीं, 'खतम्' म्हणून ओरडतो ! चाणाक्ष सेनापति रणांगण व लढाईची वेळ आपल्याला अनुकूल अशी निवडत असतो! चीनच्या युद्धविराम घोषणेचें स्वरूप असें आहे.

★★★

# आपल्या माघारीचें कोडें

चीनचे अंदाज कोलमडले असले, तरी चालू महिन्याच्या उत्तरार्धांत झालेल्या लढाईंतील कांहीं घटना मन अस्वस्थ करणाऱ्या आहेत ! १६ नोव्हेंबर रोजीं पहांटे चिनी फौजांनीं नेफाच्या लोहित डिव्हिजन-मध्यें वालाँग या ठाण्यावर चढाई सुरू केली. दुसऱ्या दिवशीं कामेंग डिव्हिजनमध्येंहि जांग या ठाण्यावर त्यांचे हल्ले सुरू झाले. जांगमधील भारतीय सैन्यानें सेला खिंडीतील ठाण्यापर्यंत माघार घेतली, तेव्हां सेला लढविण्याचा भारतीय सेनेचा विचार आहे असें वाटलें. पण एक चिनी पथक आडवाटेनें आलें व तें सेलाला वेढा घालणार असें दिसतांच, आपल्या सैन्यानें सेला ठाणेंहि सोडून दिलें. बोमदिला सेलापासून ३२ मैल दूर आहे. आपली सेना तें ठाणें तरी लढवील असें वाटत होतें. पण तेंहि ठाणें आपण लगोलग खालीं केलें व चिनी सैन्याला १५ ते २० हजार फूट उंचीच्या डोंगराळ प्रदेशांतून ५ दिवसांत १३० मैल मुसंडी मारण्याचा पराक्रम करण्याचें श्रेय मिळालें !

भारतीय सैन्याची एवढी पळापळ कां व्हावी, हें अजूनहि समजत नाहीं. २० ऑक्टोबर रोजीं चिन्यांनीं स्वारी सुरू केली व आपल्याला ५ दिवसांत तावांगपर्यंत रेटलें. यावेळीं, चिन्यांनीं विश्वासघात केल्यामुळें आपल्याला त्वरेनें माघार घ्यावी लागली, असें सांगण्यांत आलें. पण तावांगला चिनी सैन्य थांबल्यानंतर आपल्याला जमवाजमव करायला सुमारें २० दिवस मिळाले होते. कांहीं प्रमाणांत अत्यावश्यक अशी पर-देशी शस्त्रेंहि आघाडीपर्यंत जाऊन पोहोंचली होती. तरीहि एवढी माघार कां घ्यावी लागली ? शत्रूच्या महत्त्वाच्या ठाण्याच्या तोंडावर प्रथम हल्ला करायचा नि मग गुप्त रीतीनें बगलेवरून मोठें सैन्य आणून शत्रूची कोंडी करायची, हें खास चिनी कम्युनिस्ट तंत्र, जनरल कुआंग-सान या चिनी सेनापतीनें अंमलांत आणून भारतीय सैन्याला चकित केले, असें सांगितलें जात आहे. पण हें तंत्र आपणाला यावेळीं नवें नव्हते. ३ आठवड्यापूर्वी तावांग व किबुतू हीं ठाणीं चिन्यांनीं याच तंत्रानें हस्तगत केली होती.

आणि या तंत्रांत जगावेगळें काय आहे ? शत्रूच्या बगलांवर हल्ले करून त्यांची कोंडी करायची हें तंत्र, मानवजात संघटितरीत्या युद्ध करायला शिकली, त्या कालाएवढें जुने आहे. सुप्रसिद्ध योद्धा हॅनिबॉल यानें कॅनेच्या लढाईंत हेंच तंत्र वापरलें होतें. नेपोलियन याच तंत्रानें विजयी झाला. पहिल्या युद्धांतली टॅनेनबर्गची

लढाई ज. लुडेंडॉर्फनें अशीच जिंकली. दुसऱ्या युद्धांत, जर्मन सेना हॉलंड-बेल्जममधून फ्रान्समध्यें घुसली व अँग्लो-फ्रेंच सेना त्या सैन्याशीं लढण्यांत गुंतल्या असतांना, जर्मन सेनापति ज. गुडेरियन यानें आर्डेनीजमधून आपले रणगाडे घुसवले व अँग्लो-फ्रेंच सैन्याची कोंडी केली ! शत्रूची कोंडी करणें यांत अभिनव असें कांहीं नाहीं. चिन्यांनीं तें तंत्र वापरलें याचा अर्थ, लष्करी डावपेंचांचे धडे त्यांनीं पक्के गिरविले आहेत, एवढाच आहे !

पण शत्रू बगलांवर येणार आहे हें लक्षांत घेऊन त्याच्या वाटा रोखतां येतात, त्याचप्रमाणें कोंडी झाल्यावरहि ठाणें झुंजत ठेवून शत्रूची चाल मंद करता येते नि त्याच्या पिछाडीला धोका निर्माण करता येतो. सेलाच्या बगलेकडून प्रचंड चिनी सैन्य आलें असें म्हणतात. १०–१५ हजार फूट उंचीचे डोंगर ओलांडून पायीं येणाऱ्या या सैन्याची चाहूल आपल्या टेहेळणी विमानांना किंवा गस्तवाल्या पथकांना कशी लागली नाहीं? ही सेना भूतानमधून आल्यामुळें तिची वाट रोखतां आली नाहीं, असें मानलें तरी सेला ठाणें लढविणें शक्य कां झालें नाहीं? सेला येथें पुरेशी शिबंदी आणण्यास व पुरेसा पुरवठा करण्यास २० दिवसांचा अवधि मिळाला होता. या पुरवठ्यावर सेला ठाणें कांहीं काळ लढविता आलें नसतें काय? उत्तर आफ्रिकेंत रोमेलच्या पहिल्या चढाईंत तोब्रुकनें दाद दिली नाहीं व रोमेल तोब्रुक ओलांडून पुढें गेला तरी तोब्रुकचा कांटा त्याच्या अंगांत सतत सलत राहिला. तोब्रुकला समुद्रमार्गें पुरवठा करणें शक्य होतें असें म्हणता येईल. पण उत्तर आफ्रिकेंतल्याच बीर हाशिम ठाण्याची गोष्ट तशी नाहीं. ज. रोमेलनें मे १९४२ मध्यें आपली चढाई सुरू केली व बीर हाशिम ठाण्याला वेढा घातला. हें ठाणें द गॉलचे 'फ्री फ्रेंच' सैनिक अवघ्या एका ब्रिगेडनिशीं लढवीत होते. रोमेलनें वेढा देऊन तोफा, विमानें व रणगाड्यांनिशीं मारा केल्यावरहि १५ दिवस हें ठाणें लढत राहिलें. गेल्या युद्धांत ब्रह्मदेशांत भारतीय पथकांनींहि वेढले गेल्याच्या स्थितींत कितीतरी लढाया दिल्या आहेत. सेलाच्या शिबंदीला हा पराक्रम करून कां दाखवितां आला नाहीं? सेलाला वेढायला आलेली चिनी सेना पायीं आलेली होती. तिच्यापाशीं दारूगोळ्याचा व अन्नाचा फारसा सांठा असणें शक्यच नव्हते. यामुळें सेला ठाणें निकरानें लढलें असते, तर सेला व बोमदिला यांच्यादरम्यान उतरलेल्या चिनी सैन्याचीच कोंडी झाली नसती काय? तेजपूर या नेफांतील आपल्या प्रमुख लष्करी ठाण्यापासून बोमदिलापर्यंत उत्कृष्ट रस्ता आहे. बोमदिला व सेला या दरम्यानहि हलकी वाहनें जाऊ शकतील, असा रस्ता आहे. यामुळें यामाघारीचा

वेग गोंधळांत टाकतो. बरें, सेला सोडल्यावर बोमदिला हें ठाणें तरी कां नाहीं लढविले? सीमेपासून चिनी सैन्य सत्तर मैल पुढें आले होते. त्यांचे पुरवठा–मार्ग एवढे लांबले गेल्यावरहि आपल्याला त्यांच्याशीं टक्कर देणें अवघड कां वाटलें? हे प्रश्न फार नाजुक आहेत, याची जाणीव ठेवूनहि मी ते विचारीत आहे. जनतेचें मनोधैर्य टिकवायचे असेल, तिल युद्धाभिमुख बनवायची असेल, तर या प्रश्नांची उत्तरें सरकारनें दिली पाहिजेत. तीं उत्तरें मागण्याचा जनतेला अधिकार आहे.

या प्रश्नांची उत्तरें मागत असतांनाच, या सर्व प्रकरणांत पंचम-स्तंभीयांचा हात तर फिरत नसावा ना; अशी दाट शंका मनाला चाटून जाते. आपल्या संरक्षण योजना तर शत्रूला समजल्या नसतील ना? सेनाधिकाऱ्यांना बिनतारीनें हुकूम पाठवितात; त्यामध्यें तर हेतुपुरस्सर दिशाभूल करण्यांत आली नसेल ना? माजी संरक्षणमंत्र्यांचें कम्युनिस्ट-प्रेम व त्यांची गाफिली यामुळें अनेक कम्युनिस्टांना सेना-दलांत प्रवेश मिळाला आहे; एवढेंच नव्हे तर सैन्यांतील अनेक लोक नव्यानें कम्युनिस्ट बनले आहेत. हे लोक सैन्यांत अगदीं सोवळेपणानें वागत असतील, असें कोणी मानू शकेल काय? नव्या संरक्षणमंत्र्यांना जीं अनेक कामें करावयाची आहेत, त्यांत सैन्य-दलाचें शुद्धीकरण हेंहि महत्त्वाचें कार्य ठरणार आहे.

आपल्या अधिकाऱ्यांचा युद्धाचा अननुभवहि माघारीला कारण झाला असणें अशक्य नाहीं. सैनिकांना रणांगणावर रक्तानें रंगवून काढलें पाहिज (यू मस्ट ब्लड युवर मेन इन् बॅटल्), असें स्टॅलिन म्हणे. रणांगणावरचा महिन्याचा अनुभव, पिछाडीवरील अनेक वर्षांच्या अनुभवाच्या बरोबरीचा असतो. आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर लष्करी हालचाली करण्याचा अनु-भव असलेल्या तज्ज्ञांची वाण आहे, हें नाकारण्यांत काय अर्थ आहे? यासाठीं गेल्या युद्धांत प्रत्यक्ष लढलेल्या ज. करिअप्पा, थिमय्या, थोरात, राजेंद्रसिंहजी, श्रीनागेश अशा सर्व सेनापतींना परत बोलावून, शारीरिक-दृष्ट्या ते चांगल्या स्थितींत असल्यास, प्रत्यक्ष लढाईचीं सूत्रेंहि त्यांच्या हातीं देण्यास हयगय करूं नये. ही अनुभवी माणसें किरकोळ तांत्रिक कारणांसाठीं रिकामी ठेवणें देशाला परवडणारें नाहीं!

आधुनिक युद्धांत दळणवळण ही अति महत्त्वाची बाब मानली जाते. यांतहि आपणांस अजून बरेच शिकावयाचें आहे. आणि जोंपर्यंत आपल्या-पाशीं पुरेशी माणसें नाहींत, तोपर्यंत मित्र राष्ट्रांकडून मार्गदर्शन व सल्लामसलत यासाठीं तज्ज्ञ माणसें घेण्यांत कसलाच कमीपणा नाहीं. या क्षेत्रांत अँग्लो-अमेरिका आज अग्रभागीं आहेत. गेल्या युद्धांतल्य

याबाबतच्या आठवणी ज. आयझेनहॉवर यांनीं आपल्या ' क्रूसेड इन् युरप ' या ग्रंथांत दिल्या आहेत. ते म्हणतात—युद्धानंतर जेव्हां जेव्हां रशियन अधिकारी मला भेटले तेव्हां तेव्हां ते मला एक प्रश्न न चुकता विचारीत. तो असाः—फ्रान्समध्यें उतरल्यावर दोस्त सेना जर्मनींत घुसेपर्यंत, या सेनांची चाल अडणार नाहीं, एवढा साधनसामुग्रीचा सतत पुरवठा तुम्हीं त्यांना कसा करूं शकलात? केवळ रशियनांनीं विचारलें म्हणून नव्हे, तर अँग्लो-अमेरिकनांनीं पश्चिम युरोपांतील युद्धांत पुरवठ्याचें युद्ध यशस्वी केलें, ही वस्तुस्थिति आहे, म्हणून अँग्लो-अमेरिकन तज्ज्ञांचे या कामीं आपण मोकळ्या मनानें सहाय्य घेतलें पाहिजे.

***

93936

## झोंपघेणी सुस्ती

हिंवाळा सुरू झाला आहे. माओनें ठरविलें तरी त्याला सध्यां हिमालयीन बर्फांत युद्ध करणें शक्य नाहीं. त्यामुळें साहजिकच युद्ध-आघाडी थंड राहील. पण आपल्या युद्ध—सिद्धतेच्या कार्यावर त्याचा परिणाम होतां कामा नये! फ्रान्स—इंग्लंडमध्यें हा अनुभव आला आहे. सप्टेंबर १९३९ मध्यें हिटलरनें पोलंडलवर हल्ला केला नि १५ दिवसांत त्याची चटणी उडविली. त्यावेळीं पाश्चात्य लोकसत्तांनीं थोडीशी हालचाल केली नि पुन्हां त्या झोपीं गेल्या ! ब्रिटनची सैन्यसंख्या २०-२२ डिव्हिजन्सवरून ५० ते ५५ डिव्हिजन्सपर्यंत वाढवावी, असें चर्चिल सांगत होते. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. लोकांच्या जीवनांत युद्धामुळें कांहींहि फरक पडला नाहीं. एप्रिलमध्यें पुन्हा हिटलरनें नॉर्वेला तडाखा मारीपर्यंत १० लाखांहून अधिक कामगार बेकार होते! फ्रान्समध्यें तर युद्ध—तयारीचा पत्ताच नव्हता. आघाडीच्या पाठीमागें युद्ध-साहित्याची, सैन्याची केवढी वर्दळ असायला पाहिजे ! पण फ्रेंच आघाडीच्या पाठीमागें युद्ध चालू असल्याच्या कांहींहि खाणाखुणा आढळून येत नव्हत्या. लाथा बसल्यावांचून जागें व्हायचें नाहीं नि जाग आल्यावरहि सुस्त पावलें टाकायचीं, हा लोकशाहीला शापच आहे कीं काय, समजत नाहीं. 'नेफा' आघाडी पेटून महिना उलटल्यावर संरक्षण मंडळाची पहिली बैठक भरली. अधिकाऱ्यांची तीव्र टंचाई असूनहि, इमर्जन्सी कमिशनें जाहीर व्हायला नोव्हेंबरची २६ तारीख उजाडावी लागली. गेल्या दशकांतील तयारीची

उणीव आपल्याला वर्ष, सहा महिन्यांत भरून काढायची आहे. सध्यांच्या तिप्पट, चौपट सैन्य उभारायचें आहे. आसाम, बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश व पंजाब या सीमा राज्यांतील लक्षावधि लोकांना प्रतिकाराचें शिक्षण द्यायचें आहे. त्यांतलीं मनानें जी विलक्षण मजबूत माणसें असतील, त्यांना गनिमी (गरिला) लढाईंत वाकबगार बनवायचें आहे. एवढें प्रचंड कार्य पार पाडायला आपल्यापाशीं तज्ज्ञ माणसें कुठें आहेत? नि तरीहि सर्व सेवानिवृत्त लष्करी अधिकाऱ्यांना अजून घरीं कां बसविलें आहे? जनता युद्ध-कार्याबद्दल अभूतपूर्व उत्साह दाखवीत असली, तरी या कार्यांत सरकार अद्याप सुसूत्रता आणूं शकलेलें नाहीं हें जेवढें खरें आहे, तेवढेंच सरकारी कारभारांत युद्ध-कार्याची निकड आढळून येत नाहीं, हेंहि कठोर सत्य आहे ! सारें कांहीं मंद, सुस्त गतीनें चालू आहे. पंतप्रधान परवां मुलांच्या मेळाव्यांत म्हणाले कीं, मुलांनो, तुम्हीं मोठे होऊन तुम्हांला कदाचित् या युद्धांत भाग घ्यावा लागेल ! तो काळ समोर ठेवूनच सरकार तयारी करीत आहे कीं काय, समजत नाहीं!

वाटाघाटी–तडजोड ही आपल्या सरकारची जुनी खोड आहे. सरकारच्या रक्तांत ती भिनली आहे ! कितीहि तडाखे बसले तरी ती जात नाहीं असें दिसतें. पण सरकारमधल्या शहाण्या लोकांनीं दक्ष राहिलें पाहिजे. महमद घोरी माघारी फिरला, पण अधिक तयारी करून परत आला. अहमदशहा अबदालीहि मागें फिरला, पण पुन्हां प्रचंड सैन्यासह चालून आला. माओ त्से तुंग मागें जातोसें दिसलें, तरी तो परत येणार आहे. अधिक तयारीनिशीं येणार आहे. त्याची जात घोरी-अबदालीहून निराळी नाहीं !

सुज्ञांस अधिक काय सांगणार ?

—००—

# लष्करी अजिंक्यत्वाचें थोतांड

चिनी युद्ध–विराम योजना भारतानें मान्य केली नाहीं, तरी भारत सरकारनें गोळीबार न करण्याचा निर्णय घेतला. यामुळें युद्ध आघाडी-वर शांतता पसरली. सेला भागांत अडकलेले आपले सैनिक परत आले व चिनी सैन्यासंबंधीं त्यांनीं सांगितलेल्या कांहीं हकीकती प्रसिद्ध होऊं लागल्या. तटस्थ राष्ट्रांची परिषद कोलंबो येथें भरली व पुन्हां वाटाघाटी व तडजोडीच्या भाषेला जोर आला. यामध्यें एक मुद्दा सूक्ष्मतेनें घोळविला जाऊं लागला, तो म्हणजे चिनी फौजेच्या श्रेष्ठतेचा.

२० डिसेंबर, १९६२

NO Armies in the world are invincible; so is the German Army! पोलंड, नॉर्वे, डेन्मार्क, हॉलंड, बेल्जम, फ्रान्स, युगोस्लाविया नि ग्रीस येवढ्या युरोपीय राष्ट्रांचा विद्युत्गतीनें फडशा पाड-णारी हिटलरची सेना, युरोपच्या भूमीवरील अखेरच्या बलिष्ठ सेनेला नेस्तनाबूत करण्यासाठीं, २२ जून, १९४१ रोजीं रशियांत घुसली. दहा आठवड्यांत आमची रशियांतील मोहीम समाप्त होईल, अशी ग्वाही जर्मन परराष्ट्रमंत्री हेर फॉन रिबेन्ट्रॉप यानें जाहीरपणें दिली. जगांतील इतर देशांचा अंदाजहि यापेक्षां निराळा नव्हता. रिबेन्ट्रॉपचा निर्वाळा बरोबर आहे, असें मत ब्रिटनचे रशियांतील वकील सर स्टॅफर्ड क्रिप्स यांनीं चर्चिलपाशीं व्यक्त केलें. अमेरिकन युद्धखात्यानें प्रे. रूझवेल्टना सादर केलेल्या आपल्या अहवालांत 'हिटलरला रशियाचा पाडाव करायला किमान एक महिना ते कमाल ३ महिने येवढा कालावधि पुरेल' असें भाकित केलें होतें. या वेळीं स्टॅलिननें मात्र आपल्या देशबांधवांना सांगितले तें हें कीं, जगांतली कोणतीहि सेना अजिंक्य असूं शकत नाहीं नि जर्मन सेनाहि या नियमाला अपवाद नाहीं !

'चिनी सेनेशीं लढाल तर जान व जमीन दोन्हीहि गमावाल' असा प्रचार डांगे-रणदिवे भारत–चीन सीमातंटा सुरू झाल्यापासून करीत होते. प्रत्यक्ष युद्ध सुरू झाल्यावरहि 'चीनमध्यें कंत्राटदार नाहींत; अशा राष्ट्राच्या सैन्याशीं आपण काय लढणार?' असे सवाल विचारून, आपली हिंमत खचविण्याचा उद्योग भाई डांगे व त्यांच्या भाईभाईनीं चालविला आहे. 'संरक्षणाबाबत सब कुछ ठीक है' या माजी संरक्षणमंत्र्यांच्या आश्वासनावर निर्भर राहिलेली जनता, नेफांतील आपल्या जबरदस्त पराभवानें कांहींशीं दिङ्मूढ बनली आहे. १५–२० हजार चिनी सैनिक सेला खिंडीला बगल देऊन १०-१२ हजार फूट उंचीचे डोंगर रातोरात उतरून आले; मोनपा लोकांच्या वेषांत ते भारतीय ठाण्यांच्या पाठीमागें घुसले; त्यांनीं तामिळ, मलायलम् आदि भारतीय भाषांत हुकूम फर्मावून आपल्या जवानांची दिशाभूल केली; या बातम्यांमुळें चिनी सैन्याच्या कोठारांत युक्त्याप्रयुक्त्यांचा भरणा फार मोठा आहे, अशी समजूत गेलीं १५ वर्षे 'युद्ध' या शब्दापासूनहि वंचित ठेवलेल्या आपल्या जनतेची झाली आहे. या सर्व गोष्टींचा फायदा घेऊन, कम्युनिस्ट व त्यांचे वाटाघाटवादी सहप्रवासी, आपल्या भाषणांतून व लिखाणांतून चिनी सेना अजिंक्य असल्याचा सूर काढीत आहेत. या अजिंक्य सेनेशीं लढून आणखी अब्रू कशाला घालवा; त्यापेक्षां वाटाघाटी करून चिन्यांशीं तडजोड केलेली बरी, या भावनेप्रत सर्वसामान्य जनतेला आणणें हा त्यांचा हेतु आहे. पण चिनी सेना अजिंक्य आहे, ही भावना केवळ घातकच नव्हे, तर सर्वथैव चुकीची आहे. इतिहास असें सांगतों कीं, आजपर्यंत कोणतीहि सेना अजिंक्यपद मिळवूं शकलेली नाहीं. हॅनिबॉल, सिकंदर, नेपोलियन आदि सर्व रणवीरांना पराभव पत्करावे लागले. स्वतःच्या चुका सुधारण्याची मनाची तयारी असेल, शत्रूची बलस्थानें व मर्मस्थानें हुडकून त्यानुसार आपलें तंत्र नि डावपेंच बदलण्याची इच्छा असेल नि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे शत्रूला नेस्तनाबूद करण्याचा पोलादी निर्धार असेल, तर कोणाच्याहि अजिंक्यत्वाचा फुगा फोडतां येतो; शत्रू केवढाहि प्रबळ असो, त्याच्यावर मात करतां येते.

★★★

# हिटलरचें युद्ध-यंत्र

हिटलरचें नाझी सैन्य हें एक अद्‌भुत लष्करी यंत्र होतें. जर्मनीची शंभर वर्षांची लढाईची परंपरा, जर्मन वर्णश्रेष्ठतेच्या प्रचारामुळें सैनिकांत निर्माण झालेला राष्ट्रीय अहंकार व नवनव्या कल्पनांचें स्वागत करण्याचा हिटलरचा स्वभाव, यायोगें जर्मन सेनेनें आपल्या पराक्रमाचे विविध आविष्कार प्रगट केले. पोलंडमध्यें ज. गुडेरियनचे रणगाडे, मागाहून येणाऱ्या पायदळाची वाट न पाहतां सपाटयानें पुढें घुसले व त्यांनीं दळणवळणाचीं प्रमुख केंद्रें ताब्यांत घेऊन पोलिश सैन्याच्या पिछाडीला गोंधळ उडवून दिला. रशियामध्यें जर्मन सैन्य हेंच तंत्र उपयोगांत आणील, अशी रशियन सेनापति टिमोशिंको व बुडेनी यांची कल्पना होती व म्हणून त्यांनीं आघाडीवरचीं ठाणीं चिवटपणें धरून ठेवलीं. पण जर्मन सेनेनें आपलें तंत्र बदललें. गुडेरियनचे रणगाडे प्रथम वेगानें पुढें गेले व पुन्हां मागें फिरून त्यांनीं रशियन ठाण्यांची दोन्ही बाजूंनीं कोंडी केली ! हॉलंड, बेल्जियम व फ्रान्समध्यें जर्मनांनीं मोक्याच्या ठाण्यांवर छत्री-सैनिक उतरवून, काय झालें हें शत्रूला समजायच्या आंतच तीं ठाणीं काबीज केलीं व आपल्या मुख्य सैन्याला वाट मोकळी करून दिली. क्रीट बेटांत केवळ छत्री-सैनिकांच्या बळावर त्यांनीं ब्रिटिश सेनेला हुसकून लावले.

जर्मन विमानदळ, पायदळ व रणगाडा-दल यांचा वेग व त्यांचें आपसांतील सहकार्य हें केवळ आश्चर्य होतें. प्रथम जर्मन विमानें येत व शत्रूच्या ठाण्यावर हल्ले करीत; नंतर तोफखाना गर्जे; त्यापाठोपाठ पायदळ येई व त्यामागोमाग रणगाडा-दल घुसे. यानंतर पुन्हां विमानें येत नि याप्रमाणें जर्मन सैन्याची आगेकूच अव्याहत चालू राही. मात्र हें सारें विद्युत्‌गतीनें चाले. फ्रेंच-जर्मन सीमेच्या सेडान भागांतून ज. गुडेरियनचे रणगाडे इतक्या वेगानें घुसले कीं, त्या वेगानेंच फ्रेंच सेनेला प्रथम आश्चर्यचकित नि लगेच गर्भगळित करून टाकले. फ्रेंच सेनापति ज. जिरॉं सकाळची दाढीबिढी आटोपून, कडक पोशाख करून आघाडीवर जाण्यासाठीं तंबूबाहेर आला तो तेथें जर्मन रणगाडे येऊन थडकले नि त्यांनीं जिरॉंला अटक केली. ज. गुडेरियननें एक मजेदार उदाहरण नमूद केलें आहे. तो म्हणतो—आम्ही रॉमी या रशियन शहरांत येऊन थडकलों तेव्हां तेथें ट्रॅमगाडया चालू होत्या. कारण जर्मन सेना अद्याप बरीच दूर आहे, अशीच त्यांची कल्पना होती ! पण एवढया वेगांतहि गफलत कधीं झाली नाहीं. जर्मन विमानदलानें स्वतःच्या रणगाडयांवर वा त्यानें जिंकलेल्या

ठाण्यांवरच बाँबहल्ला केला, असे प्रकार घडले नाहींत. त्याचप्रमाणें रणगाडे पोहोंचायच्या आधीं जर्मन विमानांनीं तीं ठाणीं भाजून काढलीं नाहींत, असाहि प्रकार झाला नाहीं.

जर्मन युद्ध-यंत्राची कार्यक्षमता अपूर्व होती. लढाईच्या प्रत्येक शाखेंत जर्मन सैन्य इतरांपेक्षां अधिक तरबेज होतें. रणगाडे हाताळण्याचें जर्मनांचें कसब तर असाधारणच होते. रणगाडे चालविणारे सैनिक व ते दुरुस्त करणारे तंत्रज्ञ प्रत्यक्ष रणांगणावरील धुमाळींतहि, सर्कसमधल्या कसरत-पटूंच्या पथकासारखे पद्धतशीर कामें करीत. मोडलेले रणगाडे ते मागें खेचीत व लगेच दुरुस्त करून पुन्हां आघाडीवर धाडीत. जर्मन रणगाडे व रणगाडाविरोधी तोफा यांच्या सहकार्याएवढें सहकार्य मी तरी पाहिलेलें नाहीं, असें ब्रिटिश युद्धवार्ताहर ॲलन मूरहेड म्हणतो. (पहा—ॲलन मूरहेडकृत आफ्रिकन ट्रायॉलॉजी.) या सर्वंकष तयारीमुळें पहिली ३ वर्षें ब्रिटिश सेना नाझी फौजेसमोर उभी राहूं शकली नाहीं. मध्यपूर्वेतल्या ब्रिटिश सेनेला चर्चिलनीं आपल्यापासचे सर्वोत्कृष्ट असें सारें कांहीं दिले. तरीहि तोब्रुकची ३३ हजार शिबंदी अवघ्या २ दिवसांच्या लढाईनंतर शरण गेली ! चर्चिलनीं लिहिलें आहे—माझ्या आयुष्यांत एवढी नामुष्की मी कधींच सहन केलेली नव्हती ! उत्तर आफ्रिकेंतल्या आमच्या सैन्याची हीच हिंमत असेल, तर तिला कोणीहि वांचवूं शकणार नाहीं! थोड्याच दिवसांत ज. रोमेल इजिप्तचे दरवाजे ठोठावूं लागला. तेव्हां चर्चिलनीं संतापानें ज. ॲलन ब्रुकना विचारले—आपलें मध्यपूर्वेतील सैन्य गेलें तरी कुठें? पगार व रेशनसाठीं तेथें ७॥ लक्ष लोक उभे रहातात नि लढाई-साठीं अवघे १ लाखच मिळतात, हा काय प्रकार आहे? उरलेल्या ६॥ लाखांचे काय धंदे चालू आहेत?

पण चर्चिलजवळ विजयाचा निर्धार होता नि सैनिकांपाशीं लढण्याची जिद्द होती. यामुळें पराभवांतूनच अंतिम विजयाची तयारी होत होती. चुकांची पुनरावृत्ति कटाक्षानें टाळली जात होती नि नवीं तंत्रें आत्मसात केलीं जात होतीं. ब्रिटिश रणगाड्यांच्या वेगांत सुधारणा झाली; जर्मन रणगाड्यांचे चिलखत फोडणाऱ्या रणगाडाविरोधी तोफा आल्या; जर्मन विमानें सूर मारीत असतांनाच, त्यांवर हल्ले चढविण्याचे कसब ब्रिटिश वैमानिकांनीं संपादन केलें; रणगाड्यांना रणगाड्यांनीं टक्कर देण्या-ऐवजीं, तोफांनीं जर्मन रणगाडे फोडले जाऊं लागले; विमान—दल, रण-गाडा-दल, आरमार नि पायदळ यांच्यांत आवश्यक तें सहकार्य निर्माण झालें; सेनापति साहसी डावपेंच करूं लागले. या सर्वांचा परिणाम १९४२ च्या

अलामीनच्या विजयांत झाला. जर्मन अजिंक्यत्वाबद्दलचा भयगंड नष्ट झाला. अलामीनपर्यंत ब्रिटनला विजयाचें दर्शन झालें नव्हतें. अलामीननंतर ब्रिटनला पराभवाचें स्वप्नसुद्धां पहावें लागलें नाहीं ! !

रशियानेंहि जर्मन सैनिकी तंत्र हळूहळू आत्मसात केलें. युद्धाच्या प्रारंभीच्या काळांत रशियन सेनापतींनीं केलेल्या चुकांची पुनरावृत्ति झाली नाहीं अशी कबुली ज. गुडेरियननें दिली आहे. लाल रणगाड्यांत प्रारंभीं बिनतारी यंत्रें नसत. त्यामुळें त्यांचें परस्परांत दळणवळण नसे. हलके-हलके सर्व रणगाड्यांत बिनतारी यंत्रें आलीं. जर्मनांप्रमाणेंच रणगाडा-दुरुस्ती पथकें रणांगणावर येऊन दुरुस्त्या करूं लागलीं. रशियन अधिकारी नवीं तंत्रें शिकायला सदैव सज्ज असत नि म्हणून युद्ध लांबूं लागलें तसतसा रशियन अधिकाऱ्यांचा दर्जा सुधारत गेला, असें मत जर्मन जनरल डिटमारनें व्यक्त केलें आहे. साहजिकच स्टॅलिनग्राडच्या लढाईपासून युद्धाचें पारडें फिरलें नि बर्लिनवरील स्वस्तिक चिन्हांकित नाझी निशाण खालीं खेंचण्याचा मान लाल फौजांनीं मिळविला.

★★★

## जपान्यांचा झपाटा

जपानी सैन्याची जात निराळी होती. ती सेना यंत्रसज्ज होती; पण जर्मन सेनेएवढीं शस्त्रसामुग्री तिच्यापाशीं नव्हती. मात्र, प्रशांत सागरांतील बेटें व आग्नेय आशियांतील देशांत आवश्यक अशी जंगलांतील लढाई खेळण्यांत जपानी सैनिक वाकबगार होता. ज्या जंगलांमुळें अँग्लो-अमेरिकन फौजांचा थरकांप होत असे, त्या जंगलाबद्दलची जपानी सैनिकाची भीति साफ नष्ट झाली होती. पर्ल बंदरावरील हल्ल्यानंतर ३० हजार जपानी सैनिक मलायाच्या किनाऱ्यावर उतरले, त्यावेळीं मलायांत १ लक्ष ब्रिटिश सेना होती. पण जपानी सेनेनें ब्रिटिश सेनेवर समोरासमोर हल्ला करण्याचा प्रयत्नच केला नाहीं. दोस्त सेनेनें आघाडी धरली कीं, जपानी सैनिक जंगलांत झिरपत व दोस्त सैन्याच्या बगलांवर व पाठीमागें जाऊन त्या सैन्याचे पुरवठा मार्ग तोडून टाकीत. खुद्द जपानी सैन्य मात्र पुरवठा-मार्गांवर फारसें कधींच अवलंबून नसे. यंत्रचलित पण हलकीं शस्त्रें व ४-६ दिवसांचे खाद्यपदार्थ त्यांच्यापाशीं असत व अन्न संपलें तर वाटेंत मिळणाऱ्या अन्नावर गुजराण करण्याची त्यांची सिद्धता

असे. जपान्यांच्या या डावपेचांमुळें दोस्त सैन्य हबकून गेले. आपल्याला जपानी सैन्यानें कोंडले असल्याचा भास त्यांना सदैव होऊं लागला व माघार हाच त्यांनीं परवलीचा शब्द बनविला. अवघ्या महिनाभरांत सारा मलाया खालीं करून विस्कटलेले दोस्त सैन्य, सिंगापूरमध्यें येऊन पोहोंचलें !

सिंगापूर हा ब्रिटिशांचा पूर्वेकडील 'अभेद्य' आरमारी तळ. हा तळ इंच इंच लढला पाहिजे व शरणागतीचा विचारहि मनांत आणला जातां कामा नये, असा निर्वाणीचा हुकूम चर्चिलनी पाठविला. सिंगापूरचे प्रमुख सेनापति ले. ज. पर्सिवल यांनीं आपल्या सेनाधिकाऱ्यांना एकत्र केले व सिंगापूरवर धडक देणाऱ्या जपानी सेनेवर प्रतिहल्ला चढविण्याची योजना मांडली. पण सर्व सेनाधिकाऱ्यांनीं एका आवाजांत ही योजना अमान्य केली. दोस्त सेना मनानें साफ खचलेली असल्यामुळें ती लढण्यास असमर्थ आहे, असें त्यांनीं सांगितलें. चर्चिलचा हुकूम गुंडाळून ठेवून ७० हजार दोस्त सैन्य जपान्यांना शरण गेलें !

मलायाच्या मोहिमेनें जपानी सेनेच्या श्रेष्ठत्वाबद्दल जो दबदबा निर्माण झाला होता, त्यावर सिंगापूरच्या शरणागतीनें शिक्कामोर्तब केले. यामुळें ब्रह्मदेशांतली ब्रिटिश फौज जपानी फौजेपुढें उभी राहूं शकली नाहीं. आघाडीच्या बगलांवरून जंगलांत झिरपायचे, पिछाडीला जाऊन ब्रिटिश सेनेची रसद तोडायची व घाबरून माघार घेणाऱ्या फौजेवर हल्ले चढवायचे, या जपानी डावपेंचांची ब्रिटिश सेनांनीं एवढी हाय घेतली कीं, मोठी लढाई न होतांच ब्रह्मदेशहि ब्रिटिश फौजांनीं मोकळा केला. मध्य ब्रह्मदेशांत मंडालेपाशीं जपानी फौजेविरुद्ध चिअँग कै शेकच्या १२ डिव्हिजन्स उभ्या राहिल्या. पण लढाईला तोंड फुटतांच त्या जवळ-जवळ विरघळून गेल्या !

पण जपानी सैन्याच्या या श्रेष्ठत्वाविरुद्धहि तोडगा मिळाला. युद्धाच्या प्रारंभीं झालेल्या मलाया, फिलिपाइन्स, जावा, बोर्निओ येथील मोहिमांचे धडे पक्के गिरविले गेले व अँग्लो-अमेरिकन सेनाधिकारी लगोलग आपल्या सैन्याच्या शिक्षणाच्या तयारीला लागले. सिंगापूरमधील कांहीं निष्णात अधिकाऱ्यांना तेथून बाहेर काढून भारतांत आणलें गेलें व त्यांनीं भारतांत ब्रिटिश नि भारतीय सैन्याला जंगलांतील युद्धाचे शिक्षण देण्यास प्रारंभ केला. भारतांतील डोंगराळ व जंगलसमृद्ध भागांत दोस्त सेना गेल्या व तेथें शिक्षण सुरू झालें. ऊन व पावसांत ८ तासांत २५ मैल व २४ तासांत ५० मैल हें

लक्ष्य ठेवून सैनिक चाल करू लागले. पावसांतहि झोपण्यासाठीं त्यांना तंबू देण्यांत आले नाहींत. अधिकारी व सैनिकांना स्वत:चे खंदक खणावे लागत, अन्न शिजवावें लागे व झोपेची व्यवस्था करावी लागे. जंगलांत झिरपून शत्रूला गराडा कसा घालायचा याचे धडे त्यांना सतत शिकावे लागले. जंगलांतील अंधार, आवाज, श्वापदें यांची त्यांना संवय करण्यांत आली. सुप्रसिद्ध चिंदित्स व मेरिल्स मराऊडर्स या पथकांना या जंगली-युद्धाची बिनीचीं पथकें मानावीं लागतील. (पहा—रॉय मॅक्ल्वीकृत दि वॉर इन बर्मा.)

अवघ्या वर्षभराच्या शिक्षणानें गाडें उलटलें. जपानी लष्कराच्या श्रेष्ठत्वाबद्दलचें गूढ व भीति नाहींशीं झाली. डावपेंचांतील जपानी वर्चस्व नष्ट झाले. त्याचबरोबर जपानी फौजांच्या योजना लवचिक नसतात; पूर्वी ठरलेल्या योजनांत ऐनवेळीं बदल करायची पाळी आली तर त्यांची तारांबळ उडते, हें त्यांचें वैगुण्य लक्षांत घेऊन, दोस्तांनीं योजना आखतांना लवचिकपणावर भर दिला. परिणामीं प्रशांत सागरांतील बेटांत अमेरिकन फौजांनीं जपानी फौजांवर मात केली नि दोस्त फौजांनीं ब्रह्मदेश जपान्यांच्या हातून मुक्त केला. हिरोशिमा व नागासाकीवर अणुबॉंब टाकल्यावर जपाननें शरणागति पत्करली हें खरें आहे. पण पराभवाच्या भारानें वाकलेल्या उंटावरील ती अखेरची काडी होती. जपानी लष्कराचा पराभव त्यापूर्वीच झालेला होता.

युद्धापूर्वी अत्यंत परिश्रमानें जर्मनी व जपान यांनीं प्रचंड व प्रभावी युद्ध-यंत्र उभें केलें. पण चुका टाळून नवे धडे शिकण्याची इच्छा व त्याहीपलीकडे दुर्दम्य निर्धार यांच्या जोरावर, दोस्त राष्ट्रांनीं अवघ्या २-२॥ वर्षांत, त्यांच्या अजिक्यत्वाचें थोतांड मोडून काढलें.

—०००० —

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों: दि: ............

# चिनी सामर्थ्याचा बागुलबुवा !

२१ डिसेंबर, १९६२

कोणतीहि प्रचंड व गूढतेचें आवरण असलेली गोष्ट माणसाच्या मनांत कुतूहलाबरोबरच एक प्रकारच्या भीतीची भावनाहि निर्माण करते ! चीनचा प्रचंड विस्तार, त्याची अफाट लोकसंख्या व पूर्वीपासून बाहेरच्या जगाला चीनबद्दल असलेलें अल्प ज्ञान, यांमधून अशीच एक भीतीची भावना निर्माण झालेली आहे. जगाच्या प्रत्येक देशाचा सर्वांगीण व तपशीलवार अभ्यास केलेले पाश्चात्य अभ्यासक शेंकड्यांनीं मोजता येतील. पण चीनचा अभ्यास केलेले पाश्चात्य लोक हाताच्या बोटावर मोजण्याएवढेंच आहेत. माओ त्से तुंगची 'लाल' राजवट चीनमध्यें आल्यावर तर, त्यानें कम्युनिझमच्या स्वभावधर्मानुसार चीन-भोंवती पोलादी पडदा उभारला व चीनभोंवतालचें गूढतेचें आवरण अधिकच दाट केलें. ही गूढता, चीनच्या लष्करी सामर्थ्याबाबत विविध लोकांनीं प्रसिद्ध केलेले अफाट अंदाज व माओ त्से तुंगच्या रणनीति नि डावपेंचांतील कुशलतेबद्दल पिटण्यांत आलेले डिंडिम, या सर्वांचा परिणाम चीनबद्दल एक प्रकारची भीति निर्माण होण्यांत झाला आहे. भारत सरकारनें तिबेटबाबत जें शरणागतीचें धोरण पत्करलें, त्याचें मूळ या भीतिगंडांतच आहे, हें नाकारण्यांत हंशील नाहीं; मग कांहीं पुस्तकी मार्क्सवादी पंडित, या शरणागतीवर तत्त्वज्ञानाच्या कितीका झुली चढवेनात !

चिअँग कै शेकच्या सरंजामशाहींतून आजचा लाल चीन निर्माण झाला. सरंजामशाहींत साऱ्या जगभरच प्रचंड सैन्यें असत. पानिपतच्या युद्धाचे वेळीं महाराष्ट्राची लोकसंख्या ५० लाखाच्या आसपास असावी, असा अंदाज आहे. पण मराठ्यांपाशीं ३-३।। लक्ष सैन्य होतें, ही गोष्ट पानपतला ३ लाख बांगडी फुटली, यावरून उघड होते. मराठ्यां-बरोबरच भारतांतले लहानमोठे राजे त्यावेळीं फौजा बाळगून होते. या

सर्वांचा एकत्र हिशोब केला, तर भारतांतील तत्कालीन सैन्यसंख्या १०-१२ लक्षापर्यंत जायला हरकत दिसत नाहीं! चिअँगपाशीं असेंच प्रचंड सैन्य होतें. चिनी यादवी व चीन-जपान युद्धाचा इतिहास वाचला, तर चीनच्या बाजूनें अनेक लढायांत लक्षावधि सैन्य वापरण्यांत आल्याचे उल्लेख जागजागीं सांपडतील. १९३३ च्या ऑक्टोबरांत चिअँगनें 'लाल' सेनेविरुद्ध जी चढाई सुरू केली होती, तींत त्यानें १० लक्ष सैनिक वापरले होते! चिअँगच्या प्रचंड सैन्य-दलाला टक्कर देण्यासाठीं माओनेंहि भारी सेना उभारली. क्रांतीची लढाई चालू झाल्यावर तर चिअँगचे सैन्य प्रचंड संख्येनें कम्युनिस्टांकडे येऊं लागल्यानें, कम्युनिस्टांची सैन्य-संख्या 'शिराळशेट'च्या पोटासारखी फुगली! क्रांतीचा विजय होताच, या सर्व सैन्याला रजा देणें अशक्य होतें. कारण देशांत पुरेसा कामधंदा नसल्यानें या बेकार सैनिकांनीं असंतोष माजविला असता! तज्ज्ञांचा अंदाज असा आहे कीं, १९५० सालीं लाल चीनची सैनिकसंख्या ५० लक्ष एवढी असावी! पण खर्चाच्या दृष्टीनें हें प्रचंड सैन्य डोईजड होऊं लागलें; त्याचबरोबर शस्त्रांनीं व गुणवत्तेनें वरचढ असलेल्या शत्रूशीं लढतांना केवळ संख्याबळ उपयोगी पडूं शकत नाहीं, हा कटु धडा माओला कोरियांत पुनःपुन्हां शिकावा लागला! त्यामुळें कोरियन युद्धापासून सैन्यसंख्या क्रमशः कमी करण्याची मोहिम चीननें चालविली असून, सध्यां चीनचे खडे सैन्य २५ ते ३० लक्षांच्या दरम्यान असावे! चीनला भारताचे शस्त्रसंन्यासाचे व शांततेचें तत्त्वज्ञान पटत चाललें आहे, असा अर्थ मात्र कृपा करून कोणी काढूं नये. कारण सैन्यसंख्या कमी होत असली तरी चीनचा लष्करी खर्च वाढत आहे! १९५० सालीं चिनी लष्करी खर्च सुमारें ३५० कोटि रुपये होता; आज तो ११०० कोटि रुपयांपर्यंत गेला आहे! आपलें लष्कर अधिकाधिक शस्त्रसज्ज करण्याचा माओचा विचार आहे. तरीहि चीनच्या यांत्रिक मागासलेपणामुळें अद्याप बहुसंख्य सैनिकांपाशीं गेल्या महायुद्धांतली जुनाट शस्त्रास्त्रेंच आहेत!

या सैन्याबाबत आणखीहि एक गोष्ट लक्षांत ठेवायला हवी. चीनला दक्षिण कोरिया, फोर्मोसा, लाओस, व्हिएतनाम व भारत एवढ्या देशांसमोरची सुमारें ६ हजार मैलांची आघाडी संभाळावयाची आहे. त्याचबरोबर अंतर्गत अशांततेच्या बंदोबस्तासाठींहि त्याला कांहीं सैन्य नेहमींच ठेवावे लागेल. यामुळें माओला आपल्या सैन्याचा तिसरा हिस्सा सैन्यहि भारताच्या आघाडीवर आणणें शक्य होण्यासारखें नाहीं!

चिनी स्वयंसेवक-दल मात्र प्रचंड आहे. यांत १ ते १॥ कोटि

स्वयंसेवक असावेत. चिनी राज्यकर्त्यांच्या योजनेप्रमाणें ही संख्या ३ कोटीं-पर्यंत न्यावयाची होती. पण तो आंकडा अद्याप 'बहोत दूर' आहे. तरुणांमध्यें काटकपणा, संघभावना व शिस्त उत्पन्न करण्यासाठीं या स्वयंसेवक संघटनेचा उपयोग झाला, तरी सैन्य म्हणून या दलाचा फारसा उपयोग नाहीं. कारण भारतांतल्याप्रमाणेंच चीनमध्येंहि बंदुका व दारूगोळा यांची चणचण आहे. अनेक स्वयंसेवक-पथकांना लुटुपुटीच्या रायफली व लाठ्यांच्या साहाय्यानें शिक्षण घ्यावें लागतें; मग हल्लींच्या युद्धांतील गुंतागुंतीच्या शस्त्रांचें शिक्षण सोडूनच द्या !

★★★

## नव्या बाटलींतील जुनी दारू

प्रदीर्घ लष्करी संघर्षांतून माओ वर आला. स्वाभाविकच त्याचें युद्धविषयक ज्ञान श्रेष्ठ प्रतीचें आहे. पण क्लॉझेविट्झप्रमाणें लष्करी विचारांत किंवा हॅनिबॉल, नेपोलियन किंवा गेल्या युद्धांतील जर्मन रणगाडा—दलाचा नेता ज. हाइंझ गुडेरियन यांच्याप्रमाणें डावपेंचाच्या शास्त्रांत माओनें कांहींहि नवी भर घातलेली नाहीं. चिअँग कै शेकच्या सरंजामशाहींत, आपलें अस्तित्व कायम टिकवून, माओला कम्युनिस्ट पक्ष व लाल सेना वाढवावयाची होती. चीनचा प्रचंड विस्तार, डोंगराळ मुलुख व चिअँगची प्रचंड सेना या गोष्टी लक्षांत घेऊन त्यानें गनिमी काव्याचा आश्रय घेतला व आपला पक्ष बळकट केला. माओच्या या गनिमी लढाईच्या डावपेंचांत, मराठ्यांच्या इतिहासाचें सामान्य ज्ञान असणारालाहि अभिनव असें कांहीं वाटणार नाहीं. पुनःपुन्हां उद्धृत केलें जाणारें माओचे डावपेंचांतले एक वचन घ्या. "शत्रूनें चढाई केली कीं, आम्ही माघार घेतों; शत्रू थांबला कीं, आम्हीं त्याला सतावून सोडतों; शत्रू दमला कीं, आम्हीं हल्ले चढवितो नि शत्रू पळूं लागला कीं, आम्हीं पाठलाग करतो." (Enemy advances, we retreat; Enemy halts, we harass; Enemy tires, we attack; Enemy retreats, we pursue.) शिवाजीची रणनीति यापेक्षां निराळी काय होती ? अफझलखान असो वा शाहिस्तेखान असो, शिवाजीनें समोर जाऊन त्यांच्या सैन्यावर कधींच धडक दिली नाहीं. शिवाजीच्या छोट्या सैन्याला प्रचंड विजापुरी वा मोंगली सेनेशीं समोरासमोर सामना देणें अशक्यच होतें. म्हणून या सैन्यांसमोर तो कांहीं किल्ले, गावें सोडून माघार घेई व बिकट डोंगरी प्रदेशांतल्या दुर्गांत

जाऊन बसे. तेथें येऊन शत्रूनें मुक्काम ठोकला कीं, मराठी सैन्य त्यांची रसद सोडून त्यांना त्रास देई व शत्रूची दमछाक झाली कीं, त्यांच्या छोटया-छोटया विभागांना गांठून त्यांची लांडगेतोड करी. शत्रू पराभूत होऊन पळू लागला कीं, त्याचा पाठलाग करणें हा तर युद्ध-शास्त्रांतला प्राथमिक नियम आहे ! माओचें दुसरें एक वचन पहा—तुम्हांला पश्चिमेकडे हल्ला करायचा असेल, तर पूर्वेकडे गिल्ला करा (If you want to attack in the west, raise hell in the East)! शाहिस्तेखानाचीं बोटें छाटून शिवाजी महाराज सिंहगडाकडे पळाले; पण खानाची दिशाभूल करण्यासाठीं त्यांनीं कात्रजच्या घाटांत पलिते पेटवून उजेड केला ! सुरतेवर हल्ला करण्यापूर्वीं प्रत्येक वेळीं, शिवाजी आपण कोंकणावर स्वारी करीत असल्याची आवई उठवी ! छत्रपतींच्या राज्याचा विस्तार वाढला, मराठी सेनांची संख्या वाढली, तसतसे या गनिमी काव्याच्या तंत्राचें शास्त्रच बनलें. शत्रूच्या प्रथम अंगावर जायचें, लढाईला तोंड फुटले कीं, थोडया वेळानें आपण घाबरलों असें दाखवून पळ काढायचा, शत्रूनें पाठलाग करून तो दमला व विस्कळित झाला कीं, तोंडें फिरवून त्यांचा निःपात करायचा, ही उत्तर शिवशाहींत व संभाजी नि राजाराम महाराजांच्या कालांतली, मराठी फौजांची लढण्याची आवडती पद्धत होती. संभाजीच्या कारकीर्दींत, औरंगजेब प्रचंड व चतुरंग मोंगली फौज घेऊन महाराष्ट्रांत उतरल्यावर, संताजी घोरपडे व धनाजी जाधव या रणधुरंधरांच्या नेतृत्वाखालीं २७ वर्षेपर्यंत मराठ्यांनीं त्याला तोंड दिलें, तेव्हां गनिमी युद्धांतील मराठ्यांच्या कौशल्याच्या नौबती साऱ्या भारताला ऐकूं गेल्या. येवढें प्रचंड संकट माओनें कधीं अनुभविलें नाहीं. आधुनिक युगाच्या पद्धतीप्रमाणें, आपलें गनिमी तंत्र ग्रंथनिविष्ठ करून, त्याला त्यानें शास्त्रीय सिद्धान्ताचा पोषाख दिला, येवढेंच माओचें श्रेय ! तें मान्य करायला मुळींच हरकत नाहीं ! !

★★★

## चिनी सैनिक कसा आहे ?

चिनी सैनिक काटक व चिवट आहे. दुष्काळ, जपानी स्वारी व यादवी यांमुळें गांजलेल्या शेतकरी वर्गांतून तो आला असल्यामुळें त्याच्या गरजा फारच कमी आहेत आणि त्या वाढणार नाहींत, याची लाल सैन्यांत डोळ्यांत तेल घालून जपणूक करण्यांत येते. त्याचा

आहार इतर चिनी नागरिकांच्या तुलनेनें चांगला असला, तरी अगदी सामान्य आहे. शारीरिकदृष्टया कार्यक्षम रहातां यावे, यासाठीं आठवडयां-तून दोन किंवा तीनवेळां त्याला मटन किंवा मच्छी मिळते. पण यापलीकडे मेवामिठाई वा आइस्क्रीम या वस्तु त्याच्या वांटयाला येत नाहींत. त्याला वर्षांतून गणवेशाचा एक जोड मिळतो. पण तो ठिगळांनीं भरून गेला नसेल, तर मध्येंच नवा गणवेश मिळत नाहीं. बहुतेकांना रबरी तळ असलेले कॅन-व्हासचे बूट मिळतात; कारण एवढया प्रचंड सैन्याला कातडी बूट पुरविणें चीनला अशक्य झालेलें आहे ! औषधोपचाराच्या बाबतींत जगांतील सर्व सेना-दलांत विलक्षण जागरूकता बाळगली जाते. पण चिनी सेनेंत साधारणतः ३ हजार सैनिकांमागें एक डॉक्टर असतो. रणांगणावर जखमी झालेल्या सैनिकांची चीनइतकी कमी काळजी इतर कोणीच घेत नसेल ! जखमी सैनिकांना मलमपट्टया न करतां रणांगणावर तसेंच टाकून दिल्याची हजारों उदाहरणें कोरियांत घडलेलीं आहेत ! चिनी सैनिकाच्या दैनंदिन कार्यक्रमांत करमणुकीलाहि स्थान नसते !

सैनिकी शिक्षणांत प्रमुख भर शारीरिक क्षमता वाढविण्यावर दिला जातो. चिनी सैनिकाचा दिवस पहाटें ५ वाजतां उजाडतो व रात्रीं ९ वाजतां समाप्त होतो. लांब पल्ल्यांची चाल (मार्च) करणें, डोंगर चढणें, भारी वजनें वाहून नेणें, उपाशी राहून कामें करणें हे कार्यक्रम पुनःपुन्हां करवून घेतले जातात. लाल सैन्याचे छोटेमोठे अधिकारी, माओचे जुने सहकारी व गनिमी युद्धाच्या तंत्रांत तरबेज असलेले लोक आहेत. पण त्यांना आधुनिक युद्धतंत्रांची व नव्या गुंतागुंतीच्या शस्त्रांची फारशी माहिती नाहीं. सैनिकांच्य शिक्षणांत जो कांटेकोरपणा लागतो, तो चिनी सैन्याच्या शिक्षणक्रमांत अभा-वानेंच आढळतो! यामुळेंच थट्टेनें असें म्हटलें जाते कीं, ज्या वेळीं सैनिकांना काय शिकवावें हें अधिकाऱ्यांना सुचत नाहीं, त्यावेळीं ते 'लाँग मार्च' काढण्याचा हुकूम देतात !

चिनी सैनिकांच्या शिक्षणांतील उणीवा कोरियांतील युद्धांत स्पष्ट झाल्या. अमेरिकन सैन्याविरुद्ध चिनी सैन्यानें सर्वत्र फक्त 'मानवी समुद्रा'चें तंत्र वापरलें. कोरियांत अमेरिकन सैन्य ४-५ लाखाच्या आसपास होतें. त्याविरुद्ध चीननें सुमारें १२ लक्ष सैनिक ओतल्यामुळें, अमेरिकन सेनेला कांहीं काल माघार घ्यावी लागली; पण शस्त्रें व शिक्षण यांनीं वरचढ असलेले अमेरिकन सैन्य अल्पकालांतच सावरले व चिनी सैन्याची त्यानें प्रचंड कत्तल केली. १९५१ च्या फेब्रुवारी-मार्चमध्यें चिनी सेनेनें पहिली चढाई केली, त्यावेळीं अमेरिकन व चिनी यांच्या हानीचें प्रमाण १-१०

असें होतें. चीनला चढाई थांबवावी लागली व ज. मकार्थरनें घोषित केलें कीं, 'कम्युनिस्ट लष्करी सामर्थ्याच्या अजिक्यत्वाच्या थोतांडा'चें पेंकाट आम्ही मोडलें आहे. मॅकार्थरचा हा दावा खरा होता. कारण चीननें मे महिन्यांत पुन्हा चढाई केली तेव्हां त्याला पहिल्यापेक्षां अधिक हानी सोसावी लागली. यावेळीं अमेरिकन व चिनी मनुष्यहानीचें प्रमाण १-२० एवढें होतें !

मनुष्यबलाला युद्धांत केव्हांहि महत्त्व असलें तरी आधुनिक युद्धांत लढणारी माणसें अनेक तंत्रांत व विविध यंत्रें हाताळण्यांत निष्णात असावीं लागतात. पहिल्या चढाईंत चीननें आपली तरबेज पथकें पाठविलीं. पण 'मानवी समुद्रा'च्या तंत्रांत त्यांचे हजारोंनीं बळी पडल्यावर, त्यांच्या जागीं तेवढेच निष्णात सैनिक पाठविणें चीनला शक्य झालें नाहीं. मे महिन्यांतील चीनची दुसरी चढाई मोडून काढल्यानंतर केलेल्या निवेदनांत, कोरियांतील अमेरिकन सेनापति ज. व्हॅन फ्लीट यांनीं सांगितलें—चीननें ५ सेना विभाग वापरले. पण कोरियांत प्रारंभीं आढळले, तेवढें हें सैन्य कसलेलें नव्हतें. आम्हीं पाडाव केलेल्या हजारों चिनी सैनिकांत अनेक तरुण मुलें आहेत व त्यांचीं शस्त्रें नि साहित्य अगदींच निकृष्ट दर्जाचें आहे !


आपण कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठीं लढत आहोंत, या भावनेनें चिनी सैनिक रणांगणांत उतरत असल्यामुळें, तो कडवा असतो. चिनी सैनिकांच्या शिक्षणांत या तत्त्वज्ञानाच्या शिक्षणाला मोठा वेळ दिला जातो. रोज २—३ तास कम्युनिझमवरची व्याख्यानें त्याला ऐकावीं लागतात. कम्युनिस्ट पद्धतीनुसार त्याला स्वतःवर टीका करावी लागते व स्वतःच्या (केलेल्या व न केलेल्या) चुकांची कबुली द्यावी लागते ! एका विशिष्ट मर्यादेपर्यंत राजकीय शिक्षण उपयुक्त ठरतें. पण ही मर्यादा चिनी सेनेंत निश्चितपणें ओलांडली गेली आहे. चिनी सैन्यांतील बढत्या, सैनिकांच्या गुणांवर अवलंबून नसून, त्याच्या कम्युनिझम-निष्ठेवर अवलंबून असतात. सैन्याबरोबर असलेल्या राजकीय अधिकाऱ्यांना जे सैनिक राजवटीशीं अधिक निष्ठावन्त वाटतील, त्यांनाच वरचे हुद्दे देण्यांत येतात. यामुळें सैनिकांत असंतोष तर आहेच; पण त्याहीपलीकडे व्यक्तिगत सैनिकापाशीं जें कल्पनाचातुर्य आवश्यक असतें, त्याचाहि चिनी सैन्यांत अभाव आहे ! हल्लींच्या युद्धांत केवळ वरिष्ठ सेनापति हुषार असून भागत नाहीं; तर कॉर्पोरल्स्, सार्जंट्स, लेफ्टनंट्स असल्या कनिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांपाशींहि उपक्रमशीलता (इनीशिएटिव) असावी लागते ! चिनी अधिकाऱ्यांना अशा प्रकारचें शिक्षण देण्यांत आलेलें नाहीं व बढत्यांमध्यें राजकारणाला प्राधान्य असल्यामुळें उपक्रमशीलता असलेल्या सैनिकांना पुरेसा वाव मिळत नाहीं ! कोरियांत असा अनुभव

आला कीं, कम्युनिस्ट सैन्य आपल्या चढाईच्या योजना कितीतरी आधीं तपशीलवार तयार करी व ज्या प्रदेशांत चढाई करायची तत्सम प्रदेशांत, या योजनांची अनेकदां रंगीत तालीम करी. या योजनांत ऐनवेळीं बदल करणें कम्युनिस्ट सेनापतींना अशक्य होई व याचा फायदा, अशा बदलास सरावलेल्या अमेरिकन सेनेला मिळे. (पहा-ज. मार्क क्लार्ककृत फ्रॉम डॅन्यूब टू दि यालू; प्रकरण-दि फेस ऑफ दि एनिमी.) तोफखाना, शस्त्रदुरुस्ती, वाहतूक व पुरवठा या क्षेत्रांतहि चिनी सेना मागास असल्याचें कोरियांत सिद्ध झालें.

चिनी सैनिक लढवय्या आहे. पण त्याचें नीतिधैर्य ही अत्यंत शंकास्पद बाब आहे. अमेरिकन सैनिक युद्धकैद्यांना फार चांगल्या रीतीनें वागवतात असें समजलें, तेव्हां शेंकडों चिनी सैनिक शरण आले व हजारों युद्धकैद्यांनीं पुन्हां चीनमध्यें जाण्यास नकार देऊन कम्युनिस्ट राजवटीचें पितळ उघडें पाडलें ! 'न्यूयॉर्क टाइम्स'चा सुप्रसिद्ध लष्करी समालोचक हॅनसम बाल्डविन यानें म्हटलें आहे—कोरियांत कम्युनिस्टांचें मर्मस्थान उघड झालें आहे. इत:पर कोणतेहि कम्युनिस्ट राष्ट्र आपल्या सैन्यावर संपूर्ण विश्वास ठेवूं शकणार नाहीं !

—००—

अनुक्रम
आंक


ति बे ट
भू ता न
ने फा
आ सा म
ब्र ह्म दे श
ब्र ह्म पु त्रा
सिआंग डिव्हि.
सुबानसिरी डिव्हि.
कामेंग डिव्हि.
लोहित डिव्हि.
मॅकमहॉन रेषा
१९६० साली चीननें दावा केलेली रेषा
चीननें सुचविलेला ४० किलोमीटर्सचा निर्लष्करी टापू

'नेफा' विभागाचा आलेख

# केवळ बचावानें भागणार नाहीं !

२२ डिसेंबर, १९६२

कोरियांतील युद्धानंतर, यांगत्से क्यांगमधून बरेच पाणी वाहून गेलें आहे. कोरियन युद्धाचे वेळीं (१९५१-५२) लाल क्रांतीचा उन्मेष नि उन्माद दोन्ही कायम होती. जपानी स्वारीचा निःपात झाला नि यादवीहि संपली; यामुळें नवे कम्युनिस्ट राज्यकर्ते चीनमध्यें नंदनवन उभारतील, अशी आशा महापूर, टोळधाडी नि दुष्काळ या संकटांमुळें गांजलेला चिनी शेतकरी बाळगून होता. राज्यकर्ते केवढ्याहि कठीण योजना आंखोत, त्यांना सहकार्य द्यायला तो मनानें नि शरीरानें सज्ज होता. चीनमध्यें एक नवें चैतन्य निर्माण झालें. ज्या ज्या पाश्चात्य निरीक्षकांनीं त्या कालांत चीनला भेटी दिल्या, त्या त्या सर्वांनीं चिनी राज्यकर्त्यांबद्दल प्रशंसेवाचून दुसरा शब्द काढला नाहीं. आमचे भारतीय सहप्रवासी तर हर्षभरानें टेनिसच्या चेंडूसारखे टणाटण उड्या मारीत होते ! पण त्यानंतर पहिली पंचवार्षिक योजना आली. आपल्या सर्व लक्ष्यांचा (टार्गेट्स) भेद करून ती कोठल्या कोठें गेल्याचें ढोल पिटले गेले व त्या पाठोपाठ हनुमान उडी (ग्रेट लीप फॉरवर्ड) मारण्याची माओ-चाओंनीं सिद्धता केली. ही हनुमान उडी किती लांब पडली हें कळायला मार्ग नसला (कारण चीनमधील उत्पादनाचे खरे आंकडे मॉस्कोलाहि मिळत नाहींत, तेथें डांगे-सरदेसाई प्रभृति मॉस्को-दलालांना काय मिळणार?) तरी ती मारतांना चीनची तंगडी मोडली, हें आतां अगदीं स्पष्ट झालें आहे. 'आम्ही अन्नधान्याची निर्यात करूं शकतों' अशा बढाया मारणारा चीन अन्नासाठीं अक्षरशः दाही दिशा फिरतो आहे. १९५९, ६० व ६१ ही लागोपाठ तीन वर्षें चीनमध्यें दुष्काळाचें राज्य होतें व १९६२ चें पीकहि फारसें चांगलें नाहीं ! फ्रेड्रिक नोसाल हा पाश्चात्य पत्रकार गेलीं बरींच वर्षें चीनमध्यें रहात होता. त्यानें नुकत्याच लिहिलेल्या ग्रंथांत आपले कांहीं अनुभव नमूद केले आहेत. तो म्हणतो—या वर्षी मी हाँगकाँगमार्गें चीनमध्यें शिरलों, तेव्हां सीमेवरील शुमचुन स्टेशनवर, फाटके कपडे घातलेले शेंकडों लोक मला तांदूळ, साखर,

गहूं यांच्या गोणी व तेलाच्या बरण्या चीनमध्यें नेताना आढळले. कांहीं वर्षांपूर्वी परिस्थिति वेगळी होती. चिनी हद्दींत शिरतांना, कस्टमचे अधिकारी सामानाची कसून तपासणी करीत व खाण्याचे पदार्थ आढळले तर ते काढून घेत नि सांगत कीं, हे पदार्थ इथेंच ठेऊन द्या; चीनमध्यें खाण्यापिण्याची टंचाई नाहीं! आज लक्षावधि अन्न-भेटी हाँगकाँगमधन चीनमध्यें पाठविल्या जातात व या भेटींची संख्या वाढविण्यास माओचें सरकार उत्तेजन देतें !

अन्नाच्या टंचाईबरोबरच क्रांति-मूल्यांचीहि चणचण चीनमध्यें भासूं लागली आहे. चीनमध्यें व्यापारासाठीं फेऱ्या मारणारे पाश्चात्य व्यापारी, चीनमधील मालाचा दर्जा पूर्वींच्या मानानें घसरलेला आहे, अशा सतत तक्रारी करीत आहेत. हॉटेलमधील गडी व वेटर्स, स्टेशनवरील हमाल व इतर ठिकाणचे सेवक, क्रांतीच्या प्रारंभीच्या झपाटयांत सरसहा बक्षिसी नाकारीत. पण आतां बक्षिसी स्वीकारण्याचा भांडवलशाही दुर्गुण सांथीसारखा पसरूं लागल्याचा अनुभव आहे. चिनी नेत्यांनीं, त्वरित फलांचें गाजर दाखवून, जनतेकडून अक्षरश: गाढवासारखीं कामें करून घेतलीं. पण गाजराऐवजीं दुष्काळ हातीं आल्यानें, शेतकरी-कामकरी बिथरले आहेत. सामुदायिक शेतांत, कारखान्यांत, लोकांना कामाला जुंपण्यासाठीं त्यांच्यामध्यें कम्युनिझममध्यें मुरलेले संघनायक (केडर) ठेवायचे, अशी चीनमधील व्यवस्था आहे. या संघनायकांचा आजवरचा दरारा आतां नष्ट झाला असून, त्यांच्या हुकुमांकडे लोक काणाडोळा करीत असल्याची हजारों उदाहरणें घडत आहेत, अशी कबुली पेकिंगच्या 'पीपल्स डेली' नें अनेकदां दिली आहे !

जे चिनी लोक केवळ मूक प्रतिकारावर समाधान मानूं शकत नाहींत, ते नानाविध क्षेत्रांत घातपाताची कृत्यें करीत आहेत. अशीं घातपाताची उदाहरणें चिनी दैनिकांत प्रसिद्ध झालीं नाहींत, असा एक दिवसहि सध्यां जात नाहीं. फोर्मोसावर असलेल्या चिअँग कै शेकच्या हस्तकांना कांहीं वर्षांपूर्वी चीनमध्यें उतरणें अशक्य होतें. १९५७ सालीं सुमारें चारशें हस्तकांनीं असा प्रयत्न केला; पण त्यांच्यापैकीं बहुतेकांना पकडण्यांत आलें. सध्यां मात्र फार मोठ्या संख्येनें चिअँगचे हस्तक चीनमध्यें उतरूं शकतात. कारण त्यांना चिनी खेडयापाडयांत आसरा व मदत मिळते. चिनी सैनिकांनीं व कनिष्ठ अधिकाऱ्यांनीं या हस्तकांना मदत केल्याची अनेक उदाहरणें नजीकच्या काळांत घडलेलीं आहेत. १९५६ सालीं तिबेटमध्यें उठाव झालाच. पण सिंकियांग या चिनी प्रांतांतहि झाला, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हें बंड मोडून काढण्यासाठीं विमानें व रणगाडे पाठवावे लागले यावरून त्यांची उग्रता लक्षांत येईल. सैनिक जेव्हां आघाडीवर लढतो तेव्हां आपल्या कुटुंबियांची काळजी

करण्याचे कारण नाहीं, अशी त्याची मनोमन खात्री असावी लागते. पहिल्या महायुद्धांत जर्मन गृह-आघाडी कोसळली नि तिचा परिणाम सैनिकांवर होऊन युद्धाची समाप्ति झाली. कम्युनिझमच्या कठोर छायेखालीं वावरणाऱ्या चिनी सैनिकाला आजहि आपल्या कुटुंबाची चिंता वाटत असते; त्याचें सारें लक्ष आपल्या खेड्याकडे असतें. अशा स्थितींत प्रत्येक रणधुमाळींत तो 'मानवी समुद्रा'चा डावपेंच करून स्वतःचा बळी देण्यास सिद्ध होईल, हें तितकेसें खरें नाहीं. नेफामध्यें चिनी सैनिक बिथरल्याचा कांहीं अनुभव आला नाहीं हें कसें, असा प्रश्न स्वाभाविकच विचारला जाईल. त्याचें उत्तर साधें आहे. एकतर भारतीय सीमेवर थोडें लष्कर आणावे लागल्यामुळें निवडक सैनिक पाठविणें चीनला शक्य होतें. त्याचप्रमाणें सैन्यांत बंड होतें, तें विजयाच्या कालांत कधींच होत नाहीं; पण पराभवाचे फटके बसू लागले कीं सैनिक अस्वस्थ बनतात. हिटलरच्या विजयाची चढती कमान होती तोपर्यंत हिटलर-विरुद्धच काय पण मुसोलिनीविरुद्धहि बंड झालें नाहीं. पण आफ्रिकेंत जर्मन-इटालियन फौजांचा पाडाव करून, दोस्तांनीं सिसिली बेटांत पाऊल ठेवतांच, मुसोलिनीचें उच्चाटन करून, इटालियन सेनेनें शस्त्रें खालीं ठेवलीं !

★★★

## पुरवठ्याचा प्रश्न

सैन्याला ताज्या फौजेची कुमक व विविध साहित्याचा पुरवठा याचें युद्धांत अत्यंत महत्त्व आहे. म्हणूनच पुरवठा-तळांपासून आघाडीचे अंतर व पुरवठ्याची यंत्रणा या गोष्टी युद्धांत अनेकदां निर्णायक ठरतात. पानिपतच्या लढाईंत मराठ्यांचा पराभव होण्याची जीं कांहीं कारणें आहेत, त्यांत पानिपत पुण्यापासून हजार मैलांपेक्षां अधिक अंतरावर आहे व पुणें ते पानिपत या दरम्यान मराठ्यांची पुरवठा-व्यवस्था चांगली नव्हती, याहि कारणाचा प्रामुख्यानें समावेश होतो. नादिरशहा, अहमदशहा अबदाली यांनीं भारतावर स्वाऱ्या करून दिल्ली जिंकली. पण चंबळ ओलांडून दक्षिण भारतांत येण्यास ते धजले नाहींत. आपले पुरवठा-मार्ग लांबल्यानें ते तोडले जातील हीच भीति त्यांच्या मनांत होती. नेपोलियनला मॉस्कोच्या थंडीनें पराभूत केलें हें खरें असलें, तरी पॅरिसमधून त्याला रसद चालू ठेवणें शक्य असतें, तर त्यानें थंडी व झार दोघांनाहि दाद दिली नसती ! जुन्या काळीं, सैन्यें वाटेंत मिळणाऱ्या अन्नावर गुजराण करीत व त्यांचा शस्त्रसंभार कमी असे. आजच्या

सैन्य-दलाला अक्षरश: हजारों वस्तूंचा सतत पुरवठा करावा लागतो. अशा स्थितींत पुरवठा-तळांपासूनच्या अंतरांना अनन्यसाधारण महत्त्व यावें यांत काय नवल ? हिटलरच्या सेना १९४२ सालीं कॉकेशसपर्यंतचा रशियन प्रदेश कापीत गेल्या. पण आपले हजारों मैल लांबलेले पुरवठा-मार्ग शाबूत रहाणार नाहींत अशी भीति निर्माण होतांच, त्यांनीं महिनाभरांत तब्बल एक हजार मैल माघार घेतली !

या पुरवठ्याच्या बाबतींत चीनची स्थिति आपल्या तुलनेनें फारच वाईट आहे. भारताच्या २५०० मैलांच्या उत्तर सीमेपैकीं आसामच्या जवळ-जवळ फूटहिल्सपर्यंत आपले रेल्वेमार्ग आहेत. उत्तर प्रदेशाला लागून असलेली जी सीमा आहे, त्याबाबत हेंच म्हणतां येईल. काश्मीरमध्यें रेल्वे-मार्ग नाहींत; पण पंजाबच्या टोंकापर्यंत उत्कृष्ट रेल्वेमार्ग चालू आहेत हेंहि तेवढेंच खरें. त्याचबरोबर सीमेवर लढणाऱ्या सैनिकांना ज्या वस्तु लागतात, त्यांचे उत्पादन करणारे आपले कारखाने सीमेपासून हजार मैलांच्या आंतच आहेत. अनेक कारखाने याहूनहि कमी अंतरावर आहेत. या उलट चीनची स्थिति अत्यंत बिकट आहे. आपल्या सीमेला लागून असणारे चीनचे प्रांत दोन. एक तिबेट व दुसरा सिंकिआंग. उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें दोन्ही प्रांत मागास असल्यामुळें, आघाडीवरील सैनिकांना त्वरित पुरवठा करण्यासाठीं त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. चीनचें सारें औद्योगिक सामर्थ्य मध्य चीनमध्यें, पण त्याहीपेक्षां, ईशान्य चीनमधील मांचूरियांत केंद्रित झालेलें आहे. जपाननें पूर्वीपासून मांचूरियाचा औद्योगिक विकास सुरू केला. लाल चीननें इतरत्रहि उद्योगधंदे काढण्याचा प्रयत्न चालविला असला तरी अद्याप बहुसंख्य कारखाने मांचूरियांतच आहेत. हा मांचूरियाचा प्रदेश भारताच्या सीमेपासून ४ ते ५ हजार मैल अंतरावर आहे. तेथून आपल्या सीमेपर्यंत रेल्वे-रस्ता आहे म्हणावे तर तशीहि स्थिति नाहीं. तिबेटमध्येंच काय, पण तिबेटच्या सीमेपर्यंतहि रेल्वे-रस्ता नाहीं. भारताच्या सीमेपर्यंत वाहतूक करण्यासाठीं चीननें तिबेटांत एक राजमार्ग बांधला आहे. पण हा मार्ग ८ ते १० हजार फूट उंचीच्या प्रदेशां-तून जात असल्यामुळें त्यावरून फारशा वेगानें वाहतूक होणें शक्य नाहीं. त्याचबरोबर या वाहतुकीसाठीं लागणाऱ्या खर्चाचाहि विचार करायला हवा. तज्ज्ञांचा हिशेब असा आहे कीं, चीनच्या कारखान्यांच्या प्रदेशांतून मालाची एक ट्रक नेफापर्यंत आणावयाची असेल, तर त्यासाठीं १०ते १५ ट्रक तेल लागते! कोरियामध्यें चीन लढला, तेव्हां त्याच्या पाठीशीं, रेल्वेचें जाळें असलेला मांचूरिया प्रांत होता व त्याहीपलीकडे मांचूरियाला उत्तर कोरियाशीं जोडणारा रेल्वेरस्ता कार्यक्षम होता. तरीहि त्या युद्धांत, चिनी सैन्य स्वतःच्या

पुरवठा-तळांपासून केव्हांहि ३५० मैलांपेक्षां अधिक लांब गेलें नाहीं. असें असूनहि, पुरवठा व दळणवळण या क्षेत्रांत चिनी सैन्याची अवस्था फारशी चांगली नव्हती, असे अनुभव कोरियांत लढलेल्या अनेक अमेरिकन व ब्रिटिश सेनापतींनीं लिहून ठेवले आहेत.

वाहतूक व पुरवठ्याच्या क्षेत्रांतील चीनच्या या अडचणींचा आपल्याला फायदा घ्यायचा असेल, तर त्यासाठीं आजचा बचावाचा पवित्रा सोडून चढाईचा पवित्रा धारण करणें आवश्यक आहे. चीननें चढाई करावी व आपण बचाव करण्याचा प्रयत्न करावा, अशी आजची अवस्था असल्यामुळें, चीनला कसल्याहि अडचणी फारशा भासत नाहींत. केव्हां हल्ला करायचा तें चीन ठरवितो व त्या हिशेबानुसार लागणारें सैन्य व त्याला लागणारी सामुग्री जमा करतो. स्वत:चें रणक्षेत्र तो आधींच निवडून ठेवतो व मागील लेखांत सांगितल्याप्रमाणें, तो आपल्या योजनेच्या रंगीत तालमी घेऊं शकतो. चीननें एकतर्फी युद्धविराम करावा यांत आश्चर्य नाहीं. कारण पुन्हां वेळ आली तर आपणच एकतर्फी चढाई सुरू करणार आहोंत,हें माओला ठाऊक आहे.

चढाईचें धोरण स्वीकारून चीनला मिळणारे हे सर्व फायदे उधळून लावले पाहिजेत. भारताची सीमा २५०० मैलांची आहे. चीन आज या साऱ्या सीमेवर अल्प सैन्यांत आपल्याला धांवपळ करायला लावतो. पण आपण चढाईचें धोरण अवलंबिले, तर धांवपळ करण्याची पाळी चीनवर येईल व स्वत:च्या सैन्याची हलवाहलव करतांना व त्याला पुरवठा करतांना त्याची दमछाक होईल. भारत-तिबेट सीमेवर, आपल्याला सैनिकीदृष्ट्या अनुकूल अशा कोणत्याहि भागांत आपण चढाई केली पाहिजे. चीननें नेफा व लडाख हे भाग चढाईसाठीं निवडले म्हणून तेवढाच प्रदेश रणक्षेत्र आहे, असें आपण कां मानावें ? १९५१ सालीं पाकिस्ताननें काश्मीरवर स्वारी करण्याची तयारी चालविली होती, तेव्हां काश्मीरवर हल्ला हा आम्हीं भारतावर हल्ला समजूं, असें पाकिस्तानला बजावून आपण आपल्या फौजा पंजाबमधील वाह सीमेपर्यंत नेल्या होत्या. त्याचप्रमाणें उत्तर प्रदेश, सिक्किम, भूतान आदि ज्या प्रदेशांतून आपणांस चिनी प्रदेशावर हल्ला करणें शक्य असेल, तेथून तो करण्यास आपण हयगय करतां कामा नये. सिक्किम व भूतान भारताबरोबरच राहिले आहेत. त्यांना लष्करीदृष्ट्या वेगळें न ठेवतां, भारतीय संरक्षण–योजनेंत आणले पाहिजे व क्रमश: नेपाळलाहि या योजनेंत बसविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. चीन हें विश्वासघातकी राष्ट्र आहे हें आपणास पटलें असेल तर भूतान व सिक्किमवर प्रत्यक्ष स्वारी होण्याची वाट पहाणें शहाणपणाचें ठरणार नाहीं.

★★★

# तिबेटच्या स्वातंत्र्याचें महत्त्व

ज्या प्रदेशांत युद्ध होतें, त्या प्रदेशाची जबर नासाडी होत असल्यामुळें, युद्ध शत्रूच्या प्रदेशांत खेळले जाईल, याची खबरदारी चाणाक्ष सेनापतींनीं नेहमींच घेतलेली आहे. शत्रूच्या प्रदेशांत युद्ध नेण्यांत अर्थातच एक धोका असतो. तो हा कीं, आपल्या भूमीच्या व घरादारांच्या रक्षणासाठीं, शत्रु-सैन्य एवढेंच नव्हे तर सर्वसामान्य जनताहि बेभान होऊन लढते ! पण आपण ज्यांच्या प्रदेशांत लढाई नेणार ते तिबेटी लोक आपल्या स्वागतास सिद्ध झालेले आहेत. माओ–चाओ व आपले मार्क्सवादी मराठी पत्रपंडित, चीननें तिबेटांत केलेल्या विकासाच्या केवढयाहि बढाया मारोत, तिबेटी जनतेनें माओचें राज्य केव्हांहि मनानें स्वीकारलेलें नाहीं. विकास केवळ कम्युनिस्टांनाच हवा आहे असें नाहीं, तर जगांतल्या प्रत्येक देशाला हवा आहे. पण हा विकास स्वातंत्र्याचें मोल देऊन नको आहे ! राजकीय भाषणें न करण्याचें, भारतभर दौरा न काढण्याचे नैतिक निर्बंध स्वीकारून व येथील कम्युनिस्ट व त्यांच्या अत्रे-करंजियांसारख्या भाईबंदांकडून होणारी हेंटाळणी सहन करूनहि दलाई लामा भारतांत बसले आहेत, ते कांहीं त्यांना 'धर्मशाला'-ची हवा मानवते म्हणून नव्हे ! अमेरिका, ब्रिटन व अन्य पाश्चात्य राष्ट्रें त्यांना अगत्यानें बोलावीत आहेत. तरीहि दलाई लामा भारतांत रहात आहेत, ते या आशेनें कीं, चीनपासून क्यूबापर्यंत प्रत्येक छोटयामोठया राष्ट्राचें स्वातंत्र्य नि हक्क यांच्यासाठीं टाहो फोडणारा भारत, आज ना उद्यां बिचाऱ्या असहाय्य तिबेटच्या स्वातंत्र्यासाठींहि धांवून येईल ! तिबेटमधून चीन भारतावर हल्ला करतो, यासाठीं तिबेटमधील चिनी तयारीची आपणास खडान्‌खडा माहिती मिळणें आवश्यक आहे. तिबेटी स्वातंत्र्यवीर ही सर्व माहिती, धोका पत्करूनहि आपणास कळवितील. त्याचबरोबर त्यांना शस्त्रें पुरविलीं तर चिनी पुरवठा-मार्ग तोडणें व त्यांची कोठारें उध्वस्त करणें हींहि अत्यंत महत्त्वाची कामें तिबेटी लोक करूं शकतील. तिबेटींना शस्त्रें कशी देणार ? असा एक प्रश्न बिनतोड म्हणून एका पत्र-(कीं पुस्तकी) पंडितानें विचारला आहे. जर्मन वर्चस्वाखालील वॉर्साच्या पोलिश जनतेला शस्त्रें कशी मिळालीं? टिटोच्या हातीं शस्त्रें कशीं पडलीं? इच्छा असली कीं, शस्त्रांचा पुरवठा करतां येतो. याचबरोबर या गनिमांचा आणखीहि एक उपयोग लक्षांत ठेवायला हवा. गेल्या युद्धांत युगोस्लाव गनिमांचा बंदोबस्त करण्यासाठीं १० ते १५ जर्मन डिव्हिजन्स अडकून पडल्या होत्या व रशियामध्यें गनिमांच्या भीतीनें रात्रीची वाहतूक (रेल्वे व मोटारी) बंद ठेवण्याची पाळी जर्मनांवर आली

होती. तिबेट-मुक्ततेच्या मागणीचा अर्थ एवढा भव्य आहे; मग आज कोणी सत्ताधारी या कल्पनेची 'निखालस मूर्खपणा' म्हणून कितीका टिंगल करेनात !

केवळ बचावाच्या धोरणानें युद्ध तर जिंकतां येत नाहींच, पण स्वतःचें संरक्षण करणेंदेखील अशक्य होतें. गेल्या युद्धापूर्वी, तरुण जनरल द गॉलनें, आपल्या वरिष्ठांचा रोष पत्करूनहि एक ग्रंथ लिहिला व चढाईच्या धोरणाची महती प्रतिपादन केली. पण फ्रेंच सेनापतींनीं द गॉलला वेड्यांत काढले. हिटलरनें पोलंडवरील स्वारीचा हुकुम देतांना, आपलें बहुतेक सैन्य वापरण्याचा आदेश सेनापतींना दिला, तेव्हां सेनापति घाबरून गेले. ते म्हणाले—यावेळीं फ्रान्सनें पश्चिम सीमेवर हल्ला केला तर फ्रेंच सैन्य बर्लिनपर्यंतदेखील येऊं शकेल ! पण हिटलरचा अंदाज खरा ठरला ! मॅजिनो तटबंदीवर सारी भिस्त ठेवून फ्रेंच सेनापति स्वस्थ बसले. हिटलर मॅजिनो तटबंदीवर हल्ला करील तेव्हां त्याचें डोकें फुटेल, या नशेंत ते मश्गूल राहिले. अखेर हिटलरनें फ्रान्सवर हल्ला केला नि अब्जावधि फ्रँक्स खर्च करून बांधलेली मॅजिनो तटबंदी पानशेतच्या बांधापेक्षांहि अधिक फुसकी ठरली ! जर्मन रणगाडे मॅजिनो तटबंदीच्या पाठीमागें उतरले नि फ्रेंच सेनेला मॅजिनोच्या बाहेर येऊन युद्ध खेळावें लागल्याचा अजब प्रकार जगाला पहायला मिळाला (पहा-ले. क. केर्नान यांचे डिफेन्स विल नॉट विन दि वॉर). मुकटे नि धाबळ्यांच्या भिंती उभारून पुण्याचें रक्षण होईल ही भावना जेवढी भोळसट होती, तेवढीच भारत-चीन सीमेवर तारांची कुंपणें उभारून आपण चिनी सैन्याला अडवूं शकूं, हीहि कल्पना हास्यास्पद आहे. मॅजिनो वाचविता आली नाहीं, तद्वत सिंगापूरचा 'अभेद्य' किल्लाहि अवघ्या ७ दिवसांत कोसळला ! शत्रू आपलीं माणसें मारावयास तयार असेल तर जगांतील कोणतीहि तटबंदी फोडतां येते, हा इतिहासाचा धडा आहे ! तटबंदी, किल्ले यांचा उपयोग शत्रूचा हल्ला कांहीं काल थोपवून धरण्यासाठीं असतो. 'शॉक ॲबसॉर्बर्स' हें त्यांचें योग्य वर्णन ठरेल. पण हल्ला परतविण्याचा खरा मार्ग चढाई हाच ! भारत-चीन युद्ध सुरू झाल्यावर रॉबर्ट ट्रुम्बुल या पत्रपंडितानें हाँगकाँगहून 'न्यूयॉर्क टाइम्स'ला जें वार्तापत्र (दि. २५ नोव्हेंबर, ६२) पाठविलें आहे, तें या दृष्टीनें उद्बोधक आहे. तो म्हणतो-"भारतावरील स्वारीबद्दल चिनी जनतेंत फारशी उत्सुकता आढळून येत नाहीं. या उलट, गेल्या वर्षाच्या वसंत ऋतूंत, चिअँग कै शेकच्या हल्ल्याची शक्यता निर्माण झाली होती, त्यावेळीं चीनमध्यें घबराट व विलक्षण अस्वस्थता दिसून येते होती !" ही परिस्थिति समजूं शकते. भारतावरील चिनी स्वारीचा उपसर्ग खुद्द

चीनला मुळींच पोहोंचणार नव्हता. याउलट चिअँग कोठें उतरणार, किती सैन्य वापरणार, चिनी जनतेची प्रतिक्रिया कशी राहील, याचा अंदाज नसल्यामुळें चिनी राज्यकर्त्यांची धावाधाव व्हावी, हें स्वाभाविक होतें. आजची परिस्थितीहि अशी आहे कीं, चिअँगच्या स्वारीच्या भीतीनें चीनचें मोठें सैन्य दक्षिण चीनमध्यें अडकून पडलें आहे !

★★★


## माओचा लष्करी पराभवच हवा

माओ त्से तुंगनें गेल्या तपांत उभारलेलें लष्करी यंत्र प्रचंड व प्रबल असलें तरी तें अजिक्य मात्र खासच नाहीं. त्याचबरोबर चिनी सेनेला धूळ चारणें ही गोष्ट सोपीहि नव्हे ! चीनचें आव्हान आपण खरोखरच स्वीकारलें असेल, तर वाटाघाटींची भाषा बंद झाली पाहिजेच; पण या घोषणेचे वर उल्लेखिलेले सर्व अन्वयार्थहि आपण स्वीकारले पाहिजेत. चीननें आशियाचें जीवन धोक्यांत आणलें, तें आपल्या लष्करी सामर्थ्याच्या जोरावर. म्हणून हा धोका नष्ट करावयाचा असेल, तर चीनचा लष्करी पराभव करणें, हाच एकमेव मार्ग आहे. भारत हें करूं शकेल.


---

ग्रंथ संग्रहालय
क्र. 93934
शाखा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रम ३४५८९६ वि: [illegible]
क्रमांक ........................ नों दि: १९-३-६२




कम्युनिस्ट चीन व भारताचा सीमा-प्रदेश




कम्युनिस्ट चीन व भारताचा सीमा–प्रदेश

# फसवे युक्तिवाद, नाटकी घोषणा

पंतप्रधान नेहरूंच्या नेतृत्वाखालीं स्वतंत्र भारतानें जें परराष्ट्र-धोरण आंखलें, त्याचीं प्रमुख सूत्रें तटस्थता नि शांतता ! जगांत कोठेंहि आक्रमण झालें, थंडें वा गरम युद्ध पेटलें कीं, भारत सरकार तडजोडीची योजना घेऊन तेथें धांव घेई ! आक्रमक कोण, अन्याय कोणावर झाला, याचा फारसा विचार न करतां तडजोड करून शांतता प्रस्थापित करा व जगाला अणुयुद्धाच्या आपत्तीपासून वांचवा, असा भारताचा घोष असे. पण चीननें भारतावरच आक्रमण केल्या-मुळें भारत पेंचांत सांपडला, तेव्हां आशियाई-आफ्रिकी राष्ट्रें पुढें आलीं व भारतानें घालून दिलेल्या धडयाबरहुकुम त्यांनीं भारत-चीन तडजोडीचे प्रयत्न चालू केले. १० ते १२ डिसेंबर (१९६२) पर्यंत कोलंबो येथें सीलोन, ब्रम्हदेश, इंडोनेशिया, कंबोडिया, संयुक्त अरब प्रजासत्ताक व घाना या सहा तथाकथित तटस्थ राष्ट्रांची परिषद भरून 'कोलंबो योजना' या नांवानें तडजोडीची एक योजना बन-विण्यांत आली. या योजनेंत भारताच्या लडाख प्रदेशासाठीं लोकविल-क्षण व्यवस्था सुचविण्यांत आली आहे. चीननें त्याच्या सध्यांच्या प्रत्यक्ष ताबा-रेषेपासून ( line of actual control ) २० किलोमीटर माघार घ्यावी, पण भारतानें मात्र जागच्या जागींच रहावें; चीनच्या माघारीमुळें मोकळ्या होणाऱ्या ६ हजार चौरस मैलांच्या क्षेत्रांत कोणत्याहि राष्ट्राचें सैन्य राहूं नये व तेथें भारत नि चीन दोन्ही राष्ट्रांनीं सारख्या संख्येनें मुलकी ठाणीं उभारावीत, अशी ही व्यवस्था आहे. चीन आक्रमक आहे व सर्व लडाख प्रदेश भारतीय मालकीचा आहे, असा उल्लेख कोलंबो योजनेंत दूरान्वयानेंहि केलेला नाहीं, हें लक्षांत घेण्याजोगें आहे.

या योजनेवर २३ ते २५ जानेवारी (१९६३ )पर्यंत भारतीय संसदेंत चर्चा झाली. भारतानें कोलंबो योजना स्वीकारण्याचा निर्णय कां घेतला हें सांगतांना, ही योजना 'आठ सप्टेंबर' योजनेपेक्षांहि

उजवी आहे, असा अभिप्राय पंतप्रधानांनीं प्रगट केला. कम्युनिस्टे-तर विरोधी पक्षांनीं या योजनेस कडाडून विरोध केला, तरी काँग्रेस-कम्युनिस्ट एकजुटीमुळें 'योजना स्वीकारूं नये' ही विरोधी उपसूचना ५९ विरुद्ध ३४९ मतांनीं फेटाळली गेली.

७ फेब्रुवारी, १९६३

जुनें कांहीं विसरायचें नाहीं नि नवें कांहीं शिकायचें नाहीं, असा आरोप फ्रेंच राष्ट्रावर ज्यानें केला, त्यानें भारतावर अन्याय केला, असें माझें मत आहे. भारताचा इतिहास असें सांगतो कीं, भारतीय लोक जुन्या अनुभवांवरून कसलेहि धडे घ्यायला तयार नाहींत. ब्रिटिशपूर्व कालांत खैबर खिंडींतून विविध स्वाऱ्या या देशावर आल्या. आक्रमकांनीं आपल्या असज्जतेचा, आपल्या फाटाफुटीचा भरपूर फायदा उठविला नि ते विजयी झाले. सतत हजार वर्षें हा क्रम चालू होता. पण भारतीय समाजानें आपली सुस्ती, आपले क्षुद्र हेवेदावे सोडले नाहींत. विजयी आक्र-मकांपासून आपण कांहींहि शिकलों नाहीं.

पण ब्रिटिशपूर्व कालाबद्दलच्या हजार वर्षांबाबत असें म्हणतां येईल कीं, तो काल म्हणजे खरोखरच भारताच्या इतिहासांतील अंधारयुग होतें. समाजानें स्वतःला पोथ्यापुस्तकांना, कर्मकांडाला बांधून घेतलें नि त्याची विजिगीषु वृत्ति नष्ट होऊन, परक्यांची गुलामगिरी त्याच्या नशिबीं आली. पण, ब्रिटिश सत्ता येथें आल्यावर अंधारयुगाचा अंत झाला. आपल्या समाजाला केवळ 'भारताचाच शोध' लागला असें नव्हें, तर जगाचाहि शोध लागला. साध्या गप्पाटप्पांत पोरेंसोरेंदेखील स्पेन नि ॲबिसीनिया, कम्युनिझम नि फॅसिझम बोलूं लागलीं. पण प्रत्यक्षांत असें दिसून आलें कीं, आपल्या माहितीचीं क्षितिजें वाढलेलीं असलीं तरी आपण नवें कांहीं शिक-लेलों नाहीं. जुनें सोडायला आपण तयार नाहीं.

कोलंबो राष्ट्रांनीं सुचविलेल्या योजनेवर संसदेंत जी चर्चा झाली, तेव्हां आपल्या 'जैसे थे' वृत्तीचें पुरेपूर दर्शन घडलें. कोलंबो योजनेच्या स्वीकाराचा पुरस्कार करणारीं जीं भाषणें झालीं, तीं वाचल्यावर फाळणी-पूर्व कालांतील वक्तव्यें आठवूं लागलीं नि अंगावर कांटा उभा राहिला. जिनांच्या मागण्या व मुजोरी वाढूं लागली तेव्हां याची परिणती पाकिस्तानच्या

निर्मितींत होण्याचा धोका आहे, असे इशारे कांहीं विचारवंतांनीं दिले, तेव्हां त्यांची कोण टिंगल करण्यांत आली! वडचा वडचा मंडळींनीं विद्वत्ताप्रचुर युक्तिवादाच्या चवडी रचल्या. कोणी म्हणाले, पाकिस्तानची घोषणा हा जिनांचा केवळ गनिमी कावा आहे. जिनांना पाकिस्तान नको आहे तर राजसत्तेंत ५० टक्के वांटा हवा आहे. धर्मराज्याची कल्पना अठराव्या शतकांतील आहे; विसाव्या शतकांत ती अंमलांत येऊंच शकणार नाहीं, अशीहि ग्वाही अनेकांनीं दिली. कांहीं अर्थपंडितांनीं संकल्पित पाकिस्तान आर्थिकदृष्टचा अव्यवहार्य असल्यामुळें पाकिस्तान जन्मापूर्वींच कोलमडून पडेल, असा सिद्धांत मांडला. पण अखेर पाकिस्तान अस्तित्वांत आलें. विसाव्या शतकांत एक धर्मांध राष्ट्र आपल्या शेजारीं उभें राहिलें. (परदेशी मदतीवर) आपला निर्वाह जसा चालू आहे, तसाच पाकिस्तानचाहि चालू आहे. तरवारीला आम्ही तरवारीनें उत्तर देणार होतों. पण आमची तरवार म्यानांतच राहिली नि आमच्या डोक्यावर मात्र पाकिस्तानची धारदार तरवार लटकते आहे.

संसदेंत, कोलंबो योजनेवरील चर्चेत अशाच फसव्या युक्तिवादांचे मनोरे रचण्यांत आले. अशाच नाटकी घोषणा झाल्या. कोलंबो योजना कां स्वीकारायची ? कारण त्यामुळें चीन एकाकी पडेल. कम्युनिस्ट गटांत तो एकाकी पडलाच आहे. पण आतां तटस्थ आशियाई गटांतहि एकाकी पडेल. आणि एकाकी राष्ट्र कधीं लढूं शकेल काय? याचबरोबर वाटाघाटींमुळें आपल्याला तयारीला वेळ नाही का मिळणार? केवळ काळाचाच विचार केला तर हिशोब बरोबर आहे. पण महाशय, तीन वर्षांपूर्वीं आपण नेमका हाच युक्तिवाद केला होतात. १९५९ सालींहि तयारीच्या नांवाखालींच चीनच्या 'अरे' ला 'कारे' म्हणायला तुम्ही नकार दिला होतात. आणि अनुभव असा आला कीं, या तीन वर्षांत माओनें तिबेटला प्रचंड युद्धतळाचें स्वरूप दिलें नि आपल्याकडे मात्र नेफांत रस्ते बनणें सोडाच, पण सैनिकांच्या उबदार कपडचांची सोयहि होऊं शकली नाहीं. तयारी नाहीं म्हणून वाटाघाटी करायच्या नि वाटाघाटींमुळें शांतता येणार म्हणून तयारी व्हायची नाहीं, हा चक्रनेमिक्रम नवा नाहीं. वाटाघाटींसाठीं आपल्या किमान अटीहि (८ सप्टेंबर योजना) ढिल्या करायच्या नि वर घोषणा करायची कीं, राष्ट्राचा सन्मान आम्ही विकणार नाहीं. काश्मीरसह जगांतला अनुभव असा आहे कीं, युद्धविराम रेषा हीच अंतिम सीमारेषा ठरली आहे. पण पंतप्रधान घोषणा करते झाले कीं, वाटाघाटींसाठीं कोलंबो योजना आम्ही मान्य केली, याचा अर्थ अंतिम तडजोडीसाठीं तीच रेषा

आम्ही मान्य करूं असा नाहीं. अगदीं त्रिवार नाहीं! कलेसाठीं कला याच चालीवर घोषणेसाठीं घोषणा या न्यायानें पंतप्रधानांच्या घोषणेकडे पाहिलें कीं, छाती फुगल्यावांचून रहात नाहीं. पण वाटाघाटींत एवढी जादू असती, तर अक्साई चीनमधून बळजोरीनें रस्ता बांधण्याऐवजीं माओ-चाओनी वाटाघाटींचाच रस्ता चोखाळला नसता का?

विशेष म्हणजे कोलंबो योजना सुचविणाऱ्या राष्ट्रांपैकीं एका राष्ट्रानें–इजिप्तनें–स्वतःवर प्रसंग येतांच फार निराळें वर्तन केलें होतें. इस्रायल राष्ट्राच्या निर्मितीपासून इजिप्तच्या इस्रायलशीं चकमकी चालू होत्या. त्यांतच नासरनें सुवेझ कालव्याचें अचानक राष्ट्रीयीकरण केल्यामुळें, ब्रिटन व फ्रान्स हीं राष्ट्रें पेटलीं व इस्रायलनें त्यांच्याशीं संगनमत करून त्या तिघांनीं इजिप्तवर स्वारी केली. अवघ्या ७ वर्षांपूर्वींची म्हणजे ५६ सालची ही घटना आहे. इस्रायली सैन्यानें सिनाई या इजिप्तच्या प्रांतावर हल्ला करून अवघ्या ५ दिवसांत इजिप्तच्या सुमारें ७५ हजार सेनेचा फडशा पाडला व सारा सिनाई प्रांत काबीज केला. ५ हजार इजिप्ती सैनिकहि इस्रायलनें पाडाव केले. युनोनें या तंटयांत हस्तक्षेप केला, तेव्हां इस्रायल सिनाईंतून माघार घ्यायला तयार झालें. पण भूमध्य सागरावरील गाझा या प्रदेशांतून सैन्य काढून घेण्यास इस्रायल तयार नव्हतें. गाझा टापू कधींच इजिप्तचा भाग नव्हता व ही गोष्ट इजिप्ती कोर्टानेंहि मान्य केलेली आहे, असा इस्रायलचा दावा होता. त्याचप्रमाणें १९४९ सालपासून याच गाझा प्रदेशांतून 'फेदायीन' म्हणजे अरब गनिमांचे सशस्त्र हल्ले इस्रायलवर होत असल्यामुळें, हा टापू फिरून इजिप्तकडे देण्यास ज्यूंचा विरोध होता. इजिप्तला सिनाईचा प्रचंड प्रदेश परत मिळाला होता व इस्रायलनें केलेला इजिप्तचा प्रचंड पराभव लक्षांत घेतां नासरनें गाझाच्या छोटया (२१० चौरस मैल) टापूसाठीं आग्रह धरणें म्हणजे इस्रायलशीं कायम तंटा ठेवण्यासारखें होतें. पण नासरनें आपला हट्ट सोडला नाहीं. अखेर इस्रायलला गाझामधून माघार घ्यावी लागली व नासरनें तत्काळ त्या प्रदेशाचा ताबा घेतला. सध्यां गाझा प्रदेशांत सत्ता आहे ती इजिप्तची. इजिप्त-इस्रायलची संयुक्त सत्ता नव्हे. नासर युद्ध हरला. अगदीं सपशेल पराभूत झाला. पण त्याची जिद्द विलक्षण होती. परिणामीं इस्रायल, ब्रिटन व फ्रान्स या आक्रमकांना संपूर्ण माघार घ्यावी लागली. सुवेझ कालव्याचें राष्ट्रीकरण अबाधित राहिलें नि त्याहीपलीकडे सुवेझ कालवा इस्रायलला बंद राहिला तो राहिलाच. इजिप्ती सैनिक शौर्याच्या बाबतींत

इस्रायली सैनिकांच्या जवळपासहि उभा राहूं शकणार नाही. दोन वर्षां-पूर्वी इस्रायलमध्यें गेलों असतांना अनेकांना मी एक प्रश्न विचारीत असे. इजिप्तची लोकसंख्या अधिक. त्यामुळें आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज होऊन नासरनें तुमच्यावर हल्ला केला तर? इस्रायली लोक टिचकी वाजवीत व म्हणत–हें असें आम्ही त्यांना साफ करूं! खुद्द नासरला याची कल्पना नाहीं असें थोडेंच आहे? इजिप्तला लष्करी परंपरा नाहीं. इजिप्ती लोक सुखासीन म्हणून प्रसिद्ध आहेत. तरीहि नासर इस्रायलविरुद्ध दंड थोपटून उभा रहातो, कारण कणखर नेतृत्व दिलें तरच इजिप्ती लोक लढावयास सिद्ध होतील, हें त्याला ठाऊक आहे. मातींतून सैनिक निर्माण करण्याची किमया निर्धारी नेतृत्वांत असूं शकते. मावळे ही जमात लढाऊ नव्हे. पण शिवाजीच्या नेतृत्वाखालीं मावळ्यांनीं भीम–पराक्रम केला. पाश्चात्य लष्करी टीकाकार एक चमत्कार म्हणून असें सांगतात कीं, जर्मन सेनापति जनरल रोमेल याच्या नेतृत्वाखालीं इटालियन सैनिकहि शूरपणें लढत !

संकटाच्या, विपत्तीच्या कालांतच व्यक्ति वा राष्ट्राचें शील सिद्ध होतें. हें शील अनेकदां नेतृत्वाच्या नाहीं म्हणण्याच्या क्षमतेवर ठरतें. संभाजी महाराजांनीं धर्मांतरास नकार दिला, डोळे काढण्याची शिक्षा समोर दिसत असतांनाहि नकार दिला नि मराठी जनता वणव्यासारखी पेटली. कुतुबशहाच्या रूपानें समोर मृत्यु दिसत असतांना दत्ताजी शिंद्यानें शरण जाण्यास नकार दिला नि पानिपतावर मराठी पौरुषाचें भव्य नि तेजस्वी दर्शन मराठी राज्याच्या साऱ्या शत्रूंना घडलें. वॉशिंग्टन, चर्चिल, माओ यांनीं आपापल्या राष्ट्राची मान ताठ ठेवली ती या नाहीं म्हणण्याच्या ताकदींतून. जिनांच्या याच सामर्थ्यांतून पाकिस्तान उभें राहिलें. दुसऱ्या महायुद्धांत हिटलरनें केलेल्या अखेरच्या हल्ल्यांत (डिसेंबर १९४४) जर्मन सैन्यानें बॅस्टोन येथें ज. ब्रॅडलेचीं पथकें कैचींत पकडलीं व ब्रॅडलेकडून शरणागतीची मागणी केली. ब्रॅडलेनें फक्त एकाच शब्दांत उत्तर दिलें–Nuts (खुळे कुठचे) ! ब्रॅडलेच्या या उत्तरानें साऱ्या अमेरिकन राष्ट्राच्या शरीरावर रोमांच उभे राहिले होते. आज आपल्यापुढें गंभीर प्रश्न उभा आहे. चीननें नेफांत आपल्याला चार धपाटे मारून स्वतःचें लष्करी श्रेष्ठत्व सिद्ध केलें आहे आणि तो विचारतो आहे–काय महाशय, खुमखुमी जिरली कीं नाहीं? अशा स्थितींत दत्ताजी शिंद्यासारखे 'और भी लढेंगे' असें उत्तर आपण देणार कीं नाहीं? आपल्या राष्ट्राचें शील सिद्ध करणारा हा सवाल आहे.

वाटाघाटींना विरोध करणें हें असंस्कृतपणाचें लक्षण आहे, असें पंतप्रधान म्हणाले. अतिशयोक्ति वक्तृत्वालाहि शोभा आणते, याच दृष्टीनें या विधानाकडे पाहिलें पाहिजे. अर्थात् राष्ट्रीय जीवनांत वाटाघाटी, तड-जोड यांना स्थान आहे हें कोणीच नाकारीत नाहीं. पण प्रत्येक प्रश्न सोडविण्याचा युद्ध हा जसा मार्ग होऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें वाटाघाटी हेंहि बहात्तर रोगांवरचें एकमेव औषध नव्हें. अमेरिकेचे दुसऱ्या युद्धांतले सेनाप्रमुख जनरल जॉर्ज मार्शल यांच्यावर कोणीहि युद्धखोरीचा आरोप केलेला नाहीं. असा मनुष्य दुसऱ्या युद्धांतला अतिभीषण संहार पाहिल्यानंतरहि कोणत्या निष्कर्षाप्रत आला असावा? युद्धाच्या अखेरच्या दोन वर्षांचा अहवाल अमेरिकन सरकारला सादर करतांना जनरल मार्शल म्हणतात–राष्ट्र सुरक्षित ठेवणें किंवा शांतता राखणें यासाठीं सोपा मार्ग उपलब्ध नाहीं. निसर्गाला दौर्बल्याचा तिटकारा आहे. समर्थ तोच टिकतो हा नियम अजूनहि खरा आहे. आपल्या राजनीतीच्या पाठीशीं सामर्थ्याचें अधिष्ठान नसेल तर आपली मुत्सद्देगिरी फसणार हें उघड आहे. अमेरिकन राष्ट्रानें आपल्या जन्मापासून, आपलें शांतताप्रेम जोपासण्याचा प्रयत्न केला तो आपल्या दौर्बल्याचें प्रदर्शन मांडून! परिणामीं आपल्याला लक्षावधि माणसें बळी द्यावीं लागलीं व अब्जावधि डॉलर्स ओतावे लागले. यापुढें आपण राजकीय क्षेत्रांतील गुंडांची अशी खात्री पटविली पाहिजे कीं, शांतताभंग करण्याचा त्यांचा प्रयत्न त्यांनाच विनाशाप्रत नेईल!

अमेरिकेसारख्या राष्ट्राचा हा अनुभव व आपल्या समाजाची हजारों वर्षांची चैतन्यशून्यता या गोष्टी लक्षांत घेऊन नेतृत्वाचीं पावलें पडायला हवींत. जपानवर कॉमाडोर पेरीनें तोफा डागल्या हें शल्य मनांत बाळगून, सारा जपानी समाज राष्ट्र सामर्थ्यसंपन्न करण्यासाठीं धडपडूं लागला. आपल्या समाजांत चिकाटीनें सामर्थ्यवर्धन करण्याचा गुण अभावानेंच उरलेला आहे. राग, द्वेष, सूडभावना हे दुर्गुण व्यक्तीचे बावतींत त्याज्य असतील; पण समाज सूडानें पेटला तर अणुबाँबचें सामर्थ्य निर्माण होतें. कोलंबो योजना पुढें आल्याबरोबर युद्ध-कार्याबद्दलचा उत्साह ओसरला आहे, ही वस्तुस्थिति नाकारून कसें चालेल? याची जबाबदारी कोणावर पडते? हजार वर्षें निपचित पडलेल्या राष्ट्राला चैतन्यशाली बनवायचें असेल, तर त्याला संकटांच्या, साहसाच्या मार्गानेंच नेलें पाहिजे. वाटाघाटी ही संस्कृति असेल कदाचित्. पण चेतनाशून्य समाजाच्या संस्कृतीची किंमत ती काय?

★★★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
क्रमांक ........ दि: ........
REFBK-0013138